साप्ताहिक
माणूस
१३ ऑगस्ट ८३ / दोन रुपये

# फिलिप्स

## बेमुदत संप? की टाळेबंदी? खेळी कोणाची बिनसली





साप्ताहिक
माणूस

वर्ष : तेविसावे
अंक : अकरावा

१३ ऑगस्ट १९८३
किंमत : दोन रुपये

संपादक
श्री. ग. माजगावकर

साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे
मेधा राजहंस


वार्षिक वर्गणी
पन्नास रुपये

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादीबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही.

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :
साप्ताहिक माणूस
१०२५ सदाशिव, पुणे ३०
दूरध्वनी : ४४३४५९

मुखपृष्ठ
संजय पवार



# मुंबापुरी

## बिअरचे तीन ग्लास

महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाचे अध्यक्ष शेवडे यांनी गेल्या सोमवारी संध्याकाळी चर्चगेट येथील रिट्झ ( Ritz ) हॉटेलमध्ये पत्रकार-परिषद बोलाविली. निमंत्रण पाहताच आमच्या डोक्यात असा प्रकाश पडला (पत्रकार असल्याने आमच्या डोक्यात एरवी अंधार असतो) की, तेरा जुलै रोजी संपूर्ण राज्यांत पसरलेल्या अंधाराचे कारण सांगण्यासाठी हा वार्तालाप योजला असावा. एम्. एस्. ई. बी. हे सरकारी मंडळ असल्याने स्पष्टीकरणास इतका उशीर झाला असेल असा समज करून आम्ही घाईघाईने सातच्या मीटिंगला साडेसात वाजता रिट्झमध्ये पोहोचलो.

आत शिरल्याबरोबर पस्तीस ते चाळीस पत्रकार समोर बसलेले पाहून आमच्या तात्काळ ध्यानात आले की, बातमी फारशी महत्त्वाची नाही. शेवडे सपत्नीक आले होते. फडके नावाचे त्यांचे एक सहकारीही बरोबर होते.

ही पत्रकार-परिषद नसून इनफॉर्मल गेट-टुगेदर असल्याचे आम्हाला सांगण्यात आले. वृत्तपत्रीय भाषेत इनफॉर्मल गेटटुगेदर म्हणजे मद्य आणि खाद्य ! अशा प्रसंगी मुंबापुरीत पत्रकारांच्या सख्येत प्रचंड प्रमाणावर वाढ होते. (या ठिकाणी शेवडे आणि चाळीस पत्रकार अशी कथा सांगण्याचा आमचा इरादा नाही. )

मद्य असले की, कोणतीही बातमी कोपराने खणता येते असे म्हणतात. त्यामुळे थोडया चौकशीअंती आम्हाला असे समजले की, ब्लिट्झ ह्या साप्ताहिकाने शेवड्यावर केलेल्या आरोपाच्या निमित्ताने हा सहभोज-भोजनाचा बेत आखण्यात आला होता. शेवडे ह्या महिन्याच्या एकतीस तारखेला निवृत्त होत आहेत. जर सरकारने मनात आणले तर त्यांना एकोणीसशेपंचाएशी सालापर्यंत हे पद सांभाळता येईल; पण नेमक्या अशा वेळी कोणी तरी ' हितशत्रूनी ' ब्लिट्झमध्ये ही बातमी दिली. यासाठी पत्रकाराना विश्वासात घेण्यासाठी हे प्रीतिभोजन !

मंडळाचा कारभार किती स्वच्छ आहे हे शेवड्यानी पत्रकारांना समजावून सांगितले. तेरा जुलैच्या गोंधळाच्या संदर्भात पत्रकारांनी मंडळाच्या प्रसिद्धिखात्याला दोष दिला. गुजराथ वीजमंडळाचे स्पष्टीकरण मुंबईला येऊन पोहोचले तरी एम्. एस्. ई. बी. कडून कोणतेही पत्रक काढण्यात आले नाही. मंडळाचे कोराडी, चंद्रपूर येथे जे काम चालले आहे ते पाहण्यासाठी मुंबईहून प्रेस-पार्टी नेण्याची सूचना पत्रकारांनी अध्यक्षांना केली. (प्रेसपार्टी हा शब्द ऑक्सफर्ड डिक्शनरीत आम्ही पाहिला असता त्याचा अर्थ पिक्‌निक् असा देण्यात आलेला आहे.)

तेरा जुलैच्या गोंधळाची चौकशी करण्यासाठी सरकारने कमिटी नेमली असल्याने आपण त्यासबंधी काहीही बोलणार नाही असे शेवडे म्हणाले; पण तरीही पत्रकाराच्या आग्रहामुळे आपण शेवटी त्याविषयी बोलू असे त्यानी आश्वासन दिले. इनफॉर्मल गेट-टुगेदरमध्ये शेवटी ऐकण्याच्या मनःस्थितीत असतो कोण ? असो.

साडेनऊ–दहाच्या सुमारास शेवड्यांनी समोर टेबलावर बिअरचे तीन ग्लास ठेवले. म्हणाले, 'यातला मधला ग्लास म्हणजे तारापूर, एका बाजूचा महाराष्ट्र आणि दुसऱ्या बाजूचा गुजराथ.' मग गुजराथचा ग्लास अर्धा भरून महाराष्ट्राचा ग्लास त्यांनी पूर्ण भरला. आता हे दोन ग्लास जर नळीने जोडले तर बिअर कोठून कोठे जाईल असे त्यानी विचारले. 'बिअर 'मेन्टेन्म् इट्स् ओन लेव्हल' हे

शास्त्रीय सत्य आम्हाला ठाऊक असल्याने आम्ही तात्काळ महाराष्ट्राकडून गुजराथ कडे असे उत्तर दिले. गुजराथ वीजमंडळाचे अध्यक्ष पाटणकर काही म्हणाले तरी गुजराथने वीज घेतल्यामुळेच सारा गोंधळ झाला असे त्याचे ठाम मत पडले.

महाराष्ट्रातील लाखो लोकांशी निगडित असलेला इतका महत्त्वाचा विषय शेवडयांनी ज्या सोप्या पद्धतीने समजावून सांगितला त्यामुळें आम्ही त्याच्यावर बेहद्द खूष झालो. त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर वीजपुरवठ्यात गोंधळ होण्याची कारणेही हळूहळू आमच्या ध्यानात येऊ लागली.

## स्लाव्हिन....स्फोट

श्रीलंकेने ( भारताविरुद्ध ) अमेरिका, इंग्लंड, पाकिस्तान आणि बांगलादेश यांच्याकडे लष्करी मदत मागितली आहे, अशी बातमी दिल्यामुळे कोलंबोमधून हद्दपार झालेले युनायटेड प्रेस इंटरनॅशनल (यू. पी. आय.) या अमेरिकन वृत्तसंस्थेचे साउथ एशिया मॅनेजर स्टेव्हर्ट स्लाव्हिन यांची बुधवारी भेट झाली.

जवळजवळ दिवसभर कोलंबो–विमानतळावर पहाऱ्यात वेळ काढल्यानंतर मंगळवारी रात्री दहा वाजता त्यांचे विमान कोलंबोहून सुटले आणि बुधवारी सकाळी दीड वाजता मुंबईला पोहोचले. बुधवारी रात्री नऊला ते ओबेरॉय हॉटेलमध्ये उतरल्याचे समजल्याने आम्ही त्यांना भेटायला गेलो.

स्लाव्हिन म्हणाले की, जयवर्धनने जरी दंगलीत एकूण ३०० लोकांची हत्या झाली असे म्हणले तरी एकट्या कोलंबोमध्येच ६०० तामिळी लोकाचे हत्याकांड झाले आहे. सिंहली लोकांपेक्षा लष्करानेच ह्या दंगलीत पुढाकार घेतला असे ते म्हणाले. कोलंबोमधील तामीळ उद्योगधंद्यांची लष्कराने तयार केलेली यादी आपण स्वतः पाहिल्याचे ते म्हणाले.

यू. पी. आय.ने दिलेली बातमी १०० टक्के खरी असली तरी ती आपण दिली नाही असे त्यांनी स्पष्ट केले. श्रीलंकेच्या सरकारमध्येच त्यांच्या वृत्तसंस्थेचा एक सोर्स (Source) आहे. तो यू. पी. आय.चा प्रत्यक्ष प्रतिनिधी नसला तरी स्वतःच्या जबाबदारीवर या वृत्तसंस्थेच्या नावावर बातम्या पाठवितो असे ते म्हणाले. बाहेरील वृत्तसंस्था आणि आपल्याकडील वृत्तसंस्था यामध्ये फरक असा आहे की, या वृत्तसंस्था बातम्या विकत घेऊ शकतात. आपल्याकडे सोर्सच पत्रकाराना विकत घेतात. असो.

स्लाव्हिन यांनी श्रीलंकेहून आणलेली वृत्तपत्रे पाहता तेथं खरोखरच दंगल झाली की नाही याबद्दल शंका निर्माण झाली. कोणतेही छायाचित्र नाही आणि बातम्या अगदी · त्रोटक. प्रसिद्धिमाध्यमावर तर इतके कडक नियंत्रण की, यू. पी. आय.ची बातमी बाहेर पडल्याबरोबर अधिकाऱ्यांनी आपल्याला अमेरिकन दूतावासाला फोनही करू दिला नाही. इतकेच काय तर बाथरूमला जातानाही आपल्यावर पाळत होती असे स्लाव्हिन म्हणाले. परिस्थिती आता नियंत्रणाखाली असली तरी तिचा परत केव्हा स्फोट होईल याचा नेम नाही असे त्यांना वाटते.

## पॉल... गांधी !

इथल्या भल्या धनिक–वनिक बाळाना सूर्याची पिल्ले दाखवणारे उस्ताद स्वराज पॉल सध्या मुंबईत तळ ठोकून आहेत. सर्वत्र भारतभर त्याचा संचार दणक्यात चालू आहे एकदम 'सत्राणे उड्डाणे हुंकार वदनि'–स्टाइल. या पॉलसाहेबाच्या मारुती-उडीमुळे कोणाकोणाच्या लंका भस्मसात होणार आहेत ते आपसूक समजेलच सध्या मात्र वर्तमानपत्रवाल्यानी शिमग्याला सुरुवात करून टाकली आहे 'पॉल बोले, पेपरवाले डोले' अशी स्थिती आहे.

गोंधळ उडवण्यात पेपरवाले तरबेज आहेत. त्यात पुन्हा हा स्वराज पॉलचा गोंधळ ! काही विचारू नका. ज्याला जे जे सुचतय, ते ते लिहिल जातय. काही जण पॉलसाहेबांच्या भजनी लागलेत. काही एकदम विरोधात. 'खबरदार जर टाच मारुनि' थाटात ! संपादकीय वाणा–विणा सावरत. बाकी उरले–सुरले सगळे काठावर उभे आहेत. म्हटल तर तळ्यात. म्हटलं तर मळ्यात ! काहीही चालेल !

बाकी काही म्हणा, तिथं लंडनमध्ये बसल्या बसल्या या पॉलसाहेबानी असा काही गुगली डाव टाकलाय की, देखते रहो ! सगळ्यांच्या नाकी नऊ आले आहेत. (टाटांना मराठी येत नसल्याने नाकी नऊ येणे म्हणजे काय असा त्यांना प्रश्न पडेल, म्हणून– नाकी नऊ येणे म्हणजे नाइन कम्स टू नोज. यातली नेमकी खोच अजित केरकर नीट समजावून सांगतील ! )

भरतराम–नंदा प्रभृतींना जेरीस आणल्यानंतर पॉल आता टाटा, महिंद्र आणि जैन याच्या नाकाला बुडबुडे आणणार आहेत. थोडक्यात ट्रेलर संपला असून मूळ पिक्चर आता सुरू होणार आहे. पेपरवाले बेचक्या घेऊन हजर आहेतच !

कोणी काही म्हणो हा पॉल एकदम फंटुश माणूस आहे. साक्षात इब्लिस. 'दिसायला आपल्या बाबासाहेब भोसल्यांसारखा. बोलायलाही तसाच. उत्तरं कशी एकदम थोबाडीत दिल्यासारखी. पुन्हा ते लाघवी हसू. ( ते म्हणजे भोसल्यांचं हसू नव्हे. ) इंदिरा गांधींच्या भोवती ' आटला आटला पाणी गोल गोल राणी ' खेळणाऱ्यांच्या तोंडावर असंच हसू असतं.

परवा पॉलसाहेबांनी रोटरी क्लबच्या सभेत भाषण केलं. ताजमध्ये झालेल्या या सभेला बऱ्यापैकी गर्दी होती. सगळ्यात मजा आला तो प्रश्नोत्तरांच्या कार्यक्रमाचा. पॉल प्रश्न झेलण्यात मातब्बर; पण काही ठिकाणी तेही कॅच-आउट झाले. उदाहरणार्थ–

: टाटा–बिर्लांना आपण आता धडा शिकवायला निघाला आहात. इतकी वर्षं झोपला होतात काय ?

: इंग्रजांनी आमच्यावर २४७ वर्षे राज्य केलं. आपण ब्रिटनचे नागरिक आहात. आम्हाला ही तुमची गुलामगिरी आवडणार नाही.


भारतातले सगळे जाचक व्यापारनिर्बंध सहन करून आपण इथे सचोटीने व्यापार करू शकाल काय ?

: आपल्या या भारत-भेटीचा खर्च कोण करतंय ?

काही प्रश्नाची उत्तरं सडेतोड आली. काही ठिकाणी पॉल गडबडले. जिथे गडबडले तिथे रोटरी संयोजकानी टाळ्यांचा खास राखीव कोटा पुरवून पॉलना सांभाळून घेतलं. हे तर चालायचच; पण या सभेत एक एकदम नवी गोष्ट कळली. ती ही की, पॉल अजूनही आपल्या लंडनमधल्या फ्लॅटचा हप्ता भरतायेत आणि ते आपल्या मुलाच्या कंपनीत नोकर आहेत आणि हो– त्यांना भारतीय जनतेविषयी अपार प्रेम आणि जिव्हाळा आहे.

पुढच्या भारतभेटीला स्वराज पॉल खादीचा पंचा लावून नाही आले म्हणजे मिळवली ! तेही शेवटी व्यापारीच. आज काय 'ह्या' गांधी, तर उद्या ते घेण्डी. सोयीचा मामला. पाहिजे त्याच्या नावाने बोंबला !

–विष्णू जयदेव



# आता तर मारवाच अंधारात विलीन झाला....

संजय संगवई

पावसाळी सांजवेळ दाटून आलेली असते. अंधार गडद होत जातो. झरझरत्या धारांबरोबर निषाद–कोमल ऋषभाची आस लागून राहते. डोंगरदरीतनं, रानातनं अंधाराबरोबर हा मारवा अंगअंग व्यापून राहत असतो. षड्जाचा आधार नाही. उदासवाणा; पण आवेगानं थरथरणारा गारवा वाढत्या अंधःकारात विरून जातो.

वसंतराव देशपांडे आणि मारवा यांची जातकुळीच एक होती.

वाटेल त्या स्वरांच्या रानात बेधडकपणे जाणार, हवं तसं सुरांना वाकवणार, पाहिजे तो स्वर–श्रुती–कणस्वर पाहिजे त्या मात्रेवर खेचणार आणि हे सर्व अगदी लयीत–सहजगत्या झोकदारपणे.

कुठला आधार न घेता सुरांच्या धुंदीतच, काहीसा आक्रस्ताळा हा कलावंत होता. पूर्ण बाज जर पाहिला तर आठवण यावी बडे गुलामअली खांसाहेबांची. सुरांबरोबर अनेक प्रकारचं नातं निर्माण करण्याचं त्यांचं कसब थेट त्याच वळणाचं, कधी लाडी–गोडीने एकएक स्वराला कुरवाळत, गोंजारत निघायचं, मध्येच फिरत घेऊन त्याची थट्टा करायची, आलापीमध्ये त्याला आदर द्यायचा, भिन्न संगती जोडायच्या. कधी त्या नेहमीपेक्षा वेगळ्याच ठेवायच्या–कधी रूढ चलनच बदलून वेगळ्या वाटेनं न्यायचं आणि एखादा प्रचंड धबधबा कोसळावा तशा स्वरावर समेवर उतरायचं. वसंतराव अशा मनमुराद गायकीचे. नेहमीचे नियम, पोटनियम, कलम हे सुरांच्या हुकुमतीत राहणाऱ्यांसाठी. सुरांवर ज्याचा हक्कच आहे त्याच्याबाबत हम करे सो कायदा हेच खरे.

मागच्या बुजुर्गांनी, घराण्याच्या संस्थापकांनी हेच केलं. आपल्याला हवं तसं गाणं तयार केलं; पण प्रामाणिकपणे. वसंतराव, तुम्ही काही स्थापण्याच्या भानगडीतच पडला नाही! बस्, सुरांचं विश्वरूपदर्शन करून घेण्यात व ते जास्तीत जास्त परिपूर्णपणे व समाधानकारकपणे आमच्यापर्यंत पोचवण्याची तुमची कोशिश होती.

...एकदा भल्या पहाटे झोंबणाऱ्या थंडीत तुमचा भटियार काय लागला होता! धैवताचा कण देऊन कोमल ऋषभावर आदळण्यामुळे आधीच कुडकुडलेले जीव एकदम थर्रावून जात. अशाच पहाटे अगदी रमून, स्वतःचा आवडता सालगवराळी गायलात तुम्ही. ऋषभ, गंधार, पंचमाची पेंगुळलेली स्वरसंगती आणि मंद्रातली तुमची कामगत–थेट षड्जापर्यंत प्रथमच ऐकत होतो. त्यातील 'सुमिर साहिब सुलतान'. या चिजेत काय जोश असायचा! एक हात कानावर ठेवून अमूर्तात हरविलेले डोळे···आणि गेला आवाज तारसप्तकातील गंधाराच्या वर...नेहमीचंच दृश्य असायचं हे मैफिलीत बसलोय, बाजूला तबला, हार्मोनियम आहे, समोर श्रोते आहेत हे सर्व तुम्हाला जाणवायचं–वरवरच! आत नुसत्या स्वरांचं विश्व उलगडत रहायचं–भेदक डोळ्यांतून आतली हालचाल स्पष्ट दिसायची. तुम्ही यायचातच ते अंतर्मनात काही घोळवीत.

...असाच एका ज्येष्ठ कलावंताचा सत्कार होता. सत्कार, त्या कलावंताचे गाणे झाल्यावर तुम्ही आलात ते एका धुंदीतच! तंद्री लागल्याप्रमाणे जोगकंस लावला 'खेलन आयो री' फार सुषुप्तावस्थेत असल्याप्रमाणे एक एक आवर्तन घेत होता. तो जोगकंस नेहमीचा नव्हता. त्यात तुमच्या मारव्याप्रमाणेच कसला तरी शोध होता. एखाद्या बाज पक्ष्याच्या वेगात तो सुसाट सुटायचा; पण मध्येच एका जागी स्थिर अन् अचल. मग डौलदार वळसेवळणे घेत एका सुरावरून दुसऱ्यावर घसरणारा हा जोगकंस आयुष्यात न विसरणारा क्षण आहे.

...वसंतराव, तुम्ही आक्रमक जोशीले गायक म्हणूनच जास्त प्रसिद्ध होता. तुमच्या ताना, बोलताना यांच्या प्रकारांना तर हार्मो-

नियममध्ये सामावून घेणारा, त्याच्या तुफान वेगाशी सामना देणारा कोणीच नव्हता ; परंतु सुरांचं सामर्थ्य त्याच्या लयदारपणात, संयतेत आहे हे तुम्हाला पुरतं उमगलं होतं. एका मैफलीत बरव्याचे विशुद्ध आलाप किंवा मधुकंसातील धागा–न्–धागा वेगळा करून दाखवणारी आलापी अविस्मरणीय आहे. संथ–निश्चलतेत प्रचड वेग, स्फोटक शक्ती असते हे पोचलेल्या कलाकारालाच जाणवते.

परंतु मैफिलीत आम्ही तुमच्याकडून अपेक्षा करायचो ती नाटचगीतांची. एकदा भल्या पहाटे झिलपसारखा अनवट राग तुम्ही सुदर सगती, सरगम, आलापीने रंगून गायला. ते सपल्यावर टाळ्या वाजवीत आम्ही काय मागणी केली–' नाटचगीत–नाटचगीत!'

तुम्ही त्या वेळी म्हणाला, 'अरे, इतकं चांगलं गायलो; आता नाटचगीत कशाला गायला लावता ?'

अहं स्वर्गं न मे दुःखं
अग्निदाहे न ताडने ।
एतद् तु मे महादुःखं
गुंजया तोलयन्ति माम् ॥

असं म्हटलंय् की, सोन्याला त्याच्या तापविण्याचे, ठोकण्याचे काहीच दु.ख नाही. एकच दु'ख आहे, ते म्हणजे गुंजेसारख्या क्षुद्र मापट्याने त्याला मोजतात!

बुवा, आम्ही तुमची, तुमच्या गळ्याची अशीच अवहेलना केली. पदोपदी इतकी की, तुम्हालाही मी नाटचगीतापेक्षा इतर काही चांगलं गाऊ शकतो असं सांगण्यापर्यंत पाळी आणली !

जिथ कुठून सुरांचे कण जमवता येतील तिथं जीव लावून कंठगत करण्यासाठी तुम्ही गेला. स्वरसाजाची निरनिराळी जाळी तुम्ही विणत राहिला. असख्य दुर्मिळ, अनवट चिजा व राग; रसील्या व वेगळ्या ढंगांच्या ठुमऱ्या, दादरे यांचा तुमच्यापाशी खजिनाच होता, त्या सुरांच्या रानात हरवून जाण्याऐवजी कुडचातल्या रोपांवरच आम्ही समाधानी होतो.

तुम्हालाच काय, कोणाही गायकाला–किंबहुना सुराला–गायनाला आम्ही गंभीरपणे घेणारच नाही. त्या गाण्याने आमच्या हातापायांना ठेक्यात उचलले पाहिजे, स्वराच्या चमत्कृती पाहिजेत एवढ्याच माफक आमच्या अपेक्षा. तसा आमचा पणच आहे जणू !

–जाऊ द्या.

वसतराव, मैफिल संपली तर सपू द्या... धामदाने आता विश्रत आलीच होती. तानसुऱ्याच्या तानाही शिथिल झाल्या. मोगऱ्याच्या–बकुळीच्या माळा विस्तृतपणे पसरल्यात.

...पण बाहेर पहा ना, पावसाची धुन लागून राहिली आहे. संधिप्रकाशाचा कवडसा तेवढा दिसतो. दरीमधल्या जुईच्या रानात सर बरसून गेली. नदीपल्याडचा आषाढ–मेघ निःस्वनपणे काळोख आणत आहे. ओघळणाऱ्या थेंबांतून निषाद षड्जाची धून आहे... *आता या नीरवतेत वाट आहे* त्या संथ लयीतल्या व्याकूळ मारव्याचीच... ◻

## दाटून कंठ येतो, कानात येई गाणे !

चंद्रशेखर

शनिवार, तीस जुलैची सध्याकाळ. आनंदसाधनेची मांडामांड सुरू असतानाच आकाशवाणीवरून वार्ता ऐकू आली की, डॉ. वसंतराव देशपांडे याचे दु.खद निधन झाले. बाहेर पाऊस कोसळत होता. त्यापुढील तीन-चार तास केवळ वसंतरावांच्या सुरांच्या सोबतीत घालवले.

'दाटून कठ येतो, कानात येइ गाणे' अशी अवस्था झाली. मनात वसंतरावांची गाणी गुंजत होती आणि स्मरणात त्याची किती तरी रूपे दिसत होती. दिमाखात एण्ट्री आणि टाळी घेणारे खाँसाहेब, मैफलीत तंबोऱ्याचा स्वर किलकिल्या नजरेने जोखणारे डॉ. वसंतराव, छातीवर 'गायक' हा बिल्ला लावून इचलकरंजीच्या साहित्य-समेलनात वावरणारा पु लं. चा जिवलग सुहृद वसंता, निरागस शरणभावाचे दर्शन घडवणारे अष्टविनायकमधील गवई भोसले, एका खासगी बैठकीत कोणी तरी अनिल कवीची '*बगळ्याची माळ*' *गावयास सागताच* 'मैफल फार पुढे गेली बाप्पा' असे आर्जवाने सागणारे वसंतराव, रस्त्यावर खाली मान घालून आपल्याच तंद्रीत चालणारे वसंतराव, 'हं घ्या वष्ट' म्हणून बोलता बोलता गाण्याचा मुखडा उचलणारे नाटचसगीतसम्राट वसंतराव देशपांडे !

वसतरावाची दृश्य–रूपे जेवढी लोभस तेवढीच त्यांची श्राव्य–रूपे मोहक आणि मिजासखोर ! खरोखरी मराठी संगीतक्षेत्रात मोहकता आणि मिजास कोणी आणली असेल तर ती वसंतरावांनी. त्यांच्या गाण्यात द्राक्षाची मोहकता आहे आणि पिस्त्याची मिजास ! त्यांच्या गाण्याचे वर्णन करू जाता एक खत जाणवते ती ही की, शब्दाचे सौंदर्य सूर यथार्थपणे व्यक्त करू शकतात, वाढवू शकतात; पण सुरांचे सौंदर्य मात्र शब्द व्यक्त करू शकत नाहीत. उपमा–उत्प्रेक्षाचा आधार घेऊनसुद्धा सुराचे घोस हाती लागत नाहीत. वसतरावाच्या गाण्याचे वर्णन करायला भाषा हवी गडकऱ्याची !

विंदा करंदीकरांनी म्हटले आहे की, केसरबाईंचा 'आ' कार आकाशातला ! त्याच चालीवर बोलावयाचे तर वसंतरावाचा 'आ'कार आपलेपणातला आहे. हे आपलेपण आक्रमक आहे, आर्जवी आहे आणि आनंददायक आहे. भावस्थितीत भिजलेले सूर आणि आत्मस्थितीत आंदोलणारी लय ही वसंतरावांची खास मिरास होती. रागसंगीत, नाटचसगीत आणि भावगीत या साऱ्यावर वसतरावाची मुद्रा छापलेली होती. त्यानी गाण्याच्या साम्राज्यात स्वतःचे नाणे पाडलेले होते यात काही शंका नाही.

वसंतरावी सूर मोठे मायावी होते. कधी फुलपाखराप्रमाणे ते सूर लयीच्या ताटव्यांवरून अलगद भ्रमण करीत तर कधी पूजेच्या खानदानी खंजिराप्रमाणे तीक्ष्ण तेज उधळीत. कधी नक्षीदार मेंदीचे सुखद गुपित कानात कुजबुजत, तर कधी वर्षाच्या प्रणयी विद्याचा संकेत मनाला पटवीत. किनखापी महावस्त्राचा कधी थाट तर कधी चुणीदार मलमली सळसळ. सूर वसंतरावाना निखालस

वश होते. त्यांच्या अदबशीर आज्ञेप्रमाणे हे सप्तसूर रूपे बदलीत. सुराचा हा बहुरूपी खेळ व लयीचा बहुपेडी मेळ आता कुठे शोधायचा ? स्फटिकाप्रमाणे स्वच्छ शब्दोच्चार हेही वसंतरावांचे खास वैभव होते. 'हातात बाळपोथी, ओठात बाळभाषा ' या ओळीमधील भाषा या शब्दाचा उच्चार विसरणे दुरापास्तच.

वसंतरावांच्या गाण्यात जे भाव-आविर्भाव भेटत त्यांची ओळख सलामीतच पटून जाई: 'मानिली आपुली ' मधील समर्पित व निःस्वार्थी प्रेमभावना, बगळ्यांची माळ मधील आर्त स्मरणकल्लोळ, 'वाटेवर काटे वेचीत चाललो ' मधील निस्संग सोशिकता, 'शतजन्म शोधिताना ' मधील जीवघेणा शोध, 'मृगनयना रसिक मोहिनी ' मधील जाणता रसिकभाव, 'घेई छंद' मधील अनिवार तृष्णा, 'सुरतपिया ' मधील प्रेमवेडे कौतुक !


वसंतरावाचे गाणे ऐकण्यासाठी बेगम अख्तरसाहिबांनी त्यांच्या ऑफिसला 'मदर सीरियस ' अशी तार करून लखनौला बोलावून घेतले होते. आता आम्हाला वसतरावांचे गाणे ऐकायचे झाले तर कोणाला तार करायची ? असे रसिकांना वाटणे साहजिक आहे; पण सुरांची सोबत अशी संपत नसते. त्यातून वसंतरावाचे गाणे म्हणजे खांद्यावर हात टाकून गप्पा मारणाऱ्या जिवलग स्नेह्यासारखे. त्यांच्या असामान्य शास्त्राधिकाराचे ओझे त्यांच्या गाण्यावर कधीच पडले नाही. त्यांच्या संगीताला म्हणूनच 'गायन ' ही रुक्ष संज्ञा कधीच मिळाली नाही. ते सदैव 'गाणे'च राहिले.

'गायन ' गाणाऱ्याबरोबर जात असेल कदाचित; पण गाणे मात्र ऐकणारे आहेत तोवर चालूच रहाते. वसंतरावांचे गाणे अचानक भेटणाऱ्या जुन्या दोस्ताप्रमाणे, आपल्याला मधूनमधून भेटत राहील हाच एक दिलासा. वसंतराव शरिराने आमच्यातून गेलात; पण 'परत्यापरी अता मी, येथे फिरून येणे ' असे मात्र मानू नका. तुमची मैफल आमच्या कानामनात सदैव रंगलेली राहील ! □

## उशिरा बहरलेलं झाड

संगीत आणि नाटक क्षेत्रात रसिकांच्या मनात खोलवर आपली प्रतिमा निर्माण करणाऱ्या डॉ. वसंतराव देशपांडे यांचे नुकतेच निधन झाले. त्यांच्यातील कलावंतमनाचा, दिलखुलास माणूसपणाचा घेतलेला वेध. पुढील अंकी.

—वि. भा. देशपांडे



## ह्या ना त्या निमित्ताने

# आणखी 'बोलत्या व्हा !'

फिरोझ रानडे

'नवीन नवीन कार्यक्रम काढण्यात आणि त्यांना योग्य नाव देण्यात पुण्याच्या लोकांचा कोणी हात धरणार नाही बघ !' श्यामने सकाळचा म. टा. वाचत-वाचत म्हटले.

असे म. टा. वाचत-वाचत म्हणणे हे श्यामचे कायमच चालू असते. आसाम-प्रश्नाबाबत सरकारचे कसे चुकले, पजाब-प्रकरण सरकारने कसे नीट हाताळले नाही, एशियाड खेळ उगाच घेतले, एक ना दोन. कोणताही विषय श्यामच्या म्हणण्यातून सुटत नव्हता. त्यामुळे राधाने तर आजकाल त्याच्या म्हणण्याकडे लक्षच द्यावयाचे नाही असे ठरवले होते.

पण श्याम काही तरी हात धरण्याबाबत बोलतो आहे हे तिच्या लक्षात आले व तिची उत्सुकता चाळवली गेली.

'कोणाचा कोणी हात धरला म्हणालात?'

'अग, कोणीही कोणाचा हात धरला नाही. मी म्हटले की, नवीन संस्था म्हणा, नवीन कार्यक्रम म्हणा काढण्यात व त्यांना अतियोग्य नाव देण्यात पुण्याच्या लोकांचा हात कोणीही धरणार नाही. हे वाच !'

राधाने श्यामच्या हातून म. टा. घेतला व ती वाचू लागली.

पुण्याच्या कोणा स्त्री-मुक्ती सस्थेने 'बोलत्या व्हा ' ह्या उपक्रमाची संकल्पना काढली होती. स्त्रियांना आपल्या वेदना सांगायला विश्वासाचे ठिकाण पाहिजे म्हणून ह्या कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली होती.

लेखाच्या सुरुवातीलाच स्त्री-मुक्ती हा विषय टिंगल-टवाळीचा समजला जातो वा त्यामुळे समाजात भयंकर स्वैराचार माजणार आहे अशी हूल तरी उठवली जाते वगैरे विचार व्यक्त केले होते.

'आता तर काय तुमच्या कुचकटपणाला भलताच स्कोप आहे.' राधा म. टा. परत करत म्हणाली, 'आधी पुण्याचे लोक व स्त्री-मुक्ती हा विषय मग काय विचारता? ह्या लेखात टिंगल-टवाळीबद्दल व स्वैराचार वाढेल म्हणून भीती दाखवली जाते ते खरेच आहे.'

'पण हे प्रत्येक लेखात लिहावयाचे व स्वत:चे कौतुक करून घ्यावयाचे ! जगात कोणत्या चांगल्या कार्यक्रमाची टिंगल-टवाळी झाली नाही ? महात्मा गांधींच्या खादीची, त्यांच्या टकळीची, उपासाची तर टवाळी झालीच; पण त्यांच्या सत्य-अहिंसेची

पृष्ठ ३२ वर

मुक्ताफळे

# एक लढा
## १९७२ ते २०५०

वृत्तपत्रातील कात्रणांतून महाराष्ट्रातील एका महत्त्वपूर्ण लढ्याचा मागोवा घेण्याचा हा प्रयत्न आहे.

**आमच्या वार्ताहराकडून**

मुंबई : स्त्रीने विवाहानंतर केवळ पतीचे आडनाव न स्वीकारता, त्याचबरोबर माहेरचे आडनावही आग्रहाने लावावे असे प्रतिपादन दूरचित्रवाणीच्या 'सुंदर माझे घर' या कार्यक्रमात नुकतेच करण्यात आले. येथील सर्व महिलामंडळांतून यावर उलटसुलट चर्चा सुरू आहे. पुरुषाच्या वर्चस्वाविरुद्ध सुरू झालेल्या या लढ्यात, सासरच्या नावाबरोबर माहेरचे आडनाव लावण्याचा आग्रह धरणे हे महत्त्वाचे पाऊल आहे, असे सर्वत्र बोलले जाते.

(दैनिक 'लोकसत्ता' १०.१०.१९७२)

**नांदा सौख्य भरे**

पुणे : येथील सुप्रसिद्ध समाजसेविका सौ. अरुंधती साठे–कुलकर्णी व त्र्यं. गो. कुलकर्णी यांची कन्या चि. सौ. सुषमा साठे–कुलकर्णी हिचा विवाह चि. प्रशांत काळेगोरे याच्याशी नुकताच संपन्न झाला. सौ. अरुंधती–साठे कुलकर्णी या सेवादलसैनिक आहेत. तसेच चि. प्रशांतचे आजोबा हे पूज्य सानेगुरुजींच्या प्रेमातले होते. आम्ही सौ. सुषमा साठे–कुलकर्णी-काळे–गोरे याना शुभेच्छा व्यक्त करतो.

( साप्ताहिक साधना १४.५.१९८२ )

**पोस्टखाते लक्ष देईल काय ?**

संपादक 'महाराष्ट्र टाइम्स' यांसी–

आपले एखादे पत्र पोस्टाने पोचायला वेळ लागला किंवा ते गहाळ झाले तर समजण्यासारखे आहे. म्हणून आम्ही अलीकडे त्याच मजकुराची दहा–बारा पत्रे निरनिराळया पेटयांतून टाकतो म्हणजे त्यातील निदान एक तरी वेळेवर पोहोचतेच; पण वेळेवर पोहोचलेले पत्र जर आपल्याला परत न मिळता, सर्वत्र हिंडून सात–आठ कुटुंबांनी ते वाचून नंतर आपल्याकडे आले तर काय वाटेल याचा पोस्टखात्याने विचार करावा. आम्हाला नातू झाल्याचे २०.१.२०१० चे पत्र, सात-आठ घरात फिरून शेवटी आमच्याकडे १.२.२०१० ला पोचले. आम्हाला नातू झाला ही गोड बातमी इतरांना आधी कळावी व शेवटी आम्हाला, याला काय म्हणावे ? या गलथान कारभाराला जबाबदार कोण ?

आपली

सौ. सौदामिनी साठे-कुलकर्णी–काळे–गोरे पटवर्धन देशपांडे–वर्तक,

**पोस्टखात्याचा खुलासा**

संपादक 'महा. टाइम्स' यांसी,

आपल्या पत्रात प्रसिद्ध झालेल्या तक्रारीबद्दल आम्ही खात्यामार्फत चौकशी केली. सदर पत्र त्याच सोसायटीत रहाणाऱ्या, साठे, गोरे, पटवर्धन वर्तक ही आडनावात आडनावे असलेल्या कुटुंबात फिरून शेवटी ते सौ. सौदामिनी साठे–कुलकर्णी... वगैरे यांच्या घरात पोचले याबद्दल पोस्टखाते दिलगीर आहे. याबाबत पोस्टमन अर्जुन गायकवाड–कांबळे–शिंदे–पवार याला योग्य ती समज देण्यात आली आहे.

अरुण प्रधान–वैद्य–तळपदे–दिघे
(जनसपर्क–अधिकारी पी अॅन्ड टी डिपार्टमेन्ट २४.२ २०१०)

**पहिल्या पन्नासांचा जाहीर सत्कार**

मुंबई : यदाच्या सालात परीक्षेत पहिल्या पन्नासांत आलेल्या विद्यार्थी–विद्यार्थिनींचा सत्कार समाज कल्याण खात्याच्या मंत्री सौ. मनकर्णिका–पाटील–भोसले जाधव–चव्हाण–शिंदे–भोसले–पाटील, चव्हाण–शिंदे–जाधव यांच्या शुभहस्ते नुकताच पार पडला. हा सोहळा सुमारे पाच तास चालू होता, प्रत्येक विद्यार्थ्याचे नाव वाचून त्याला मंत्र्याच्या हस्ते पुष्पगुच्छ मिळेपर्यंत अर्धा तास लागत होता. समाज कल्याण खात्याचे सचीव मंगेश माणगे–तेलंग–देशपांडे–कर्णिक–कामत–रेगे–तेलग– कुलकर्णी– देशपाडे– कामत– कर्णिक, याना पहिली वीस नावे वाचल्यावर मूर्च्छा आल्याने समारंभात थोडा विक्षेप आला; परंतु उपसचिवांनी प्रसंगावधान राखून पुढची नावे न दमता, न चुकता मोठयाने वाचली याबद्दल त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे.

( दैनिक नवशक्ती : ४.६.२०३० )

**निवेदन**

व्यवस्थापक 'सकाळ' प्रा. लिमिटेड यानी असा निर्णय घेतला आहे की, कागदटंचाईवर उपाय म्हणून यापुढे, बातम्यात वा लेखांत कुणाचेही आडनाव न देता, फक्त पहिले नाव दिले जाईल. यामुळे किंमत न वाढवता, वाचकांना आहे त्याच किंमतीत जास्त मजकूर देता येईल. सकाळवरील वाचकांचा लोभ तसाच राहील अशी अपेक्षा आहे.

( दै. 'सकाळ' १–१–२०४० )

**संपादक 'सकाळ' यांस,**

आमच्या गावातील सौ. सिंधू या विवाहित महिलेवर जो सामुदायिक बलात्कार झाला त्याचे वृत्त देताना, आपल्या वार्ताहराने आपल्या १०–५–२०४० च्या पत्रात संशयितांची जी नावे दिली आहेत, त्यात सुधाकर असे नाव छापल्याने माझी विनाकारण बदनामी होत आहे. आमच्या गावात माझ्या माहितीप्रमाणे १४–१५ सुधाकर असतील. माझे चालू वय ७० असताना, अशा तऱ्हेची मानहानी माझ्यासारख्या निवृत्त प्राथमिक शिक्षकाला सोसावी लागत आहे. तरी माझे पत्र प्रसिद्ध करून, तो सुधाकर मी नाही, हे लोकाना कळवण्याची संधी द्यावी ही विनंती.

आपला

सुधाकर, निवृत्त शिक्षक
मु. पो. वडगांव

( अशाच मजकुराची आणखी १०–१२ पत्रे आली आहेत.स्थलाभावी या सर्वच सुधाकराची पत्रे प्रसिद्ध करणे शक्य नाही. संशयितांची छायाचित्रे मिळवण्याचा आम्ही प्रयत्न करीत आहोत. ती प्रसिद्ध झाली की संशयाला वाव रहाणार नाही.– संपादक)

**आमच्या वार्ताहराकडून**

मुंबई : स्त्रीने विवाहानंतर माहेरचे आडनाव, सासरच्या आडनावाबरोबर न लावता, फक्त सासरचे आडनाव लावल्यास सध्या गोरगरीब, अर्ध-अशिक्षित स्त्रियांना


कोर्टकचेऱ्यात जो त्रास होतो तो वाचेल असे मत सुप्रसिद्ध समाजसेविका व विचारवंत सौ. स्मिता आगाशे (या स्वतः फक्त सासरचेच आडनाव लावतात.) यांनी दूरदर्शनवरील मुलाखतीत मांडले. स्त्रियांचे जीवन सुसह्य करण्याच्या दृष्टीने सौ. स्मिता आगाशे यांनी ज्या सूचना मांडल्या त्यातली ही महत्त्वाची होती.

(दैनिक 'लोकसत्ता' ४.१०.२०५०)

(येत्या रविवारच्या अंकात आम्ही या विषयावर सौ. स्मिता आगाशे यांची खास मुलाखत प्रसिद्ध करीत आहोत.—संपादक)

—ग्यानबा

# ललित मुंबई



# पाळलेला समुद्र

वेळ संध्याकाळची. वार रविवार. दूरदूर्शनच्या हिन्दी चित्रपटातली मारामारी रंगात येतेय. बाळ-गोपाळ, आबाल-वृद्ध आणि इष्ट मित्र—मैत्रिणी इडियट—बॉक्ससमोर खिळून. रस्त्या—रस्त्यात सामसूम. चक्क दादरातसुद्धा कमी गर्दी.

मुंबईतली फिरायला जाण्याची ही वेळ सध्या आदर्श आहे.

आकाश भरून आलं होतं. समोरचा समुद्र अथांग वगैरे. किनाऱ्याजवळचा समुद्राचा काळपट तपकिरी वर्ण आणि आत आत निळसर हिरवट. त्यामागे बराचसा निळा. इतका की ढगाळ आकाश रंगात बुडून जावं. क्षितिजाच्या नावानं नुसताच धूसर काळसरपणा; पण क्षितिज तुम्हाला शोधायचंच असेल तर एखादी पांढरीधोप लाट चुकारपणे मधूनच येते आणि या सावळ्या अखंडपणाला छेदून जाते; पण किती? क्षणभरच; हवेत थोडासा उबदार खारटपणा. मोकळ्या हवेतही किंचित घुसमटायला लावणारा दमटपणा.

म्हणता म्हणता दूरवर पावसाची तिरिप लपलेल्या सूर्याच्या किरणांच्या झोतामध्ये चंदेरी दिसते. पाऊस झपाट्यानं पुढं पुढं सरकतो. अगदी समोर येऊन ठेपतो. पावसाचे टपोरे थेंब अंगावर येतात. वाऱ्याचाही वेग वाढतो. वाऱ्याच्या फटक्यांची आणि पावसाच्या थेंबांची स्पर्धा होते. भिजणारे कपडे अंगाला चिकटू पहातात आणि उडतातही. किनाऱ्यावरच्या उरल्यासुरल्या नारळांच्या झावळ्याही अचानक जाग्या होतात. वाऱ्याचा गोंगाट सुरू होतो. आता मात्र पाऊस झेलवत नाही. आडोसा शोधावा लागतो. पाऊस खूप वाढलाय. किनाऱ्यावरच्या तुरळक वर्दळीचीही पांगापांग झालेली.

हा आहे जुहू—पार्ल्याचा किनारा. ऐन मे महिन्यात येऊन पहा. माणसांनी नुसता फुललेला असतो. इथे रोज संध्याकाळी जत्रा असते. प्रथमच समुद्र बघणारे नवखे, मोठमोठ्या कुटुंब-कबिल्याबरोबर आलेली गुजराथी माणसं आणि त्यांचं वाळूतलं रिंगण. फरसाणाचे डबे उघडलेले असतात. मनसोक्त गप्पा रंगात येतात, तर एखादा पारशी आपला लांबलचक झगला घालून तरातरा चालत जातो. मुला—मुलींचे खेळ चालू असतात. लहान मुलांना पाण्यात घेऊन जाणारे बाप आणि किनाऱ्यावर उभ्या राहून ओचे खोचून त्यांना दटावणाऱ्या आया! रात्र होण्याची वाट पहात कोपऱ्या—कोपऱ्यात जागा पटकावणारी जोडपी!

या सगळ्या मानवी गदारोळात तो समुद्रही इवलासा आणि दुय्यम दर्जाचा होतो; पण पावसाळ्यातल्या संध्याकाळचा समुद्र मात्र चांगलाच आडदांड असतो. हुकुमीपणानं किनाऱ्यावर आक्रमण करून त्याला तो थोडकंसंच करून सोडतो.

आता किनाऱ्यावर वाळूत पाय रोवून बसलेल्या भेळेच्या गाड्यांच्या आडोशात पेट्रोमॅक्सचा कंदील पेटतो. उजेडाचं ते थोडंसं थारोळं क्षुल्लक वाटतं आणि तो भेळवाला राधेश्याम नाही तर गंगाप्रसाद निमूटपणे गिऱ्हाइकाची वाट पहातो. त्या गाडीखाली बसलेल्या कुत्र्याच्या वेटोळ्यालाही कुणी हाकलत नाही. कदाचित रात्रही पडलेली असावी. इथे फक्त अस्तित्व जाणवतं आदिम अशा समुद्राचं.

जुहूच्या किनाऱ्यावर या उघड्या-वाघड्या समुद्राला साथ करणारी नारळाची घनदाट हिरवी वनं आता विरळ होत चालली आहेत. अनेक मजली अमुक-तमुक तारांकित हॉटेलं आणि उघडझाप करणारे त्यांचे निऑन साइन्सचे दिवे. त्यांच्या लेखी समुद्र म्हणजे नुसता बॅक—ड्रॉप; पण किनाऱ्यावरच्या लाकडी बाकड्यांना मात्र समुद्र खूपच जवळचा असतो. भेळवाल्यांनी टाकलेली, वाळूत रुतलेली, एकजात डुगडुगती ही बाकडी. रात्र चढते आणि पेट्रोमॅक्सच्या प्रकाशातल्या भेळेच्या गाड्या वाट शोधत निघून जातात आणि मग निर्जीव निष्ठेनं लाटांमध्ये बुडणारी, ऊन-पाऊस खाणारी, रात्रीच्या वेळची रिकामी बाकडी विटलेल्या वस्त्रासारखी वाटतात.

समुद्राचं हे दर्शन—त्यातला कधीकधी उतू जाणारा माणसांचा उत्साह, गर्दी हे सारं धरलं तरीसुद्धा मुंबापुरीच्या यांत्रिकपणाला छेद देऊन जातं. तसे मुंबईचे समुद्रकिनारे पाच—सहा. हे म्हणजे अधिकृत. तसा तर समुद्रानं साऱ्या मुंबईलाच विळखा घातला आहे. प्रत्येक किनाऱ्याला वैशिष्ट्य वेगळं आणि गिरगाव, दादर—चौपाटीचं वैशिष्ट्य काय म्हणून विचाराल, तर त्यांची वैशिष्ट्यहीनता हेच! तरीही वैशिष्ट्य शोधायचं तर गिरगाव—चौपाटीला वाळू शोधावी लागते आणि दादरला अरुंद किनारपट्टीवरची घाण! वांद्रा आणि महालक्ष्मीचे खडकाळ किनारे. या सर्व किनाऱ्यांमध्ये एक महत्त्वाची गोष्ट सामायिक आहे— तिथे रात्री जाणं धोक्याचं असतं!

समुद्राला लगटून चालण्याचा वेगळाच आनंद मरीन ड्राइवच्या किनाऱ्यावर मिळतो. मलबारहिल हे एक टोक, तर दुसरं टोक म्हणजे ओबेराय टॉवर्स. ओबेरॉय टॉवर्सच्या सर्वात वरच्या मजल्यावरच्या सुपरक्लब-मध्ये बसून दिसणारा चौपाटीचा समुद्र म्हणजे खळगाभर पाणी वाटतं. नव्यानं जाणवतं ते म्हणजे मुंबईचाही समुद्र देखणे-पणानं निळा आहे.

## यांत्रिकपणाला छेद ?

समुद्राला भर घालून अडवल्यामुळे त्याचा या मरीन ड्राइवच्या बंधाऱ्यांवर विशेष राग असावा. भरीस भर म्हणून बंधाऱ्याजवळ प्रचंड वाय आकाराचे सिमेंटचे ठोकळे टाक-लेले. या फूटपाथवर 'चना जोर गरम' सोडून आणखी कुणाचं अतिक्रमण झालेलं नाही. अजून तरी ! ओबेरायच्या पायथ्याशी पाय-घोळ पांढरे झगेवाल्या अरबांची वर्दळ. त्यांच्या भोवतालच्या भिकारी पोरा-टोरांचा गलका. कधीकधी अरब नोटा वाटताना पाहून सगळंच वातावरण सुरस चमत्कारिक होऊन जातं, अरेबियन नाइटस्सारखं.

ब्रिटिशांनी याला क्वीन्स-नेकलेस म्हटलं. पण तेव्हाच्या निळ्या मर्क्युरी प्रकाशाचे दिवे विझले आहेत आणि सोनेरी प्रका-शाचे सोडियम दिवे आता झगमगतात. या दिव्यांची फिकट पिवळी प्रतिबिंबं रात्रीच्या काळोखात लाटा झेलतात. एरवी त्या प्रति-बिंबापलीकडे नुसताच काळोख असतो. कधीकधी मात्र खोल समुद्रात नांगरून पड-लेल्या बोटी आपल्या दिव्यांच्या आराशीनं उठून दिसतात !

मरीनड्राइवचा रात्रीचा समुद्र गूढ आणि अगदी काळोख्या रात्री भयाणही वाट-णारा, पण दिवसा मात्र, लाटा बंधाऱ्यावर येऊन आदळताहेत, खारे तुषार अंगावर शिंतडले जाताहेत अशा फूटपाथवरून चालणं म्हणजे जिवाची मुंबई वाटते !

असा हा समुद्र बांधावरून चालणाऱ्या चुकारवाटसरूंना कधीकधी गिळूनही टाकतो; पण तरीही त्याचं स्वरूप एकूण पाळलेल्या सिंहासारखंच. कोकणातल्या छोट्या-मोठ्या निर्जन किनाऱ्यावर भेटणारा रांगडा, न बाटलेला समुद्र मुंबईत भेटत नाही. अशा रांगड्या समुद्राचो गाज ऐकून सृष्टीतल्या एका आदिम अस्तित्वाच्या जाणिवेनं भारून जायला होतं. फ्रॉइडनं तर जीवनातल्या उत्कट अनुभवाला 'ओशियानिक फीलिंग' म्हटलं आहे. ही महासागरीय भावना असे आडवळणाचे समुद्रकिनारे देऊन जातात. मुंबईतल्या समुद्राकडून अशी उत्कटता मिळणं कठिणच.

इथे समुद्राकडे पाहिलं की, मनाला जाण-वते ती उदास प्रसन्नता नव्हे, तर एक उदास खिन्नता ! इथल्या अंतर्मुखतेत जाणवतं ते माणूस आणि निसर्गाचं व्यामिश्र नातं. निसर्गाची माणसावर मात करण्याची धडपड, निसर्गघटितांचं गणित मांडून निर्माण झालेलं सृष्टिविज्ञान, निसर्गातल्या अज्ञात, आकस्मिक गोष्टींचा अचूक वेध घेण्याची माणसाची धड-पड, अनादि कालापासूनची. अवकाशात सोड-लेल्या उपग्रहांनी धाडलेल्या छायाचित्रांनी मोठीच झेप घेतलीये. तरीही नैसर्गिक आपत्ती येतच असतात आणि या आपत्तींनी माणूस उध्वस्त होतो; परंतु फिनिक्स पक्ष्यासारखा फिरून उभाही राहतो.

हे सारं खरं आहे. त्याची ताकद, जिज्ञासा, राखेतूनही परत उभं राहण्याचा चिवटपणा हा मनुष्येतर प्राण्यांपेक्षा मनुष्यात किती तरी अधिक आहे. तरीही कधीकधी या समुद्राच्या काठी उभं राहिलं की असं वाटतं की माणसानं उभारलेलं हे इमले, सिमेंट-कॉंक्रीटची जंगलं हा सारा निसर्गावर अत्या-चार तर नाही ना ? आणि उलटून निसर्ग याचा सूड तर घेणार नाही ना ? त्या दृष्टीनं विचार करायचा झाला तर ही माणसाच्या स्खलनशीलतेची बीजं तर नाहीत ना ? माणसाची धडपड निरर्थक तर नव्हे ना ? मुंबईच्या धोधावणाऱ्या गर्दीच्या खुणा समुद्र-किनाऱ्यावरही दिसतात. इथल्या समुद्राशी वैयक्तिक पातळीवर संवाद नाही साधू शक-णार कुणी ! इथे मजा करता येईल; पण त्या वेळचा तो समुद्र, समुद्र नसेल. त्या केवळ तुमच्या पायाशी येऊन आदळणाऱ्या लाटा असतील. यांत्रिकपणाला छेद देत असला तरी हा समुद्र निसर्गाचा भाग नाही वाटत, समुद्र-पणाला परका झालेला शहराचाच एक भाग वाटतो तो.

म्हणूनच तर येणारी ही खिन्नतेची भावना गेटवेवरच्या गजबजत्या समुद्राकडे पाहून वाटणारी हुरहूर आणि माणूस — निसर्गसंबं-धात कुठे समतोल तर बिघडत नाही ना अशी व्यथा. टाटा थिएटरपर्यंत पसरलेले मरीनड्राइव हळूहळू सर्वच समुद्र हटवून, जमिनीवर हक्क शाबित करीत, कुलाब्या-पर्यंत तर पोचणार नाही ना, असा रास्त प्रश्न आणि मग इकडे माणसानं 'रि-क्लेम' केलेली जमीन, दांडगाईनं समुद्रानं परत कुठे तरी 'रि-क्लेम' केल्याच्या कानी येणाऱ्या बातम्या !

मुंबईच्या समुद्रकिनाऱ्यावर उभं राहिलं, की यांत्रिकपणाला मिळणाऱ्या या छेदाबद्दल आनंद मानावा की त्याच्या पाळीव मळ-कट पाण्यानं खिन्न व्हावं ? मला हा प्रश्न नेहमीच सतावत आला आहे.

—ललिता बर्वे


सहज परमार्थ साधा


**आपल्या निवडीची १५० रुपयांची दर्जेदार मराठी पुस्तके १०० रुपयांत मिळवा.**

शैक्षणिक आणि आरोग्यविषयक कार्यात साहाय्य करणाऱ्या 'गंगा-यमुना विश्वस्त निधी' या प्रमाणित सार्वजनिक धर्मादाय न्यासाला एका चांगल्या प्रकाशन संस्थेकडून त्यांच्या प्रकाशनाच्या काही प्रती भेट मिळाल्या आहेत. त्या वरीलप्रमाणे सवलतीने विकावयाच्या आहेत. व्यक्तिगत ग्रंथ-प्रेमी, वाचनालये, ग्रंथविक्रेते यासाठी खास सवलत.

मर्यादित प्रतीच उपलब्ध असल्याने पुस्तकांची यादी व योजनेचा तपशील आजच मागवा.

विश्वस्त, 'गंगा-यमुना विश्वस्त निधी', २०३१ सदाशिव पेठ टिळक पथ, पुणे ३०

# फिलिप्स



## कामगार अर्थवादी, नेते आशावादी, कार्यकर्ते निराश!

**सतीश जकातदार । दीपक देवधर**

' Poona Should not go Bombay way ' पुण्याच्या औद्योगिक शांततेविषयी आमच्याशी अनौपचारिक गप्पा मारताना एका प्रतिष्ठित कंपनीच्या व्यवस्थापनाने ही इशारेवजा खंत व्यक्त केली आणि खरोखरच गेल्या दोन–अडीच वर्षांत या ना त्या स्वरूपात प्रकट झालेला कामगारांमधील असंतोष नामोहरम करण्यात विविध कंपन्यांच्या व्यवस्थापनाचे चतुर डावपेच यशस्वी ठरले आहेत. तात्कालिक काळापुरता तरी हा असंतोष शमला आहे. बजाज टेंपोतील माघार, भारत फोर्ज, मॅथर प्लॅट आणि कूपरमधील दत्ता सामंतांच्या लढाऊ, कामगारांनी ' मागविलेल्या ' नेतृत्वाचे शिरकाण आणि गरवारे व टेल्कोतील कोणतीही मागणी मान्य न होता कामगारांनी लिहून दिलेली हमीपत्रे याच डावपेचाची बळी आहेत, तर ' फिलिप्स 'मध्ये व्यवस्थापनच कामगारांपेक्षा आक्रमक बनले आहे.

त्याचमुळे हे वाक्य ' मॅनेजमेन्ट–सर्कल 'मध्ये आज परवलीचा शब्द बनले आहे. टर्फक्लब किंवा बोटक्लबवरील मीटिंग असो, ब्ल्यू डायमंड किंवा अमीरमध्ये ' ॲडव्हान्स मॅनेजमेन्ट ' विषयी एखादा सेमिनार असो किंवा ' मराठा चेंबर्स 'मधील खलबते असोत; त्यांचा शेवट, निष्कर्ष याच वाक्यापाशी घुटमळतो आहे.

कामगार–चळवळीकडे, त्यातील बदलते प्रवाह याकडे जागरूकपणे आपल्या नफ्याच्या चष्म्यातून बघणाऱ्या पुण्यातील बड्या उद्योगसमूहाने व बहुराष्ट्रीय कंपन्यांनी हा नवा पवित्रा घेतल्याचे ऐकिवात आहे. त्याचमुळे काही दूरदृष्टी असलेल्या कंपन्यांनी आपला मोर्चा नाशिक, पैठणकडे वळविला आहे. या नव्या औद्योगिकदृष्ट्या अर्धस्पर्शित परिसरातील शक्यता पडताळून पाहण्यात काही कंपन्या गुंतल्या आहेत. व्यवस्थापनसंस्था आणि विविध कन्सलटन्सींमध्ये त्या दृष्टीने सर्वेक्षण चालू आहे.

काही कंपन्या संप असो–नसो एखादे निसटते निमित्त साधून टाळेबंदी करण्यास सरसावत आहेत, तर काही कंपन्यांनी आपल्या विस्तारयोजना थांबवून ' ऑटोमायझेशन ' करण्यास सुरुवात केली आहे. त्यातूनच कामगारकपात, स्वेच्छा–निवृत्ति देण्यात येत आहे. त्याला विरोध करणाऱ्या कामगारसंघटनांचे डावपेच धुळीस मिळविण्याचा पद्धतशीर, जाणीवपूर्वक प्रयत्न दिसत आहे. संप फोडणे, युनियनमध्ये फाटाफूट घडवून आणणे, मॅनेजमेन्ट–पुरस्कृत नेते आणि संघटना उभ्या करणे, संपाचे निमित्त साधून क्रियाशील, लढाऊ कार्यकर्त्यांचे शिरकाण करणे, गुंडगिरी, मारामाऱ्या घडवून आणून, त्यात

'फॅक्टरी' मध्ये अशांतता माजवून 'टाळेबंदी' ची नोटिस लावणे व कामगाराना पराभूत करून, त्यांचे नैतिक धैर्य खच्ची करून आपल्याला हवा तसा 'तोडगा' आकाराला आणण्यात 'मॅनेजमेन्ट'-मधील जपानी मेन्दू कामाला लागले आहेत.

एकीकडे कामगार-चळवळीला वेठीस धरण्यासाठी तिला वेसण घालण्यात मॅनेजमेन्ट गुतली असतानाच कामगार, त्याच्या संघटना आणि त्या सघटनाच्या नेतृत्वाची अवस्था मार खाऊन उघळलेल्या 'जरीला' सारखी झाली आहे. कोणताच धरबंध उरलेला नाही. कावळघाच्या छत्रीसारख्या नव्या संघटना जन्माला येत आहेत आणि त्यांच्या 'छत्रीधारी' पुढाऱ्यानी कामगारांच्या समस्या सोडविण्याचा बहाणा करून अनेक दुकाने थाटली आहेत. राजकीय संघटना कामगाराच्या जादा पैशाची अपेक्षा पूर्ण करण्यात मशगुल झाल्या आहेत, तर अतर्गत सघटना फॅक्टरीपुरत्याच समस्याभोवती पिंगा घालत आहेत. अंतर्गत सघटनांचे प्राबल्य मात्र वाढत आहे.

गिरणी-कामगारांच्या प्रदीर्घ सपाच्या पार्श्वभूमीवर, वैयक्तिक दत्ता सामंतांचे नसले तरी त्यासारख्या लढाऊ, काहीशा दहशतवादी नेतृत्वाचे आकर्षण वाढते आहे फॅक्टरीपातळीवर त्यासारखे पण थोडधाशा स्वैर व स्वयंभू नेतृत्वाला उधाण आले आहे. दादागिरी, गुडगिरी, वैयक्तिक श्रेष्ठत्व, राजकीय-अराजकीय अहकार गोजारले जात आहेत. युनियन टिकविण्यासाठी किंवा आपले नेतृत्व शाबित राहावे म्हणूनही संप होत आहेत अथवा कामगाराच्या आर्थिक अपेक्षा पूर्ण न केल्यास आपल्या हातातून हे 'हुकमी बेट' जाईल या भीतीपोटी प्रदीर्घ संप केले जात आहेत.

पुणे औद्योगिक-परिसरात धावता फेरफटका मारल्यास, कंपनीच्या गेटवरील सुरक्षा-अधिकाऱ्याचा डोळा चुकवून फॅक्टरीच्या आत कानोसा घेतल्यास याच गोष्टी बिनदिक्कतपणे घडताना दिसत आहेत, घडत आहेत, फक्त त्यावर फसव्या शाततेचे एक ठिसूळ आवरण आहे इतकेच !

¤

पूना-बॉबे रोड, भोसरी, पिंपरी, चिंचवड, लोणी, हडपसर, नगर रोड या पुण्याच्या अवती-भवती आक्राळ-विक्राळ स्वरूपात पसरलेल्या औद्योगिक साम्राज्यात 'गुरुवार' वगळता चकरा मारल्यास अशांततेचे चेहरे हिंडताना दिसतात. तसे या परिसरात फारसे लाल बावटे दिसत नाहीत आणि दिसलाच तर त्या शेजारी खोवलेले एखादे भगवे निशाणही दृष्टीस पडते. मोर्चे, संप, घेराओ यानी या साम्राज्यात अगदी अनागोंदी माजली आहे, असेही नाही. कुठे तरी तुरळक प्रमाणात हा सघर्ष आकार घेत आहे. शे-दीडशेच्या गेट-मीटिंग्ज चालू आहेत, तर कुठे चहाच्या सुट्टीत घोषणा दिल्या जात आहेत. बाकी युनियनच्या ऑफिसवर नेहमीची 'कोर्टबाजी' अथवा तक्रार-निवारण चालू आहे.

प्रत्येक कारखान्याच्या खाजगीपणाला कुंपण घालणाऱ्या उंच उंच भिंती रंगल्या आहेत, नाही असे नाही; पण त्या रंगलेल्या आहेत. कारण जुन्या घोषणा अद्याप पुसलेल्या नाहीत. म्हणून 'संप बदी विधेयक मागे घ्या' यासारख्या जनता पक्षाच्या राजवटीतील घोषणांनीच या भिंती अडविल्या आहेत. पुणे औद्योगिक परिसरातील कम्युनिस्ट पक्षाची त्रोटक, मोजकी ताकद दाखविणारी 'जगातील कामगारांनो एक व्हा' ही घोषणा या विविध घोषणांच्या गर्दीत डेव्हिड ब्राउनच्या भिंतीवर केविलवाणी दिसत आहे. उलट या भिंतीवर कामगारचळवळीतील फाटाफुटीचे, जातीयतेचे, भ्रष्ट राजकारणाचे चित्र रेखाटले आहे, तर या भिंतीला लागूनच उत्पादनवाढीच्या, शिस्तीच्या सरकारी धोरणाची कामगाराना जाणीव करून देणारे 'मॅनेजमेंटचे' फलक मात्र ताठ मानेने उभे आहेत.

मात्र या भिंतीच्या आत नोटिसबोर्डावर चार्जशीट, सस्पेंशन्स, उत्पादनवाढीचा आदेश, कामगारकपातीच्या सूचना, डिपार्टमेंटल इन्क्वायरी, कामगारांना समज देणारे इशारे या नोटिसांनी खच्चून गर्दी केली आहे.

¤


तो कोरडा, निष्ठुर नोटिसबोर्ड आक्रमक बनला आहे, तर कामगारामधील असंतुष्ट आत्मा अधिकाधिक लढाऊ नेतृत्वाच्या शोधात आहे आणि नेमक्या या नाजूक, स्फोटक पार्श्वभूमीवर नाशिकफाटयापासून काही मैल आत व सोलापूररोडवरून काही कोस अंतरावरील भोसरी व लोणीतील 'फिलिप्स'च्या अद्ययावत कारखान्यामध्ये एक वेगळेच नाटय घडते आहे !

पुण्यातील 'बुजुर्ग' कारखान्यांमध्ये गणल्या जाणाऱ्या 'फिलिप्स' मधील कामगार गेले काही महिने मॅनेजमेंटच्या विरोधात या ना त्या स्वरूपात कृती करत आहेत. कधी ते आचरट वर्तन करून मॅनेजर्सना शिवीगाळ करत आहेत तर कधी युनियनचा आदेश घेऊन संघटितरीत्या घोषणाबाजी, गो-स्लो करत आहेत गेल्या काही दिवसांत तर या घटनानी अधिकच वेग घेतला आहे युनियनच्या प्रत्येक कृतीला सस्पेंशन्स, चार्जशीटचे चोख प्रत्युत्तर मिळत आहे. 'फिलिप्स'चे व्यवस्थापन अधिकच आक्रमक बनल्याचे दिसत आहे.

आतरराष्ट्रीय व देशी पातळीवर हुकमी बाजारपेठ व पत असलेल्या या बहुराष्ट्रीय कपनीत नेमके काय चालले आहे ? २०-२५ वर्षांपूर्वी सुरू झालेल्या व मुख्यतः 'इलेक्ट्रॉनिक' साधने बनविणाऱ्या या कारखान्यातील कामगाराना किमान ११५० पगार आहे. कामगारांच्या म्हणण्यानुसार कॅन्टिनला उत्तम जेवण आहे. वाहतुकीच्या सोयी, सुविधा, एल. टी, पेन्शनस्कीम, अद्ययावत पाळणाघर, अनेक वेलफेअर सवलती, ३५ टक्के बोनस (इतर फॅक्टऱ्यात १८ ते २० टक्के आहे) कामात सुसह्यपणा आणण्यासाठी अत्याधुनिक तंत्रे आणलेली आहेत. इतके असूनही केवळ १५ रुपये मासिक शैक्षणिक भत्ता मिळावा यासाठी हा धुमाकूळ घालण्याचे कारण काय ? यापेक्षाही काही आगळे-वेगळे, कामगाराना बोचणारे-टोचणारे मॅनेजमेंटचे काही धोरण आहे का ?

याशिवाय सुसह्य जीवन जगण्याची ताकद असलेला 'फिलिप्स'चा कामगार केवळ एकटा नाही, तर दोन्ही कारखान्यातील चार हजार कामगारांसह तो संघटितही आहे. त्यात ही सघटना अ-राजकीय आहे. एकाच नेतृत्वावर विश्वास ठेवणारी आहे आणि नेतृत्वही व्यवस्थापनास जरब बसविणारे काहीसे दहशतवादी आहे. तेव्हा इतके असूनही हा कामगार अस्वस्थ का आहे ? का ही मनगटशाहीच व्यवस्थापनाला खुपते आहे ?

गेल्या दोन महिन्यांत 'फिलिप्स'आवारात वर्तमानपत्री चष्म्यातून बघितल्यास, 'कामगार माजले आहेत तेथे बेबंदशाही आहे' युनि-



जून १९८२ : स्फोटाची पहिली ठिणगी पडली.

यनच्या दादागिरीने कामगार व विशेषतः महिला कामगार हैराण झालेल्या आहेत ' अशीच मांडणी ' फिलिप्स ' कंपनीच्या जाहिरातींनी ज्यांचे कॉलम्स अडतात त्या वृत्तपत्रांनी केली आहे. व्यवस्थापनाला सोयिस्कर व त्याच्या पथ्यावर पडणारी ही भूमिका कितपत खरी आहे ?

त्यातच गेल्या महिन्याभरात संघटनेचे अध्यक्ष सोपानराव हडके यांच्यासह पाच जण बडतर्फ केले आहेत. १०५ सस्पेंड व १५० कामगारांना चार्जशीट दिले आहेत. ८–१० कोर्ट–केसेस चालू आहेत. उत्पादन ठप्प आहे. व्यवस्थापनाने ' यथायोग्य काम करू ' अशी हमी मागितली आहे तर हमी न देणारे ७० टक्के कामगार आज फॅक्टरीबाहेर आहेत, टाळेबंदी नाही की बेमुदत संप नाही. फॅक्टरीची दारे उघडी आहेत, पण ' हमी ' दिल्याशिवाय कामगारांना आत येण्यास नकार दिला जात आहे, तर ' हमी ' देण्यास कामगार तयार नाहीत!

कोणाची तरी खेळी चुकली आहे. परस्परांनाच शह बसला आहे. या अवस्थेत नेमके काय होणार? आणि हा पेचात टाकणारा 'शह' बसला कसा ?

म्हणून आम्ही चक्क पिंपरी गाठलं. नुकतीच सकाळची पाळी सुटली होती. घोषणांनी तो परिसर दुमदुमला होता. महिला कामगारांसह सर्वच जण घोषणा देत होते. त्यात पुरुष कामगारांच्या घोषणांना अश्लील दर्प येत होता. ( नमुन्यादाखल-सस्पेंड केले लवडा मारी'). या घोषणा मनगटशाहीचा विकृत अहंकार दाखवीत होत्या. थोडा वेळ या घोषणा देऊन कामगार निघाले आणि आम्ही एका सस्पेंड केलेल्या कार्यकर्त्याची गाठ घेतली.

पुण्यातील 'श्रमिकविचार' वगळता साऱ्या वृत्तपत्रांवरील शिव्या आम्हीच खाल्ल्या. आणि हा कार्यकर्ता बोलू लागला.त्याचे बोट धरून काही कामगार व महिला कामगारांना भेटलो. स्वतंत्रपणे काहींच्या गाठी–भेटी घेतल्या. अध्यक्ष हडके व इतर कार्यकर्त्यांशी चर्चा केली. 'फिलिप्स' शी संबंधित काही अधिकाऱ्यांना भेटलो आणि त्यातून एकात एक गुंतलेल्या घटनांची एक साखळीच समोर तयार झाली.

' फिलिप्स ' च्या आजच्या स्फोटाची ठिणगी जून १९८२ मध्ये लोणी येथील ' एनोसी ' डिपार्टमेंटमध्ये पडली. तेथे एक क्लार्कची जागा झाली. युनियनच्या आग्रहानुसार व्यवस्थापनाने या जागेसाठी ५० जणांच्या मुलाखती घेतल्या. मात्र एक महिला अगोदरच या जागेसाठी सिलेक्ट केली ही बातमी फुटली, त्यामुळे संघटनेने आग्रह धरला की, ' बातमी फुटण्याच्या ' चुकीमुळे व मुलाखतींचे नाटक केल्यामुळे कामगारात असंतोष निर्माण झाला आहे. तेव्हा आता ही महिला सोडून उरलेल्या ४९ मधून निवड करण्याचा युनियनने आग्रह धरला. व्यवस्थापनाने हे मान्य करून दुसऱ्या उमेदवाराची निवड केली; पण हे प्रकरण इथेच थांबले नाही. जिची निवड झाली नाही त्या महिलेने युनियनकडे दाद मागितली. ' व्यवस्थापनाने नाव फोडले यात माझा काय दोष ? मी युनियनमेंबर आहे तेव्हा इतरांच्या चुकीचे प्रायश्चित्त मला का ?'

युनियनने या वेळी तिला पुढे केव्हा जागा होईल तेव्हा तुमच्या करिता प्रयत्न करू, असे आश्वासन दिले. पुढे फेब्रुवारी १९८३ मध्ये लोणी ' foil varco ' या सुमारे तीनशे महिला असलेल्या डिपार्टमेंटमध्ये क्लार्कची जागा तयार झाली. तेव्हा युनियन व व्यवस्थापन यांच्यात बोलणी होऊन या महिलेची त्या जागेसाठी निवड झाली; पण ' फॉइल वार्को ' मधील महिलांना ते खटकले. त्यांच्या म्हणण्यानुसार डिपार्टमेंटमधील जागा सेवाज्येष्ठतेप्रमाणे तेथील महिलांनाच मिळाली पाहिजे !

१८ फेब्रुवारी रोजी या महिलांनी परस्पर व्यवस्थापनाकडे तक्रार करून काम बंद केले. त्या दिवशी त्यांनी जेवण घेतले नाही. प्रकरण इथपर्यंत गेल्यावर युनियनने यात लक्ष घातले. १९८१ नंतर कंपनीत प्रथमच अशी घटना घडली. या प्रश्नावरून तिसराच प्रश्न उद्भवला. १८ फेब्रुवारीच्या या महिलांनी काम बंद करूनही तो 'अनधिकृत संप' न ठरविता व्यवस्थापनाने त्यांच्या विरुद्ध कृती केली नाही. या कृतीला व्यवस्थापनाचा उघड पाठिंबा होता, वास्तव त्यांच्या

लोणी व पिंपरी येथील कामगारांनी १९ फेब्रुवारीस काम बंद ठेवले.


पुढे एक-दोन दिवसांत युनियन व फॉइल वॉर्कोमधील महिला यांच्यात बोलणी होऊन गैरसमज दूर केले गेले. मात्र या काळात कामगारांनी अचकट वर्तन करून या महिलांना त्रास दिल्याचे अनेक-जण सांगतात. प्रश्न तात्पुरता मिटला तरी व्यवस्थापनाने या प्रकरणाची फाइल ठेवून ती माहिती वृत्तपत्रांना पुरविली.

त्याच्या पुढच्या आठवड्यात व्यवस्थापन व युनियन यांच्यात, कारखान्यातील औद्योगिक संबंध सुरळीत करण्याबाबत बैठक झाली. त्यात व्यवस्थापनाने त्यांचे म्हणणे मांडले व युनियनला एकूणच उत्पादन, शांतता याबद्दल त्यांचे म्हणणे मांडण्यास सांगितले. दरम्यान युनियनने मुंबईच्या कळवा कारखान्यातील कामगारांना मंजूर केलेला शैक्षणिक भत्ता देण्याची सूचना मांडली व युनियनचे म्हणणे मांडण्यासाठी २० मार्च रोजी बैठक ठरली.

२० मार्चच्या बैठकीत शैक्षणिक भत्ता कुठच्या स्वरूपात द्यावयाचा याबद्दल विचार चालू आहे असे व्यवस्थापनाने सांगितले व त्यासाठी २० एप्रिल ही तारीख ठरली.

दरम्यान फॅक्टरीबाहेर काही गंभीर घटना घडल्या. २३ मार्च

पृष्ठ २५ वर



# नेमके भांडण काहीच नाही

—हडके

'फिलिप्स' मध्ये ज्यांनी 'डिक्टेटरशिप ऑफ प्रोलेटेरियट' स्थापन केली. त्या 'हिटलर' ऊर्फ सोपानराव हडके यांना आम्ही भेटावयाचा निर्णय घेतला तेव्हा काहींनी 'जरा जपून हं' असा सल्ला दिला; पण डोक्यात चार्ली चॅप्लिनचा डिक्टेक्टर घेऊन आम्ही निर्धास्तपणे गेलो. त्याचे कारण म्हणजे फिलिप्सचे कारखाने लोणी–भोसरीत असले तरी युनियनचे ऑफिस सदाशिवपेठेत आहे!' तेव्हा इथे तरी निदान!' ही आशा;

फिलिप्स-कामगारांच्या घोळक्यातून वाट काढत आम्ही ऑफिसमध्ये शिरलो. एका कार्यकर्त्याने ओळख करून दिल्यानंतर कंपनीचे 'एक्झिक्यूटिव्ह' वाटावेत असा रुबाब असलेल्या श्री. हडके यांनी आपली खास नजर रोखून मिस्किलपणे हसत आमचं स्वागत केलं. त्यांचे मिस्किल हास्य 'फिलिप्स'मधील चार हजार कामगारांचा त्यांच्या नेतृत्वावर असलेला विश्वास व्यक्त करीत होते. तर नजर, ते गेली १४ वर्षे फिलिप्स युनियनचे व गेली दोन वर्षे ते महायुनियनचे अध्यक्ष असल्याची साक्ष पटवत होते.

सुरुवातीलाच 'फिलिप्स'ची युनियन राजकारणापासून अलिप्त ठेवण्याचे कारण सांगताना ते म्हणाले, 'कामगारांची वैयक्तिक राजकीय मते काहीही असोत त्याचा प्रभाव युनियनवर पडू नये या भूमिकेतून पहिल्यापासूनच संघटना अलिप्त ठेवण्यात आली. राजकारण आलं की फाटाफूट आली आणि त्याचा फायदा घेण्यास मॅनेजमेंट टपलेलीच असते. त्याचमुळे आमचा हा सवता सुभा!

**प्रश्न**— मग सध्याचे अखिल मराठा महासंघाचे प्रयत्न किंवा यापूर्वी काही कार्यकर्त्यांनी दुसरी युनियन बांधण्याचा प्रयत्न या संदर्भात युनियनमध्ये फाटाफूट झाली का?


**श्री. हडके**— तसे आम्ही, आमची युनियन अरे ला का रे म्हणणारी. त्याचमुळे असे प्रयत्न फारसे झाले नाहीत. काही वर्षांपूर्वी संघटनेत एवढी एकजूट नव्हती; पण आज ती परिस्थिती नाही. त्याचमुळे गुंड, पोलीस व राजकीय नेते यांच्यामार्फत युनियन फोडण्याचे प्रयत्न चालू आहेत. इतकंच काय आमचा संघर्ष कसा हाताळावा याबाबत इतर कंपन्यांचे व्यवस्थापकही 'फिलिप्स'च्या व्यवस्थापनाला सल्ला देत आहेत.

**प्रश्न**— १९ फेब्रुवारी ८३ ते अगदी आपल्या बडतर्फीपर्यंत 'फिलिप्स' मधील घटनांचा मागोवा घेतल्यास इतका गहजब माजण्याचे कारण दिसत नाही. तर नेमके भांडण काय?

**उत्तर**— नेमके भांडण तसे काहीच नाही. महायुनियन व फिलिप्स-व्यवस्थापन यांच्यातील अलिखित समजुतीनुसार आम्ही फिलिप्सच्या 'कळवा' फॅक्टरीतील कामगारांना दिलेला शैक्षणिक भत्ता देण्याची सूचना केली आणि ती सूचना होती, मागणी नव्हती. मात्र याबाबत झालेल्या बैठकीत व्यवस्थापनाने 'उत्पादनाची हमी' मागितली. १९८१ मध्ये झालेल्या करारानुसार सर्व गोष्टी लख्ख असताना हे नवीन त्रांगडं आम्ही नाकारलं, तर व्यवस्थापनाने आमच्या विरुद्धच कट–कारस्थाने सुरू केली. बडतर्फी, सस्पेन्शन्स, चार्जशीटचा मारा सुरू केला.

**प्रश्न**— पण हे सर्व कशामुळे? व्यवस्थापनाने हा आक्रमक पवित्रा घेण्याचे कारण काय?

**श्री. हडके**— १९८४ मध्ये आमच्या जुन्या कराराची मुदत संपत आहे. तसेच महायुनियनसह अन्य काही 'फिलिप्स' कारखान्यातील नव्या कराराची तारीख याच सुमारास येत आहे. फिलिप्सची पुण्यातील युनियन सर्वांत संघटित व ताकदवान असल्यामुळे या करारापूर्वीची ही चाचणी असावी. कदाचित पुढील संघर्ष टाळण्यासाठी व्यवस्थापनाने आत्ताच हा घाव घातला असावा. ◻



# दि इस्लामिक बॉंब

लेखक : स्टीव्ह वेसमन
हर्बर्ट क्रोस्ने

रूपांतर : मो. ग. तपस्वी
दिल्ली

लेखांक : पाचवा

## फ्रान्सची नकारघंटा – चश्माकरार संपुष्टात आणला !

भारताने आपल्या अणुबाँबचा विस्फोट मे १९७४ मध्ये केला आणि अण्वस्त्रप्रसाराचे जणु महाद्वारच उघडले गेले. सर्वाआधी आता अण्वस्त्रसज्ज कुणी होणार असेल तर तो देश म्हणजे पाकिस्तानच असे सर्वांना वाटू लागले; पण सीआयएने जो अहवाल तयार केला त्यात म्हटले होते की, ‘पाकिस्तानला तरीही आपला अणुबाँब तयार करायला दहा वर्षे तरी लागतील, म्हणजेच १९८४ च्या आसपास पाकिस्तान आपला अणुविस्फोट करण्याची शक्यता राहील. तरीही सीआयएने असा इशारा दिला होता की पाकिस्तान त्याच्याआधी एखादा प्रदर्शनी धर्तीचा विस्फोट करू शकतो आणि त्यासाठी तो एक तर आधीच विकत घेऊन ठेवलेल्या सामग्रीचा, नाही तर एखाद्या देशाकडून मिळवलेल्या विस्तृत मदतीचा उपयोग करील.’

भुत्तो यांनी पंतप्रधान या नात्याने मुलतानच्या त्या बैठकीत आपल्या शास्त्रज्ञांना इस्लामिक बाँब तयार करायला सांगितल्यापासून अण्वस्त्रप्रसाराला आळा घालण्याच्या मार्गातील तोच सर्वात मोठा धोकादायक अडसर ठरण्याची शक्यता बळावली होती. पाकिस्तानपाशी त्यासाठी लागणारे कसब होते आणि अरब मित्रदेशांनी दिलेला पैसाही होता. ‘भारताने बाँब तयार केला तर आम्ही झाडपाला खाऊ, प्रसंगी उपाशी पोटीही राहू; पण आमचा स्वतःचा अणुबाँब तयार करूच करू ! त्याशिवाय आम्हाला तरणोपायच नाही’ असे भुत्तो १९६५ पासून जाहीरपणे म्हणत होतेच.

सीआयएने हा जो अहवाल सादर केला तोही पाकिस्तानने यासाठी चश्मा येथे संयंत्र उभारण्याचा एसजीएन कंपनीशी करार केल्यानंतर एक वर्षाने. त्या करारावर रीतसर उभय देशांचे पक्के शिक्कामोर्तब हा अहवाल येण्याच्या महिनाभर आधीच झाले होते. मग धावाधाव



# पाकिस्तानच्या अणुबाँबचे जनक डॉ. अब्दुल कादिर खान

सुरू झाली आणि आंतरराष्ट्रीय मुत्सद्देगिरी कौशल्याने फासे फेकू लागली.

अमेरिकेच्या सर्व 'नेत्रांचे' बारिक लक्ष सर्व हालचालींवर होते. डिसेंबरात इस्लामाबाद येथील अमेरिकी वकिलातीने वॉशिंग्टनच्या ध्यानात पंतप्रधान भुत्तोंनी वर्तमानपत्रांना दिलेल्या दोन मुलाखती आणून दिल्या. दोन्ही मुलाखतीत आपला अण्वस्त्रधारी बनण्याचा इरादा असल्याचा भुत्तो इन्कार करीत आहेत असेच वाटत होते. अमेरिकेने बांगलादेश युद्धकाळात शस्त्रविक्रीवर जी बंदी घालून ठेवली होती, ती उठवून घेण्यासाठी ते ही धमकी देत असावेत असे त्यावरून वाटत होते. भारताच्या परमाणु-सामर्थ्याच्या तोडीस तोड ठरतील अशी प्रचलित हत्यारे आणि युद्धसाहित्य पाकिस्तानला हवे होते.

एका मुलाखतीत भुत्तो म्हणाले होते– 'भारताला जरब बसवतील अशी पुरेशी प्रचलित आणि आधुनिक हत्यारे आम्हाला मिळालीच पाहिजेत, अन्यथा आम्हाला कुठल्या ना कुठल्या स्वरूपाचा अणुबाँब तयार करावाच लागेल; पण बेताचीच प्रचलित शस्त्रास्त्रे आम्हाला मिळाली तर मग तसे करण्याची आम्हाला काही हौस नाही.'

दुसऱ्या मुलाखतीतही भुत्तोंनी जवळजवळ असेच विचार मांडले होते– 'आम्हाला प्रचलित शस्त्रास्त्रे मिळत असतील तर तीच आम्हाला जास्त सोयीची आहेत; पण ती नच मिळाली तर मात्र अणुबाँब प्राप्त करण्याखेरीज आम्हाला गत्यंतरच राहणार नाही.' भुत्तोंनी असेही म्हटले होते की, पुनर्प्रक्रिया भट्टीचे काय ? प्रचलित शस्त्रास्त्रांच्या खरेदीवरील बंदी उठली तर ती भट्टी आम्ही बंदही करू शकतो.' पाकिस्तानने इराण आणि अरब देशांकडून चालू वर्षासाठी ४५ कोटी डॉलर्सची कर्जे संरक्षणाची दुसरी फळी उभारण्याकरता घेतली आहेत आणि ही तर नुसती सुरुवात आहे, असेही भुत्तोंनी या मुलाखतीत जाहीर केले होते.

अमेरिकेने संशयाचा फायदा भुत्तोंना दिला आणि फेब्रुवारी १९७५ मध्ये विक्रीवरील बंदी उठवली; पण अमेरिकेने अण्वस्त्र-प्रसाराला आळा घालण्याचे काम लंडन क्लबवर सोपवले आणि फ्रान्सला गळ घातली की, आंतरराष्ट्रीय तपासणी आणि अण्वस्त्र तयार न करण्याच्या हमीची अट अगदी कडक ठेवा आणि पाकिस्तानच्या चश्मा–भट्टीचाही अपवाद करू नका. चश्मा–योजना आंतरराष्ट्रीय अणुशक्ती एजन्सीपुढे आली तेव्हा फ्रान्सने अमेरिकेचे धोरण स्वीकारले आणि मग अमेरिकेने चश्मा–करार–मंजुरीवर आपलीही सही केली.

पण लगेचच जून १९७६ मध्ये सिनेटर सायमिंग्टन यांची सूचना स्वीकारून अमेरिकेने आपल्या परराष्ट्रांना–मदत–विधेयकात संशोधन केले. जो देश अण्वस्त्रनिर्मितीच्या हमीवाचून युरेनियम-परिष्करणाची किंवा प्लुटोनियम तयार करण्यासाठी पुन्हा प्रक्रिया करण्याची सामग्री आयात वा निर्यात करील त्याला आर्थिक मदत देऊ नये असे ते संशोधन होते. ते नंतर सायमिंग्टन–संशोधन म्हणून प्रसिद्धी पावले.

दरम्यान पाकिस्तानने आपल्या चश्मा–संयंत्राचे हिरीरीने समर्थन केले. तोवर तेथे वर्षाकाठी १०० टन वापरलेल्या परमाणु-इंधनावर प्रक्रिया करण्याची क्षमता निर्माण झालेली होती. याबाबत 'न्युक्लेऑनिक्स वीक'ला दिलेल्या मुलाखतीत एक पाकिस्तानी इंजिनियर म्हणाला– 'अणुबाँब काय कुणीही तयार करू शकतो. त्यासाठी काही मोठी गुंतागुंतीची तांत्रिक यंत्रणा पदरी असावीच लागते असे नाही.' दुसऱ्या एका पाकिस्तान्याचे म्हणणे होते– 'अणुबाँब तयार करण्यासाठी प्लुटोनियमवर प्रक्रिया करण्याचे आमचे स्वतःचे तंत्रज्ञान आमच्यापाशी आहे. इतर गोष्टींसाठी नसे ना का ?' आणखी एका सूत्राने सांगितले– 'बाँब तयार करू लागल्यास पाकिस्तानच्या शांततामय परमाणु-उद्योगासाठी मदत मिळणार नाही, एवढेच ना ? पण पाकिस्तानचे भवितव्य परमाणु-अस्त्रे विकसित करण्याशी निग-

डित झालेले आहे आणि काय वाटेल ते झाले तरी आम्ही काही आपल्या भवितव्याचा सौदा करणार नाही.'

पण वॉशिंग्टनला काही हा विचार पटेना. किसिंजर स्वत:ला भुत्तोचे चागले मित्र म्हणवीत असत. भुत्तोच्याच मदतीने चीन आणि अमेरिका यांचे दुरावलेले सबध पुन्हा जोडण्यात आले होते. बांगला-देशप्रकरणी अमेरिका पाकिस्तानच्या पाठीशी उभा राहिलेला होता. किसिंजर आणि भुत्तो यांचे संबंध तेव्हापासूनच घनिष्ठ होते; पण आता मात्र किसिंजरने भुत्तोंना सरळ आणण्यासाठी पाकिस्तानला भेट दिली.. अमेरिकन वार्ताहरांशी, छापण्यासाठी नसलेल्या गप्पा-गोष्टीत ते म्हणाले– सायमिंग्टन संशोधनाचा बडगा दाखवून त्यानी चश्मा–परियोजना सोडली नाही तर पाकिस्तानला देण्यात येणारी सर्व मदत थांबवली जाईल आणि ती योजना सोडायला तयार झालात तर 'कोरसेयर ए–७' या जातीची अत्यंत झुजार आणि अत्यंत आधुनिक युद्धयंत्रांनी सुसज्ज असलेली ११० विमाने पाकिस्तानला देऊ असे भुत्तोंना सांगायचे मी ठरविले आहे.'

या भेटीबाबत स्वत: भुत्तोनीच आपल्या राजकीय मृत्युपत्रात लिहून ठेवले आहे की– 'डॉ. किसिंजर भलताच तल्लख डोक्याचा माणूस ! त्यानी मला चक्कच सांगितले की, पुनर्प्रक्रिया करण्याचे ते संयंत्र पाकिस्तानला वीजनिर्मितीसाठी हवे आहे असे सांगून अमेरिकेच्या गुप्तमाहितीखात्याचा अपमान करू नका !' मीही उत्तर दिले की,' पाकिस्तानच्या विजेच्या गरजांची चर्चा करून मी अमेरिकन गुप्तचरांचा अपमान मुळीच करू इच्छित नाही; पण मग त्याच न्यायाने तुम्हीही आमच्या त्या संयंत्राची अजिबात चर्चाही करता कामा नये!'

याच भेटीत भुत्तोनी सरळ सरळ मान्य केले की, अणुबॉंबनिर्मितीची क्षमता प्राप्त करणे हाच माझा उद्देश आहे. कारण जगातील सर्व महान समाजांजवळ तो बॉंब आहे. ख्रिश्चनांजवळ आहे, ज्यूंजवळ आहे, हिंदूंपाशी आहे आणि कम्युनिस्टांकडेही आहे आणि लवकरच इस्लामिक समाजापाशीही तो असणार आहे; पण डॉ. किसिंजर यांच्याशी आपली काय बोलणी झाली होती याचे याहून रक्तबंबाळ वर्णन भुत्तोंनी पाकिस्तान राष्ट्रीय असेंब्लीत एप्रिल १९७७ मध्ये केले. ते म्हणाले, 'किसिंजर यांनी मला चक्क धमकावणी दिली की, चश्मा-योजना सोडून द्या. नाही तर धडा शिकावा असे भयानक भाग्य तुमच्या वाट्याला येईल !'

नंतर घडलेल्या घटनावरून ती धमकी जणु काही भविष्यवाणीच होती असे दिसून आले. विशेषत: जनरल झिया–उल–हक यांनी भुत्तोची सत्ता उलथवली आणि नंतर एक खुनी म्हणून त्यांना फासावर चढवले, तेव्हा तर किसिंजर यानी दिलेला तो दम खरा ठरल्याचे जाणवत होते; पण किसिंजर याना भुत्तो यांनी धूप घातला नाही. ते आपल्या भूमिकेवर अटळ राहिले. 'पाकिस्तान म्हणजे कोरिया नव्हता. आता तर तो 'पाश्चात्यांशी घनिष्ठपणे संलग्न' असा जुना पाकिस्तानही उरला नव्हता. आता तो वॉशिंग्टनच्या तालावर अजिबात नाचत नव्हता. विशेषत: 'इस्लामिक बॉंब' च्या प्रश्नावर तर नाहीच नाही.

**' रक्तपिपासू लांडगे माझ्या नरडीचा घोट घ्यायला सुटले आहेत. माझ्याविरुद्ध आंदोलन**

किसिंजर पाकिस्तानला आले तसेच हात हलवीत फ्रान्सला परत गेले. तिथे त्यांनी फ्रान्सने पाकिस्तानशी केलेला करार मोडावा असे प्रयत्न केले. फ्रेंच भलतेच भडकले पॅरिसमधल्या अमेरिकन शार्जदा-फेरना बोलावून फ्रेंच सरकारने किसिंजरच्या या उठाठेवीबद्दल आश्चर्य आणि नाराजी व्यक्त केली. 'ही चक्क लुडबूड आहे !' अशा शब्दांत फ्रेंच पंतप्रधान चिराक यानी निर्भर्त्सना केली. ते म्हणाले, 'हा आमच्या सार्वभौमत्वाचा प्रश्न आहे. यात कुणा तिसऱ्या देशाने– त्यातल्या त्यात ज्या देशाने मार्च १८ रोजी आमच्या या कराराला आतरराष्ट्रीय अणुशक्ती-एजन्सीच्या बैठकीत मान डोलावली होती त्या अमेरिकेने–नाक खुपसण्याचे काहीही कारण नाही !'

पण पाठीमागे हात पिरगळण्याचे जुने साम्राज्यशाही धोरण निदान पाकिस्तानबाबत तरी अद्याप सपुष्टात आलेले नव्हते. फ्रान्सने हा असा कितीही थयथयाट केला असला तरी, फ्रान्सच्या धोरणात तेथूनच बदल झाला. पाकिस्तानला तो करार स्वत:च रद्द करण्यास त्याने भाग पाडले नाही; पण चिराक जाऊन त्याच्या जागी पंतप्रधान झालेल्या गिस्कार्द द–एस्तेंग यांनी १ सप्टेंबरला जाहीर केले की, निव्वळ निर्याताभिमुख परमाणु–धोरणाऐवजी फ्रान्स जास्त पलीकडे जाऊन परमाणु–प्रसाराच्या व्यापक प्रश्नाबाबत नवे धोरण ठरविण्यासाठी एक मंडळ स्थापन करीत आहे आणि पंतप्रधान स्वत.च त्याचे अध्यक्ष राहणार आहेत.

त्यानंतर सहाच दिवसांनी, ७ सप्टेंबरला किसिंजर द–एस्तेंग यांना भेटायला गेले आणि ऑक्टोबरमध्ये परमाणु–धोरणविषयक नव्या फ्रेंच मंडळाने निर्णय जाहीर केला की, 'इत:पर फ्रान्स परमाणु–क्षेत्रात गळेकापू–स्पर्धेपासून दूर राहील !' त्याच सुमारास राष्ट्रपती फोर्ड यांनी पुनर्प्रक्रियेची निर्यात पूर्णपणे थांबवण्याचे आवाहन केले होते. त्याच्या काही आठवड्यातच फ्रान्सने सुस्थितीत असलेल्या काही पत्रकारांना कानमंत्र द्यायला सुरुवात केली; पण ती नुसती कुजबूजच होती. अखेरीस १६ डिसेंबर रोजी परमाणु–धोरणविषयक फ्रेंच मंडळाने जाहीर केले की, 'या पुढे फ्रान्स आपली पुनर्प्रक्रिया तंत्रविद्या निर्यात करणार नाही; परंतु हा निर्णय याआधीच करार-बद्ध झालेल्या देशाना लागू होणार नाही. यात पाकिस्तान येत होता. अर्थातच पाकिस्तानच जर स्वत:हून तो करार रद्द करायला (दक्षिण कोरियासारखा) तयार असेल तरची गोष्ट वेगळी.' अशी एक मेखही फ्रान्सने मारून ठेवली होती.

२० जानेवारी १९७७ रोजी जिमि कार्टर अमेरिकेचे राष्ट्रपती झाले. त्यांनी पदावर आल्या आल्या पहिले काम कोणते हाती घेतले असेल तर ते हे की, अण्वस्त्रनिर्मितीची घातुक तंत्रविद्या आणखी कुणाच्या हाती पडत जाऊ नये, निदान अमेरिकेच्या माजी मित्र-देशाला–पाकिस्तानला–तरी ती कदापि अवगत होऊ नये अशी व्यवस्था करणे; पण हे काम एकट्या अमेरिकेला कधीही करता

येणार नाही याची कार्टरना सुरुवातीपासून कल्पना होती. विशेषतः अमेरिकेच्या या धोरणाविरुद्ध फ्रान्स एका संमिश्र युतीचे नेतृत्व करू शकत होता. कारण फ्रेंच 'एसजीएन' कंपनीनेच पाकिस्तानात चश्मा येथे औद्योगिक पुनर्प्रक्रिया-संयंत्र उभारून देण्याचा करार केलेला होता. पाकिस्तानचा परमाणु-विकास-कार्यक्रम आर्थिकदृष्ट्या तसा मर्यादितच होता आणि चश्मा-संयंत्र म्हणूनच लष्करीदृष्ट्या नक्कीच धोक्याचे होते असे अमेरिकेला वाटत होते.

फ्रेंचांना अमेरिकेचे हे मत तसे पटतच होते; पण द गॉलभक्त चिराक आता विपक्षनेते असताना फ्रेंच सरकार अमेरिकन सरकारच्या दडपणाखाली झुकायला तयार नव्हते. कार्टर-प्रशासनाचे याबाबतचे विचार ते नुसते ऐकून घेत असे. फ्रान्सचे नवे पंतप्रधान रेमड बार यांनी १० फेब्रुवारीला फ्रान्सची भूमिका नमूद केली की, 'पाकिस्तानशी केलेला करार पाकिस्तानच स्वतःहून मोडत नाही, तोवर फ्रान्स तो चालूच ठेवणार आहे.' फ्रान्सला यात आपले दूरगामी राष्ट्रीय हित जपायचे होते. एखाद-दुसरे पुनर्प्रक्रिया-संयंत्र विकल्याने मोठेसे घबाड मिळणार नव्हते; पण अशी संयंत्रे फ्रान्सपाशी आहेत, तो ती विकू शकतो, या स्पर्धेत त्याला अमेरिका आणि ब्रिटन यांच्या बरोबरीने टिकायचे होते. हे दोन देश अशी संयंत्रे विकायचे थांबवीत असतील तर फ्रान्सचे मोठेसे नुकसान होणार नव्हते. प्रश्न फक्त परमाणु-भट्ट्याचा नव्हता, तर त्यातून प्राप्त होणाऱ्या प्लुटोनियमवर पुन्हा प्रक्रिया करण्याची यंत्रे देण्याचा होता. तेव्हा ती प्रक्रिया समाप्त झाले, तरी कराचीतील कॅंडू-भट्टी कार्यरत असेपर्यंत तिचा वापर अण्वस्त्रनिर्मितीसाठी लागणारे इंधन तयार करण्यासाठी करणार नाही अशी हमीही पाकिस्तानने दिली पाहिजे.

पाकिस्तानने अर्थातच या सर्व अटी धुडकावून लावल्या आणि पाकिस्तानला कराची-भट्टीसाठी लागणारे सुटे भाग आणि नैसर्गिक युरेनियम-इंधनाचा सर्व पुरवठा कॅनडाने डिसेंबर १९७५ मध्ये बंद केला. कराची-भट्टीची यामुळे उपासमार होऊ लागली. तिच्या संचलनावर आणखी मर्यादा पडल्या; पण देशांतर्गत दडपण वाढू लागले आणि आंतरराष्ट्रीय दडपणापेक्षा देशातूनच येत असलेले हे दडपण जास्त प्रभावी होते. कारण हे दडपण परमाणुविषयक नव्हते.

पाकिस्तानात ७ मार्च १९७७ रोजी अत्यंत चुरशीच्या आणि भयंकर आवेशाने लढविण्यात आलेल्या निवडणुका झाल्या. भुत्तो यांची पीपल्स-पार्टी पाकिस्तान नॅशनल अलायन्स या दक्षिणपंथी संयुक्त मोर्चाचा पराभव करून विजयी झाली; परंतु लगेचच विरोधी पक्षांनी आरोप केला की, भुत्तोंनी निवडणुकीत लबाडी केली. विरोधक रस्त्यावर आले. पाकिस्तानभर दंगे उसळले. सर्वांचा रोख भुत्तो यांच्यावरच होता. भुत्तो दारुडे आहेत, नास्तिक आहेत आणि एका इस्लामिक देशावर राज्य करण्यास सर्वस्वी अपात्र आहेत असा प्रचार सुरू झाला.

अनेक निरीक्षकानाही वाटत होते की, निवडणुका तशा प्रामाणिक-

---

**चालवण्यासाठी मला सत्ताच्युत करण्यासाठी एक विदेशी हात काम करतो आहे'**

---

विकायचे हे दोन देशही थांबवीत असतील तर फ्रान्सला बरेच होते. कारण नुसत्या भट्ट्या विकण्याचा मार्ग मोकळा रहातच होता.

कार्टर-प्रशासनाला ही सुरुवात चांगलीच वाटली. त्याने पाकिस्तानवर अण्वस्त्रे बनविण्याचा विचार सोडून देण्यासाठी दबाव चालूच ठेवला. तुम्ही अण्वस्त्रे तयार केली तर तुमचीच सुरक्षा धोक्यात येईल. कारण मग भारताने जशास तसे या न्यायाने जर का अण्वस्त्रांचे आगरच उभे केले तर? असा प्रश्न ते पाकिस्तानपुढे मांडत गेले. तेव्हा हा विचार सोडून दिल्यास ११० ए-७ कोरसेअर ही आधुनिक विमाने तुम्हाला तुमच्या विमानदलाची प्रहारशक्ती वाढविण्याकरता देऊ असे आमिषही पाकिस्तानला दाखवणे चालूच होते. पाकिस्तानवर असा दबाव वाढवीत नेण्याच्या कामी अमेरिकेला कॅनडाचीही चांगलीच मदत झाली.

कॅनडाच्या कॅंडू-भट्टीतून उपलब्ध झालेल्या प्लुटोनियमचा वापर करून भारताने अणु-विस्फोट केल्यापासून कॅनडा आपल्या परमाणु-सामग्रीच्या निर्यातीवर फारच कडक निर्बंध घालू लागला होता. विरोधाभास जसा की, या निर्बंधांची झळ भारताच्या जन्मवैरी पाकिस्तानलाच सर्वाधिक बसत होती. कॅनडाने पाकिस्तानला बजावले होते की, परमाणु-विस्फोटके तयार करण्याच्या बाबतीत त्याने भारताचा कित्ता गिरवता कामा नये. त्याने सर्व परमाणु-उपक्रमांची तपासणी करण्याची मुभा ठेवली पाहिजे. इतकेच नव्हे तर उद्या समजा पाकिस्तान आणि कॅनडा या उभय देशांतील परमाणु-संबंध पणे झालेल्या नाहीत; परंतु त्यात कोणतीही लबाडी झाली नसती तरीही भुत्तोंचा पक्ष विजयी झालाच असता याबाबतही निरीक्षकांत तसे दुमत नव्हते; पण भुत्तोविरोधक निवडणुकीतील लबाडीचे नुसते निमित्त करीत होते. वास्तविक त्यांना भुत्तोंना सत्तेवरून खाली खेचायचे होते. भुत्तोंना उमजले की, आपल्याविरुद्ध उठविण्यात आलेल्या या रानाला बाहेरची फूस आहे. चिलीच्या राष्ट्रपती साल्वाडोर अॅलेंडे यांच्या विरुद्ध अमेरिकेच्या सीआयएने १९७३ मध्ये जसा कट घडवून आणला होता तसाच आता पाकिस्तानात आपल्याविरुद्ध रचला गेला आहे याची त्यांना जाणीव होती. भुत्तोंना वाटत होते की, डॉ. किसिंजर यांनी आपल्याला दिलेली 'ती' धमकी आता प्रत्यक्षात येऊ लागली आहे. दक्षिणपंथी इस्लामिक धर्मवेड्या जमात-इ-इस्लामीला हाताशी धरून अमेरिका आता 'धडा शिकावा' असे भाग्य आपल्या वाट्याला आणायला निघाली आहे आणि याचे कारण आपण चश्मा-योजना सोडून द्यायला नकार दिला होता, याचीही आठवण भुत्तोंना आता प्रकर्षाने होऊ लागली होती. एप्रिलमध्ये त्यांनी पाकिस्तान राष्ट्रीय असेंब्लीत स्पष्टच इशारा दिला होता की, 'रक्तपिपासू लांडगे माझ्या नरडीचा घोट घ्यायला सुटले आहेत. माझ्याविरुद्ध आंदोलन *चालवण्यासाठी डॉलर्स बाहेरून ओतले जात आहेत. मला सत्ताच्युत* करण्यासाठी एक विदेशी हात-काम करतो आहे!'

भुत्तोंनी हे आरोप अमेरिकेचे नवे परराष्ट्रमंत्री सायरस व्हान्स यांच्याही ध्यानात आणून दिले आणि पाकिस्तानचे तेव्हाचे महा-

धिवक्ता म्हणाले की, श्री. व्हान्स यांनी या आरोपांचा कधीही इन्कार केला नाही. भुत्तो यांचे हे आरोप कितीही खरे असोत, त्यांनी स्वत: किंवा त्यांच्या अनुयायांनी सीआयएचा या प्रकरणात हात असल्याचा कोणताही गंभीर पुरावा कधीही सादर केला नाही. कार्टर–प्रशासनाने आल्या आल्या इतक्या लवकर अशा प्रकारची प्रच्छन्न कारवाई हाती घेतली असेल असे सकृत्‌दर्शनी तरी वाटत नाही; पण या प्रकारामागे कुणी का असेना, त्याचा हेतू साध्य झाला! पाकिस्तानात अस्थिरता निर्माण झाली आणि ५ जुलैला भल्या पहाटे लष्करप्रमुख जनरल मोहंमद झिया–उल–हक यांनी रक्तपात न करता राज्यक्रांती घडवून आणली! पाकिस्तानात पुन्हा लष्करी राजवट सुरू झाली. या राजवटीने भुत्तोंना अटक केली आणि आपल्या राजकीय प्रतिस्पर्ध्याचा खून केल्याचा त्यांच्यावर खटला भरला. पाकिस्तानी जनतेचा लाडका नेता भुत्तो खुनाच्या आरोपावरून पिंजऱ्यात उभा आहे आणि त्याच्यावर खटला सुरू आहे याच्या हकीगती पाकिस्तानी जनतेला भरपूर ऐकवण्यात आल्या!

हे सर्व चश्मा–योजना बंद पाडण्यासाठीच चालू आहे याबद्दल भुत्तो यांच्या मनात कोणतीही शंका नव्हती. तसे असेलही कदाचित; पण पाकिस्तानच्या नव्या राज्यकर्त्यांनी त्या संयंत्राबाबतचे आधीचेच धोरण चालू ठेवले, त्यात कोणताही बदल केला नाही. भुत्तो अधिकारावर असतानाच त्यांच्यावर जेव्हा फ्रान्समार्फत दडपण आणण्यात आले होते तेव्हाच फ्रान्स आता आपला करार पाळण्याची टाळाटाळ करू लागल्याची जाणीव भुत्तोंना झाली होती. एसजीएन कंपनीशी संपर्क साधण्यात आला होता आणि त्यांचे संचालक फ्रॅन्सिस झेवियर पॉइन्से यांनी नंतर न्यूक्लेऑनिक्स वीकला दिलेल्या मुलाखतीत म्हटले होते की, 'हो–नाही करता करता अखेरीस चश्मा-योजनेसाठी लागणारे साहित्य ९५ टक्के रवाना झाले आहे आणि आता पाकिस्तानला जे हवे होते ते मिळाले आहे.'




पण ५ जुलैच्या राज्यक्रांतीनंतर अमेरिकेच्या अण्वस्त्रप्रसार–विरोधी विभागाचे मुख्य जोसेफ नाये यांनी जुलैअखेर गुपचूप पाकिस्तानला भेट दिली. जनरल झिया यांनी केलेल्या राज्यक्रांतीला सीआयएचा पाठिंबा आहे असे आरोप त्या सुमारास केले जातच होते; पण नाये आले आहेत ही गोष्ट फुटली आणि पदच्युत भुत्तोंनी लगेचच तिचे भांडवल करून हल्ला चढवला. ते म्हणू लागले की, 'नाये यांच्या या भेटीने अंतरराष्ट्रीय कटाचा माझा आरोप सिद्धच होतो आणि हे सर्व कशासाठी तर मी चश्मा–योजना सोडून द्यायला नकार दिला होता म्हणूनच!' पण डॉ. नाये यांच्या भेटीचा बभ्रा होताच खुद्द जनरल झियांनीच जाहीर केले की, 'चश्मा–योजना चालूच राहील आणि तिच्याबाबत कोणताही उशीर खपवून घेतला जाणार नाही! अशा प्रकारे डॉ. नाये यांच्या भेटीचा लाभ भुत्तोंना मिळण्याऐवजी झियांनाच मिळाला आणि नाये यांच्या बोलण्यानंतर काढण्यात आलेल्या सरकारी पत्रकावरून हेही स्पष्ट होऊन गेले की, या प्रकरणी अमेरिका आणि पाकिस्तान यांच्या भूमिकेत पहिल्याइतकेच महदंतर आहे.

चश्मा–योजना थांबवण्यासाठी अमेरिकेने भुत्तोंना पदच्युत करणाऱ्या राज्यक्रांतीला पाठिंबा दिला असेल तर त्यांचा तो जुगार फसला असेच म्हणावे लागेल. कारण चश्मा–योजना चालू ठेवून अण्वस्त्रसज्ज व्हायचे हे पाकिस्तानचे स्वप्न होते–मग सत्तेवर कोण आहे, भुत्तो, झिया की खुद्द आणखी कुणी यामुळे पाकिस्तानच्या वज्रसंकल्पात कोणताही फरक पडणार नव्हता. या योजनेत पाकिस्तानचा राष्ट्रीय स्वाभिमान इरेस लागला होता. आता कोणताही पाकिस्तानी राज्यकर्ता ती योजना परदेशी दडपणाखाली सोडून देऊच शकत नव्हता, अमेरिकेच्या तर नाहीच नाही; पण अमेरिकन सरकार मात्र हा धडा शिकायला अजूनही तयार नव्हते. सप्टेंबर ७७ मध्ये त्याने सायमिंग्टन–संशोधनाच्या आधारे पाकिस्तानला मिळत असलेली आर्थिक आणि लष्करी मदत बंद करून टाकली.

त्यासरशी पाकिस्तानचे बिनीचे मुत्सद्दी आगा शाही पॅरिसला गेले. पाकिस्तानात सरकारे आली आणि गेली; पण आगा शाहींचे स्थान राज्यकर्त्यांचा विश्वासू मुत्सद्दी म्हणून अढळ राहिले होते. आताही झियांचे विश्वासू सरकारी म्हणून ते चश्मा–योजनेबाबतचा करार अविलंब पुरा करायची गळ फ्रेंचांना घालण्यासाठीच पॅरिसला गेले होते. आधी ते एसजीएनचे अध्यक्ष आणि महासंचालक फ्रॅन्सिस झेवियर पॉइन्से यांना भेटले. पॉइन्से यांनी शाहींच्या म्हणण्याला मान डोलावली; पण निर्णय फ्रेंच सरकारचे परराष्ट्रमंत्री लुई दि गिरिन्गॉद यांच्या हाती आहे असे सांगून त्यांना तिकडे पाठवले. आगा शाही यांनी अत्यंत कौशल्याने पाकिस्तानची बाजू दि गिरिन्गॉद यांच्यासमोर मांडली.

द गिरिन्गॉद यांनी शाहींसमोर परमाणु–इंधनावर पुन्हा प्रक्रिया करण्याची नवी प्रणाली पाकिस्तानने अभ्यासून पहावी असा विचार

मांडला. या प्रणालीमुळे विशुद्ध प्लुटोनियम तयार होत नाही.चश्मा–योजनेसाठी आधी ठरविलेली तांत्रिक प्रणाली बदलावी, नव्या प्रणालीमुळे तेथे प्रयुक्त इंधनावर प्रक्रिया तर होत राहील आणि तरीही त्यातून प्लुटोनियम तयार होणार नाही आणि परिणामी अण्वस्त्र तयार करण्याचाही प्रश्न आपोआपच उरणार नाही हा द गिरिन्गॉद यांच्या सूचनेमागील हेतू होता. अमेरिकेत या प्रणालीचा अभ्यास होत होता. तिला 'सह–प्रक्रिया' असे नावही मिळाले होते; पण कोणीही तिचा प्रत्यक्ष वापर करून पाहिलेला नव्हता. या सह-प्रक्रियेतून प्राप्त होणाऱ्या प्लुटोनियम आणि युरेनियम यांच्या नव्या मिश्र इंधनाचा उपयोग परमाणु–इंधन म्हणून पाकिस्तानला एका फास्ट-ब्रीडर भट्टीखेरीज इतरत्र कुठेही करता आलाच नसता आणि ती भट्टी तयार झालीच तरी १९९० पूर्वी उभी राहणार नव्हती.

शाही यांना हे अजिबात पसंत नव्हते. मुलतान येथे १९७२ मध्ये झालेल्या शास्त्रज्ञांच्या त्या अगदी पहिल्या बैठकीतच भुत्तो यांनी इस्लामिक बॉंब तयार करण्यासाठी लागणारे प्लुटोनियम प्राप्त करणे हेच ध्येय आणि लक्ष्य पाकिस्तानच्या परमाणु–कार्यक्रमाचे ठेवले होते आणि त्याच पाकिस्तानच्या नव्या लष्करी सरकारचे राजदूत या नात्याने आगा शाही त्या ध्येयापासून तसूभरही विचलित व्हायला तयार नव्हते!

पण आगा शाही आणि द गिरिन्गॉद या दोघा मुत्सद्द्यांनी फ्रेंच सरकारच्या त्या सह–प्रक्रिया सूचनेवरील उभयताचे मतभेद फारच बदलेल्या फ्रेंच सरकारच्या धोरणापुढे त्यांचे काही चालले नाही. जिमी कार्टर आणि गिस्कार्द द एस्तैंग हे दोघे राष्ट्रपती अशा प्रकारे हात मिळवते झाले.

फ्रान्स जसजसा अमेरिकेच्या जवळ जाऊ लागला तसतसे त्याचे पाकिस्तानशी संबंध दुरावू लागले. ७ जानेवारी १९७८ रोजी इस्लामाबाद येथे अन्तर्राष्ट्रीय पत्रपरिषदेत आगा शाही यानी जाहीर केले की 'चश्मा–योजनेसाठी झालेल्या करारानुसार पाकिस्तानला फ्रान्सकडून जी सामग्री मिळायची आहे तिची आवक मंदावली आहे आणि गेल्या नऊ महिन्यांत फ्रान्सकडून आम्हाला काहीही पोहोचलेले नाही. परमाणु–इंधनावर पुन्हा प्रक्रिया करण्याची जी नवी प्रणाली फ्रान्स आता सुचवतो आहे, ती मूळ करारात नाही आणि करारात नाही ते पाकिस्तान मुळीच मान्य करणार नाही. पाकिस्तानने स्वत: दिलेल्या सर्व आश्वासनाचे आणि हमीचे पालन केलेले आहे. आणखीही काही आश्वासने, हमी वगैरे हव्या असल्या तर त्यावरही चर्चा करायला आमची ना नाही; पण फ्रान्स आपल्या दिल्या सहीला जागेल अशी आमची अपेक्षा आहे!'

आगा शाहींच्या या जाहीर विचाराची फ्रान्सने तावडतोब दखल घेतली आणि २० फेब्रुवारी रोजी राष्ट्रपती गिस्कार्द यांनी खुद्द जनरल झिया यांच्याशी बोलणी करण्याकरता आपला खास दूत इस्लामाबादला पाठवला. या अतिशय नाजुक कामगिरीवर पाठवलेला माणूस होता परराष्ट्र–परमाणु–धोरण–परिषदेचा चिटणीस

## पाकिस्तानचा नेमका इरादा अमेरिकेने एका गुप्त अहवालात टिपला होता.

गोडस शब्दात झाकले. द गिरिन्गॉद म्हणाले – 'फ्रान्स आपल्या कराराचे पालन करील असे मी आगा शाहींना आश्वासन दिले आहे.' आगा शाही हा काही कमी वस्ताद मुत्सद्दी नव्हता. ते म्हणाले– 'ठरल्यायोजनेबरहुकुम आम्हा उभय देशातील सहकार्य चालू आहे.'

या सोज्ज्वळ उच्चारांनी पत्रकार मात्र व्यवस्थित बनले. एक वर्षापूर्वीच, नोव्हेंबर १९७७ मध्ये न्यूयॉर्क टाइम्सने सनसनाटी मारली होती की, फ्रेंच सरकार चश्मा–योजनेचा गुपचूप गळा दाबून तिचा प्राण घेऊ चाहत आहे. आता त्याच पत्राने लिहिले–चश्मा-योजना तडीस नेण्याची फ्रान्सची प्रतिज्ञा अटळ आहे असे दिसते. सत्य नेमके उलट होते. पूर्वी निर्णय पाकिस्ताननेच घ्यावा असे फ्रान्सचे म्हणणे होते आणि आता फ्रान्स तो करार मोडू मागत होता किंवा निदान नव्या प्रणालीचे सूतोवाच करून पाकिस्तानची ती योजनाच पांगळी करू पाहात होता. या प्रणालीने अण्वस्त्रोपयोगी प्लुटोनियम पाकिस्तानला कधीच तयार करता आले नसते!

अन्तर्राष्ट्रीय मुत्सद्देगिरीच्या सारीपटावर फेकण्यात आलेले फासे पालटले होते. फ्रान्सचे चश्मा–योजनेबाबतचे धोरण बदलले होते. ज्या एसजीएन कंपनीला अजूनही पाकिस्तानच्या चश्मा – योजनेबाबत आस्था होती, ती कंपनीच तिचे ६६ टक्के शेअर्स विकत घेऊन सरकारने आपल्या ताब्यात घेतली होती. पॉइन्सेच नव्या कंपनीच्या सर्वोच्च पदावर १९७९ पर्यन्त राहिले आणि तोपर्यन्त ते पाकिस्थानशी केलेला करार पाळण्याचाच आग्रहही धरत राहिले; पण आणि नामांकित माजी सनदी अंमलदार आन्द्रे जॅकोमे! आम्ही जॅकोमेंना त्यांच्या पॅरिसमधल्या भव्य कार्यालयात चारदा भेटलेलो होतो. अशाच एका भेटीत त्यांनी त्यांच्या या पाकिस्तानला दिलेल्या पहिल्या भेटीची सारी कहाणी सांगितली. जॅकोमे यांनी आम्हाला प्रांजळपणे सांगितले की, 'चश्मा-संयंत्र आधी ठरविलेल्या अवस्थेतच चालू करून देण्याची आमची इच्छा नाही, हा मला सांगितलेला निरोप होता. त्या संयंत्रातून प्लुटोनियम तयार होणार नाही अशा पद्धतीने त्यात दुरुस्ती कशी करावी ते पाहून काढायला मला सांगितले होते.'

या संकल्पित परिवर्तनाबाबत जॅकोमे यांनी जनरल झियांशी बोलणी केली. ते मुनीर अहमद खान यांच्याशी बोलले. लष्करी राज्यक्रांती होऊनही खान पाकिस्तान–अणुशक्ति–मंडळाच्या अध्यक्षपदावर टिकून होते; पण या दोघानाही कोणतेही परिवर्तन मंजूर नव्हते. उलट मुनीर खान यानीच एक परिवर्तन सुचवले आणि तदनुसार इंधन–परिष्करणाची प्रणाली बदलली असती; पण पाकिस्तानला प्लुटोनियम मिळालेच असते.

आता निर्णय करण्याची पाळी फ्रान्सवर होती. तो क्षणही येऊन ठेपला होता. पाकिस्तानने प्लुटोनियमचा आग्रह धरलेला होता. चश्मा–संयंत्र आर्थिकदृष्ट्या असमर्थनीय होते हे फ्रान्सइतके अन्य कुणालाच माहीत नव्हते. शिवाय पाकिस्तानचा नेमका इरादा काय आहे याबाबतचा एक गुप्त अहवाल अमेरिकेने नुकताच

तयार केला होता आणि एव्हाना तो फ्रेंच अधिकाऱ्यांनी पाहिलेलाही होता.

'पाकिस्तानला अणुबाँब हवा आहे याबद्दल आमची खात्री झाली होती.' जॅकोमे यांनी आम्हाला विश्वासात घेऊन सांगितले. ते म्हणाले– 'चश्मा–संयंत्र–करार संपुष्टात आणणे हा एकच मार्ग उरला होता!'

१५ जून १९७८ रोजी फ्रान्सच्या परराष्ट्र-परमाणुधोरण-परिषदेने चश्मा–करार नेहमीकरता संपुष्टात आणला. पाकिस्तान चिडला. त्याने फ्रान्सची कित्येक देणी थांबवली. कित्येक खरेदी–योजना रद्द केल्या आणि फ्रेंच विमाने घेण्यासाठी चालवलेल्या वाटाघाटीही तहकूब केल्या. राष्ट्रपती गिस्कार्द यांनी पुन्हा जॅकोमे यांनाच जनरल झियांची समजूत काढायला पाठवले.

जॅकोमे पुन्हा इस्लामाबादला पोचण्याच्या एक दिवस आधीच झियांची सौदी–अरब पत्रांना दिलेली मुलाखत भाषांतरित होऊन फ्रेंच वकिलातीत पोचली होती. जॅकोमे सौदी–अरबस्तानात जाऊन त्यांना विनंती करून आले होते की, 'पाकिस्तानची समजूत काढायला मदत करा!' सौदींनी नकार दिला होता. इराणच्या शहांनीही जॅकोमेंना सांगितले होते की, 'पाकिस्तानजवळ अणुबाँब असावा हे आम्हालाही पटत नाही; पण याबाबत पाकिस्तान सरकारजवळ आमचे काहीही वजन नाही!' या पार्श्वभूमीवर झियांची ती मुलाखत महत्त्वाची होती.

झिया तीत म्हणाले होते– 'पाकिस्तानला शांततेसाठी अणुवीज तयार करणारी यंत्रेही देऊ नयेत, या अमेरिकेच्या दडपणाखाली येऊन फ्रान्स आम्हाला आधी देऊ केलेली संयंत्रे आता नाकारीत आहे; पण...पाकिस्तान हा एक स्वतंत्र आणि आपल्या इतिहासाचा जाज्वल्य अभिमान असलेला देश आहे ..मी फ्रेंच सरकारला सांगितले की, तुम्हाला तुमचा शब्द पाळायलाच हवा; पण फ्रान्स यावर काहीच बोलला नाही. इकडे चीन, भारत, रशिया आणि पश्चिम आशियात इस्रायल या सर्वांपाशी अणुबाँब आहे. एकाही मुस्लिम देशाजवळ तो नाही पाकिस्तानजवळ अणुबाँब आल्यास त्यामुळे इस्लामिक जगताचे सामर्थ्य वाढणार आहे...'

भुत्तोच पुन्हा अवतरले होते की काय? असोत वा नसोत; पण झिया भुत्तोंचाच सूर लावीत होते, हे मात्र नक्कीच. इस्लामाबादला पोचल्यावर जॅकोमे यांनी झियांच्या मुलाखतीचे हे भाषांतर वाचले. ही सर्व कहाणी जॅकोमे यांनी आम्हाला सुरसपणे सांगितली.

आधी ते आगा शाहींना भेटले. नंतर जनरल झियांना. तेथे शाही आणि मुनीर खान दोघेही हजर होते. भेट ४० मिनिटे चालली. जॅकोमेंनी झियांना गिस्कार्द यांचा खलिता दिला. पाकिस्तान आणि फ्रान्स यांच्यात परमाणुक्षेत्रात नवे सहकार्य राखण्याची आणि त्यासाठी पाकिस्तानच्या अणुविजेच्या गरजा भागवणारी संयंत्रे देण्याची इच्छा त्या खलित्यात प्रकट केली होती; पण पुनर्प्रक्रिया–संयंत्राबाबत मात्र मौन पाळलेले होते.

झिया संतापतील आणि काही तरी भयंकर प्रतिक्रिया व्यक्त करतील असे जॅकोमेंना वाटले होते; पण झिया शांत राहिले. त्यांनी आपल्यावर व्यवस्थित संयम राखला. आणखी एक दिवस थांबण्याची त्यांनी जॅकोमे यांना विनंती केली. दुसऱ्या दिवशी त्यांनी गिस्कार्द यांच्या खलित्याला पाकिस्तानचे अधिकृत उत्तर जॅकोमे यांच्या हवाली केले. त्यात काय लिहिले होते ते आजपर्यंत एक गुपितच राहिलेले आहे.

पाकिस्तानी सूत्रे गालातल्या गालात हसत सांगतात की, झिया यांनी आपल्या उत्तरातून फ्रान्सला स्पष्टच संकेत दिला होता की– 'फ्रान्सला आपले करार पाळता येत नसतील तर पाकिस्तान त्याला हवा तो पुढाकार याबाबत घेतल्याशिवाय राहणार नाही!' ¤

# डॉ. खान : पाकिस्तानची थक्क करणारी हेरगिरी

प्लुटोनियम झाळून घेण्याच्या यंत्रोपकरणांना फ्रान्सने नकारघंटा दिली तरी पाकिस्तानचे तसे काही बिघडले नाही. भुत्तोंच्या काळातच, जसे आंग्ल–अमेरिकी स्त्रोतांवरच पूर्णपणे विसंबून न राहण्याचे धोरण आखण्यात आले होते, तसेच कधी काळी फ्रान्सनेही मधेच अवसानघात केल्यास काय करायचे याची योजनाही तयार झाली होती. जॅकोमे झिया यांना भेटायला प्रथम इस्लामाबादला गेले, त्या भेटीत मुनीर खान यांनी इंधन-परिष्करणाची दुसरी प्रणाली अंगीकारण्याची तयारी दाखवली होती. पाकिस्तान आता त्याच प्रणालीच्या मागे लागला होता. ही प्रणाली होती प्लुटोनियमच्या ऐवजी युरेनियमच्या परिष्करणाची. अत्यंत परिष्कृत युरेनियम प्राप्त करणे हीच आता पाकिस्तानच्या अणुबाँब-निर्मितीची एकमेव आशा होती.

एकीकडे फ्रान्सशी चश्मा–योजना वाचविण्यासाठी वाटाघाटी चालू असतानाच दुसरीकडे पाकिस्तान अत्यंत गुप्तपणे जगातल्या विविध देशांतून युरेनियम–परिष्करणासाठी लागणारी यंत्रोपकरणे सुट्या भागांच्या स्वरूपात विकत घेत होता. युरोपातील ही अत्यंत गुप्त आणि अतिशय कडेकोट बंदोबस्ताखाली राखण्यात आलेली प्रणाली हस्तगत करण्याचा त्याने चंग बांधला होता. संपूर्ण यंत्र-संयंत्रे मागितली असती, तर त्यावर असलेल्या आंतरराष्ट्रीय बंदीमुळे कोणत्याच देशाने ती दिलीच नसती; पण त्या यंत्र संयंत्राची वेगवेगळी उपकरणे आणि सुटे भाग विकण्यावर कोठेही बंदी नव्हती. एक सुटा भाग या देशातून तर दुसरा दुसऱ्याच देशातून खरीदण्याचा पाकिस्तानने मोठ्या चाणाक्षपणे जो सपाटा लावला होता, तोही कुणाच्याच मनात संशय उत्पन्न करू शकत नव्हता. एकाच देशात एकाहून जास्त यंत्रोपकरणे घ्यावयाची असती तर त्यासाठीही पाकिस्तान वेगवेगळ्या फर्म्सकडून ती घेत असे आणि या सर्व व्यवहाराची

खबर या कानाची त्या कानाला लागू देत नसे.

अशा प्रकारे पश्चिमी जगताने मोठ्याच काळजीपूर्वक तयार केलेल्या परमाणु गुपित-सुरक्षेची मर्मस्थाने पाकिस्तानने हेरली आणि तेथे चंचुप्रवेश करून युरेनियम-परिष्करणाचा स्वतःचा एक कारखाना इस्लामाबादच्या परिसरातील कहूता या लहानशा खेड्यात बांधायला सुरुवात केली. कहूताची कथा एक साहसकथा आहे. तिची सुरुवात अॅमस्टरडम येथे १९७० मध्ये झाली आणि तिचा पूर्वार्ध समाप्त झाला १ मार्च १९७६ रोजी. जगातील सर्वांत मोठ्या आधुनिक हेरगिरीची ही साहसकथा आहे. तिचा नायक आहे एक परागंदा पाकिस्तानी धातुशास्त्रज्ञ डॉ. अब्दुल कादिर खान. सर्व अर्थाने पाकिस्तानच्या अणुबाँबचा हाच जनक.

याचा जन्म भोपाळमध्ये १९३६ चा. १९६० नंतरच्या दशकाच्या सुरुवातीलाच उच्च शिक्षणासाठी हा खान युरोपात आला. पश्चिम बर्लिनमधील तकनिशी विद्यापीठात त्याने जर्मन भाषा आत्मसात केली. नंतर हॉलंडला जाऊन तेथील डेल्फ्त नामक तंत्रविज्ञान-विद्यापीठातून त्यानी धातुशास्त्र-इंजिनियरिंगमध्ये पदवी संपादन केली. हे विद्यापीठ अत्यंत नावाजलेले आहे. तेथे खान १९६३ ते ६७ अशी चार वर्षे होते. शेवटी बेल्जियमच्या ल्यूवेन कॅथॉलिक विद्यापीठातून १९७२ साली त्यांनी पीएच. डी. घेतली.

डॉ. खान यांची मित्र जोडण्याची हातोटी विलक्षण होती. कारखान्यातील झाडलोट करणाऱ्यापासून अत्यंत आदरणीय अशा बड्या वैज्ञानिकापर्यंत त्यांचे कुणाशीही फारच लवकर जमत असे. ल्यूवेन विद्यापीठात डॉ.खान याचे मार्गदर्शक प्रा. एम. जे. ब्रेबर्स यांची १९८० त मुलाखत घेतली असता ते म्हणाले– 'स्वतः झीज सोसून ते इतरांची कामे करीत. व्यक्तिमत्त्व फारच लोभस आणि वागणे-बोलणे मिठास. कसे ते मला माहीत नाही; पण डॉ. खान यांनी जगभर मित्रपरिवार जोडला होता. प्रत्युत्पन्नमती नसले तरी खान हे एक हुषार वैज्ञानिक होते. एखाद्याची एखादी गोष्ट आवडली, तर त्याची प्रशंसा करायला खान सर्वांआधी हजर असत. टिपण-टाचण करण्यात त्यांचा उत्साह दांडगा होता. माहिती मिळविण्यासाठी आणि ज्ञान वाढविण्यासाठी प्रश्न विचारायला त्यानी कधीच कंटाळा केला नाही. त्यामुळेच इतर पदवी-विद्यार्थ्यांना प्रवेश मिळवणे कठीण आहे अशा सर्व ठिकाणी खान यांना मात्र मुक्तद्वार असे.

डॉ. ब्रेबर्स यांच्याबरोबरच डॉ. खान यानी भौतिकी धातुशास्त्रावरील एका ग्रंथाचे संपादन केले. या तरुण खानाने त्या पुस्तकासाठी जगातल्या सर्वश्रेष्ठ वैज्ञानिकांचे लेख कसे प्राप्त केले याचे वर्णन ब्रेबर्सनी फारच कौतुकाने केले. ब्रेबर्स म्हणाले–'मुसलमान असल्यामुळे खान डुकराच्या मांसाला आणि दारूला कधी स्पर्श करीत नसत; पण ते धर्मवेडे नव्हते. आपल्या पाकिस्तान देशाबद्दल त्यांना मोठा अभिमान होता. विशेषतः पाश्चात्य देश पाकिस्तानला नीट वागवीत नाहीत अशीच इतर पाकिस्तान्यांप्रमाणेच खानचीही भावना होती. तरीही खान जुन्या अर्थाने कट्टर राष्ट्रवादी नव्हते. खऱ्या अर्थाने ते आंतरराष्ट्रीय नागरिक होते. त्यांची मनोरचनाच तशी होती. जगातल्या कोणत्याही देशात त्याना परकेपणा वाटूच शकत नव्हता, म्हणूनच त्यानी पहिली नोकरी धरली तीच मुळी अॅमस्टरडम येथे.'

अॅमस्टरडमच्या फिजिकल डायनॅमिक्स रिसर्च लॅबोरेटरी (एफडीओ) मध्ये डेल्फ्त विद्यापीठातील त्यांचा एक माजी सहाध्यायी धातुशास्त्र-विभागाचा मुख्य होता. खान यांच्या बौद्धिक क्षमतेची त्याला चांगली माहिती होती. संधी दिसताच ती त्याने साधली आणि डॉ खान यांना आपल्या उच्च-वैज्ञानिक चमूत नेमून घेतले.

अणुइंधनासाठी अमेरिकेवर विसंबून राहणे नको या पक्क्या धारणेतून ब्रिटन, पश्चिम जर्मनी आणि हॉलंड या तीन देशानी यूरेन्को नावाचा एक क्लब स्थापन केला होता. या यूरेन्कोशी सदरील एफडीओचा घनिष्ठ संपर्क होता. यूरेन्को हॉलंडमध्ये आलमेलो येथे संयुक्तपणे युरेनियम-परिष्करण-संयंत्र उभारीत होता. या योजनेशी एफडीओचे चांगलेच सहकार्य होते. आलमेलो-संयंत्रात एक नवीच प्रणाली परिष्करणासाठी वापरण्यात येत होती. 'अत्याधिक केंद्रापसार' (अल्ट्रासेन्ट्रिफ्यूज) प्रणाली असे तिला म्हणत. यासाठी निसर्गदत्त युरेनियमचे एका विशिष्ट प्रक्रियेने युरेनियम हेक्झाफ्लओराइड या वायुरूपी पदार्थात रूपांतर करायचे आणि केंद्रापसारयंत्राच्या मदतीने त्यातील युरेनियम-२३५ या आयसोटोपचे प्रमाण वाढवून शेवटी अतिशय परिष्कृत युरेनियम प्राप्त करायचे अशी योजना आलमेलो-संयंत्रात यूरेन्कोने आखली होती. केंद्रापसाराची कामगिरी या संपूर्ण प्रक्रियेत अत्यंत महत्त्वाची होती. पाकिस्तानचे लक्ष आता या प्रक्रियेकडे वळले असतानाच डॉ. खान चक्क एफडीओतच दाखल झाले होते.

केंद्रा-पसारयंत्रात अद्भुत आणि विभिन्न वातावरणातील विविध धातुकण मिनिटाला एक लाख आवर्तने इतक्या अफाट वेगाने वायुरूपाने फिरवले जातात. एवढा वेग हे धातू कसे सहन करतात, त्यात त्यांच्यावर कोणकोणता आणि किती ताण पडतो याबाबतच्या आपल्या ज्ञानात भर घालण्याची नामी संधी डॉ. खान यांच्याकडे या नेमणुकीमुळे चालून आली होती. शिवाय अत्यंत गोपनीय अशा या अतिकेंद्रपसारप्रणालीचा वापर युरेनियम-परिष्करणासाठी कसा करतात याचाही अनुभव डॉ. खान यांना मिळू शकणार होता त्या दृष्टीने त्यांनी पावले टाकायला सुरुवात केली.

यूरेन्कोने आपल्या कारखान्यात अतिशय कडक बंदोबस्त ठेवला होता. एफडीओलादेखील त्यामुळे आपल्या सर्व कर्मचाऱ्यासाठी 'सुरक्षेस धोका नाही' अशी प्रमाणपत्रे सुरक्षाविभागाकडून घ्यावी लागत होती. डॉ. खान यांचाही त्याला अपवाद नव्हता. एफडीओने डॉ. खान यांची शिफारस केली होती. डॉ. खान यांचे धातुशास्त्रज्ञ म्हणून त्यात गौरव केला होता. यूरेन्कोच्या व्यवस्थापनाकडे ही शिफारस आली तेव्हा त्यांनीही दोन-तीन मुद्द्यांची दखल घेतली. डॉ. खान गेली अकरा वर्षे पाश्चात्य देशातच आहेत, त्यांचा इकडेच, संभवतः हॉलंडमध्येच, स्थायिक होण्याचा विचार आहे आणि त्याची पत्नी डच आहे.'

डच सुरक्षा विभाग–याला ' बीव्हीडी ' म्हणतात–'एफडीओ'च्या या शिफारसीमुळे बिनधास्त झाला. त्याने डॉ. खान याच्याबाबत जुजबी चौकशी करून त्याना मुक्तद्वार प्रमाणपत्र दिले. त्यात ' गुप्त-केंद्राचाही समावेश ' केला. नंतर ' बीव्हीडी 'ला या गोष्टीचा पश्चात्ताप झाला. कारण खरे म्हणजे खान यांची पत्नी डच नव्हतीच ! ती होती दक्षिण आफ्रिकेतील डचभाषी आणि तिचा पासपोर्ट होता ब्रिटिश !

डच आर्थिक व्यवहारमंत्रालयाने डॉ. खान यांना मुक्तद्वार प्रमाणपत्र देण्यास हरकत घेतली नाही. कारण आम्हाला मिळालेल्या माहितीनुसार मंत्रालयातील संबंधित अधिकाऱ्याचा असा समज होता की, एवीतेवी डॉ. खान यांना अतिकेंद्रापसार-योजनेवर काही प्रत्यक्षात काम करायचे नाहीच आणि त्यांचा संपर्क येऊन येऊन फक्त अशाच आकडेवारीशी येणार आहे की, सुरक्षेच्या दृष्टीने जिची किंमत फार असणार नाही. अशा प्रकारे एकदाचा मुक्त प्रवेश परवाना मिळाला आणि डॉ. खान यांनी आलमेलो-केंद्रातील त्या अत्यंत गोपनीय परियोजनेच्या गाभ्यात खोल खोल जायला सुरुवात केली.

डॉ. खान तसे मोठेच गमतीदार आणि रंगतदार व्यक्तिमत्त्व होते. ते सेक्रेटरी पोरींना नेहमीच काही ना काही खायला आणून द्यायचे. त्यात मिठाईही असायची. पोरींनी कसे जरा अंग धरले पाहिजे असे ते खांदे उडवीत म्हणायचे. त्यांना अनेक भाषा येत असत. डचही ते चांगल्या प्रकारे बोलू आणि समजू शकत होते. आपली डचभाषी

या ढिसाळ सुरक्षाव्यवस्थेचा फायदा घेऊन खान आलमेलोला वारंवार भेटी देऊ लागले. त्यातून त्यांना प्रत्यक्ष यूरेन्को-संयंत्राला भेट न देताही तेथील माहिती मिळू लागली. तशातच त्यांना काही तांत्रिक अहवालाचे भाषांतर करण्याचे कामही मिळाले. हे अहवाल डॉ. खान चक्क आपल्या घरी घेऊन जाऊ लागले तशी परवानगीही एफडीओने त्यांना दिली होती. या ' भाषांतर-कामगिरीवर ' असतानाच त्यांना आलमेलो-संयंत्राच्या उभारणीबाबतचे सर्व आराखडे आणि आकृत्या अथपासून इतिपर्यंत पहायला मिळाल्या. या संयंत्रासाठी लागणारे सुटे भाग कोणकोणत्या फर्म्सनी पुरवले आहेत त्याची यादीही त्यांनी हस्तगत केली. आता असे नक्कीच म्हणता येईल की, अतिकेंद्रापसार-संयंत्राची संपूर्ण गुप्त माहिती या पाकिस्तानी वैज्ञानिकाच्या हाती लागली होती आणि ती दुसऱ्या कुणाच्याही हाती देऊ शकण्याच्या स्थितीत तो आलेला होता.

पण अनेक वृत्तपत्रांनी त्याला जो अगदी महान–हेर वगैरे ठरवून टाकले आहे, त्यातला तो असावा असे काही आढळले नाही. पाकिस्ताननेच त्याला हे गुपित हरण करण्यासाठी पाठवले होते किंवा एफडीओमध्ये पाकिस्ताननेच डॉ. खान यांना ' पेरले ' होते असेही म्हणता येत नाही. उपलब्ध माहितीवरून आणि ' खानप्रकरण ' या मथळ्याने डच सरकारने तयार केलेल्या अहवालावरूनही डॉ. खान यांनी पाकिस्तानसाठी काम करायला १९७४ च्या अखेरी-अखेरीस सुरुवात केली, भारताने आपल्या अणुविस्फोटाने हादरा

## डॉ. खान यांनी अणुबाँब तयार करण्याच्या केंद्रप्रसार प्रणालीची खडान् खडा

पत्नी-हेन्नी आणि दोन पोरसवदा मुली यांच्यासह डॉ. खान ॲमस्टरडमच्या शिपॉल विमानतळाजवळच्याच झ्वानेनबर्ग या उपनगरात रहायला गेले. शेजारपाजारच्या डच समाजात हे कुटुंब तावडतोब मिसळले. ७९ ॲस्टेल स्ट्रीटवरील त्यांचे घर चार-चौघाच्या सामान्य घरासारखे होते. लक्षात राहण्यासारखे असे त्यांच्या घरात खास काही नव्हते. खान कुटुंब चांगले शेजारी होते आणि चांगले मित्रही. तरुण कुटुंबातली मंडळी ज्या ज्या म्हणून मजामौजा करतात त्या सर्व हे कुटुंब करीत असे खेळात आणि कामात नेहमीच दंग आणि तरबेज अशी त्यांची ख्याती होती.

खान व्हॉलीबॉल फारच सुरेख खेळत असत. त्या खेळात त्यानी ख्यातीही मिळवली होती. आणखीही बरेच खेळ त्यांना छान खेळता येत असत. अशा या हरहुन्नरी आणि जगमित्र डॉ. खान यांना ' एफडीओ ' चा कारभार चालतो तरी कसा याची संपूर्ण माहिती कळायला फारसा वेळ लागला नाही. कामावर रुजू झाल्यावर आठव्या दिवशीच स्वारी यूरेन्कोच्या आलमेलो केंद्रात जाऊन आली. एफडीओनेच त्याना तेथे पाठवले होते. तेथील सामान्य कामकाजाची माहिती घ्या, विविध प्रक्रियांचे ज्ञान प्राप्त करून घ्या आणि धातुशास्त्रातील त्यांच्या तज्ज्ञपणाचा उपयोग करून केंद्रप्रसारात वापरण्यात येणाऱ्या धातुकणांचे सामर्थ्य कसे वाढवतात ते अभ्यासा, असे सांगूनच त्यांना एफडीओने तेथे धाडले होते; पण तेथे सुरक्षा-व्यवस्थेचा भंग झाला होता.

दिल्याच्या जवळजवळ सहा महिन्यानंतर.

डॉ. खान यांच्या शेजाऱ्यापाजाऱ्यांनी त्यांच्याकडे परदेशी वकिलातीच्या गाड्यांची वर्दळ वाढल्याचे आणि आलेले पाहुणे उत्तररात्रीपर्यंत त्यांच्याकडेच असल्याचे पाहिले होते; पण आंतर्राष्ट्रीय परिचय असलेल्या डॉ. खान यांच्याबाबतीत अशा पार्ट्या चालायच्याच असे मानून कुणालाही त्याबाबत कधी शंका आली नाही. आता डॉ. खान यानी पाकिस्तानच्या नोकरीत जाण्याचा प्रयत्न केला की पाकिस्ताननेच त्यांना नोकरी दिली हे कळायला मार्ग नाही. आपल्या सरकारला नेमके काय हवे आहे ते डॉ. खान यांच्यासारख्या परागंदा पाकिस्तान्याने नक्कीच ओळखले असावे; पण ते काहीही असो, पाकिस्तानसाठी डॉ. खान यांनी काम करायला सुरुवात केली ११७४ च्या अखेरीलाच.

यूरेन्कोने जर्मन भाषेतून डच भाषेत भाषांतर करण्यासाठी म्हणून डॉ. खान यांना जो एक अत्यंत गोपनीय असा टेकनिकल–अहवाल दिला, तो मुळीत नाझींनी हिटलरसाठी निर्वाणीचे अस्त्र तयार करण्यासंबंधीचा होता. हे गुपित रशियात जाऊन आता परत जर्मनीत आलेले होते. वैज्ञानिकांनी आता त्यातील तंत्रामंत्राचा उत्कृष्ट विकास केला होता आणि त्याचे प्रयोगही करून पाहिले होते. त्यातील नवी प्रणाली अंमलात आणण्याची यूरेन्कोला आशा होती. त्यासाठीच त्याना तो गुप्त अहवाल जर्मन भाषेतून डच भाषेत रूपांतरित करून हवा होता.

या ' भाषांतर–कामगिरीवर ' डॉ. खान यांनी तीन किंवा चार आठवड्यांत एकूण सोळा दिवस काम केले. ते संयंत्राच्या आतच त्याच्यासाठीच खास ठेवलेल्या एका डेस्कवर बसून आपले काम करीत. त्यांचे डेस्क संयंत्राच्या एका अत्यंत संवेदनशील विभागात ठेवले होते. याच ठिकाणी अंतिम योजना आणि आराखडे तयार करण्यात येत असत. या विभागाला–' मस्तिष्क–दालन ' असे म्हणत. त्यासाठी एक स्वतंत्र तात्पुरती इमारतच यूरेन्को परिसरात उभारली होती. सर्व डेस्के आणि कार्यालये कुलुपबंद राखा आणि सर्व काम विभागून त्या त्या विभागातच ठेवा, शिवाय ज्याना ठाऊक असणे अपरिहार्य आहे तेवढ्यानाच सारी माहिती द्या असे कडक आदेश या ' मस्तिष्क–दालनाबाबत ' दिलेले होते.

पण हे नियम सुरक्षा-व्यवस्थेत प्रत्यक्षात कोणी पाळत नसे.येथे आलेला प्रत्येक माणूस सुरक्षेस धोकादायक नाही असे प्रमाणपत्रच घेऊन आलेला असल्यामुळे त्याच्यापैकी कोण कुठे जातो-येतो आहे, याची फारशी पर्वा कुणी करीत नसे त्यातही डॉ. खानसारख्या गोड-बोल्या माणसाला अडवणार कोण ?

त्या कामगिरीवर डॉ. खान सोळा दिवस होते. त्या काळात त्यांनी केंद्रापसारची संपूर्ण कार्यपद्धती समजून घेतली. आलमेलोच्या केंद्रापसार-परिसरात एकदा डॉ. खान काही तरी नोंदी करून घेत असल्याचे एकाला आढळले. त्याने विचारले, ' डॉक्टर, काय करताहात ?' डॉ. खान यांनी उत्तर दिले, ' काही नाही, घरच्या मंडळीना ओतील आपल्या एका सहकाऱ्याला केंद्रापसारच्या काही आराखड्यांची छायाचित्रे काढण्यासाठीच आपल्या बंगल्यावर ये म्हणून सांगितले.

तोवर डॉ. खान पाकिस्तानच्या अणुबाँब-योजनेवर काम करूही लागले होते; पण डचाना याचा सुगावा लागला. आर्थिक व्यवहार-खात्याने एफडीओला सांगून डॉ. खान यांची बदली एका नव्या पदावर करायला लावले. या पदाचा केंद्रापसारशी कोणताही संबंधच येत नव्हता. आपले ॲमस्टरडॅममधले काम आता संपले आहे याचाच तो संकेत आहे असे डॉ. खान यांनी ओळखले. त्यांच्या पाकिस्तानी मित्रांच्या दृष्टीनेही आता डॉ. खान याची हॉलंडमधील उपयुक्तता संपली होती. डॉ. खान यानी अचानक चार महिन्यांची रजा घेतली. ते पाकिस्तानला परत गेले आणि तेथूनच १ मार्च १९७६ रोजी त्यानी आपल्या पदाचा राजिनामा दिला. येथूनच डॉ. खान यांच्या कामगिरीचा उत्तरार्ध सुरू झाला.

डॉ. खान यांनी हे सर्व इतक्या बेमालुमपणे केले की, कुणालाही काही शंका आली नाही. उलट, ' चला बरे झाले. बिचाऱ्याला त्याच्या मायदेशात चांगली नोकरी तर मिळाली ! ' असेच धन्योद्गार त्यांच्या डच मित्रपरिवारांनी काढले. आपल्या या अत्यंत कृपाळू मित्र डॉ. खान यांनी हॉलंडमधून नेमके काय पळविले आहे आणि किती बेमालूमपणे आणि राजरोसपणे नेले आहे, तसेच डॉ. खान पाकिस्तानात जाऊन आता नेमके काय करीत आहेत, याचा पत्ता त्यांना

## माहिती पाकिस्तानात नेली हे जेव्हा बाहेर आले तेव्हा एकच गोंधळ उडाला.

जरा पत्र लिहितो आहे.' आणखी एका सहकाऱ्याने जेव्हा केंद्रापसार संयंत्राच्या विविध भागात कामाला जाताना डॉ. खान आपल्याजवळ नेहमीच एक नोंदवही बाळगतात आणि तीत काही ना काही नोंदी करीत असतात असे पाहिले, तेव्हा ती गोष्ट मोठीशी महत्त्वाची आहे असे त्याला वाटलेच नाही. पण डॉ. खान यानी अणुबाँब तयार करण्याच्या केंद्रापसार-प्रणालीची खडा न् खडा माहिती पाकिस्तानात नेली ही गोष्ट जेव्हा बाहेर आली आणि सर्वत्र एकच धादल उडाली, तेव्हा या कर्मचाऱ्याने आपण त्याना नोंदवहीत टिपणे घेताना पाहिले होते एवढीच माहिती वर कळवली.

त्या ' मस्तिष्क–दालनात ' खान यांच्याच खोलीत आणखीही एक तंत्रज्ञ बसत असे. केंद्रापसार संयंत्राचे बरेच आराखडे त्याच्याकडे होते; पण त्याला सतत आपले मेज सोडून संयंत्रावर जावे लागे. तो गेला म्हणजे डॉ. खान यांना त्याचे ते आराखडे पहायला मिळत. त्यानी त्या सर्व आराखड्याच्या नकला उतरवून घेतल्या. अशा प्रकारे विशेष असे कोणाच्याही नजरेत न येता डॉ. खान यांनी सोळा दिवसात आपली ती 'भाषांतर कामगिरी' पूर्ण केली आणि ते एफडीओमधील आपल्या नेहमीच्या कामावर परत गेले. तेथे ते केंद्रापसार संयंत्रात मिळालेल्या सर्व माहितीचा आणि अणुबाँब तयार कसा करायचा याचा अभ्यास करीत राहिले; परंतु माहिती हाती आल्यानंतर ते पहिल्यासारखे दक्ष राहिले नाहीत. त्याच्या हातून निष्काळजीपणा होऊ लागला. अशीच एक चूक झाली जेव्हा त्यांनी एफडी-कालांतराने लागला तेव्हा युरेन्कोच्या सदस्य–देशात आणि एकूणच पश्चिम युरोपात प्रचंड खळबळ उडाली !

' डॉ. खान एक प्रचंड गूढ ', ' जेम्स बाँडचा इस्लामी अवतार ', ' पौर्वात्य जादू वापरून पाश्चात्य गुपिताचे अपहरण ', ' इस्लामसाठी बाँबची चोरी करणारा हेर ', ' क्लॉस फ्युक्स आणि ॲलन नन मे या गुपिते क्रेमलिनला नेणाऱ्या हेरांनंतर सर्वात मोठी परमाणु–हेरगिरी करणारा डॉ. खान ! ' अशा सनसनाटी मथळ्यानी युरोपातल्या जवळजवळ सर्वच वर्तमानपत्रानी धमाल आणि कमाल केली. जर्मनीच्या ' डेर स्पेगल ' आणि लंडनच्या ' एट डेज ' या नियतकालिकानी डॉ. खान यांच्या हेरगिरीच्या रसभरित आणि प्रदीर्घ कहाण्याच प्रसिद्ध केल्या; पण डॉ. खान यांनी या वृत्तपत्रांचा हा नेहमीचाच धंदा आहे असे म्हणून त्या कहाण्यांची आणि सनसनाटी मथळ्याची उपेक्षा केली.

भुत्तो याच्या योजनेप्रमाणे अतिकेंद्रापसारप्रणालीने परिष्कृत युरेनियम आणि त्यापासून अणुबाँबनिर्मिती करण्याच्या सर्व तंत्रा-मंत्राची खडा न् खडा माहिती घेऊन डॉ खान पाकिस्ताला परतताच भुत्तोनी आपल्या सहकाऱ्यासह अणुबाँब तयार करण्याचा एक धडक कार्यक्रम आखला. या कार्यक्रमानुसार इस्लामाबादच्या नैऋत्येला काही मैलांवर सिहाला येथे एक छोटे अतिकेंद्रापसार-प्रतिष्ठान-प्रयोग म्हणून उभारण्यात यावयाचे होते आणि त्याच रस्त्याने आणखी खाली दक्षिणेला कहूता येथे १०,००० केंद्रापसार-युनिट-क्षमतेचे एक

**एस. ए. बट–' होय, तीन वर्षांत अणुबाँब तयार करणे शक्य आहे, '**

औद्योगिक संयंत्र उभारण्यात येणार होते. सिहाला आणि कहूता ही दोन्ही ठिकाणे ' पेन्स्टेक 'च्या (पाकिस्तान इंस्टिटयूट ऑफ टेक्नॉलॉजी ) मागच्या परसदारात असल्यासारखीच होती. पिन्स्टेकचे पुनर्प्रक्रिया–संयंत्रही तेथेच होते. त्यामुळे इस्लामाबादचा हा परिसर एक भव्य असा परमाणु–पार्कच बनून गेला होता.

पाकिस्तानने हेरगिरी करून अतिशय महत्त्वाची आणि मोक्याची प्रक्रिया हस्तगत केली, तिचे टाइमिंग पाहण्यासारखे आहे. फ्रान्स प्लुटोनियम–परिष्करणास नकार देऊ लागला होता. चश्मा–योजना त्यामुळे वाध्यात पडू पहात होती. अन्य कोणत्याही मार्गाने परमाणु-विस्फोटके तयार करण्यासाठी लागणारी सामग्री पुरवायलाही फ्रान्स आढेवेढे घेऊ लागला होता. अशा वेळी या सर्वस्वी नव्या, अत्यंत गोपनीय आणि अणुबाँब तयार करण्यासाठी अत्यंत अपरिहार्य अशा पर्यायी प्रक्रियेची दोन संयंत्रे सिहाला आणि कहूता येथे उभी राहिली होती. हे सर्व काम फ्रान्सने प्रत्यक्षात परमाणु–सामग्रीचा पुरवठा थाबवण्याच्या आत झाले होते. (फ्रान्सचे राष्ट्रपती गिस्कार्द यांना जनरल झिया यानी ' तुम्ही नकारच दिलात तर पाकिस्तान याबाबत पुढाकार घेतल्याशिवाय राहणार नाही !' असे उत्तर दिले होते. त्या उत्तरात म्हटला होता तो पुढाकार हा असा होता. मौज ही की, झिया अधिकारावर येण्याआधीच भुत्तोंनीच तो पुढाकार घेऊन ठेवला होता.

या नव्या उपक्रमाला ' परियोजना–७०६ ' असे नाव पाकिस्तानने दिले. पाकिस्तान अणुशक्ति–आयोगाचे अध्यक्ष मुनीर अहमद खान याच्या नेतृत्वाखाली आणि आयोगाच्या देखरेखीखाली ही परियोजना सुरू झाली. लष्कराच्या विशेष बांधकामसंघटनेला बांधकामाचे आणि त्यासाठी लागणाऱ्या खरेदीचे काम देण्यात आले. ताज्या अनुभवाचे आणि दमाचे डॉ. अब्दुल कादिर खान यांनी नवीन इंजिनियरिंग सशोधनप्रयोगशाळेची सूत्रे आपल्या हाती घेतली. तेथे त्यांनी नव्या अणुकेंद्रापसारांची डिझाइन्स आणि आराखडे तयार केले आणि त्यांच्या निर्मितीसाठी लागणारी यंत्रोपकरणे आणि त्याचे सुटे भाग किती, कोठून आणि कसकसे विकत घ्यायचे याची एक यादीही तयार केली.

तसे पाहिले तर मुनीर खान आणि अब्दुल कादिर खान यांचे आपसात कोणतेही नातेबिते नव्हते; पण डॉ. खान यांना आपले फारा [दिसाचे उराशी बाळगलेले स्वप्न साकार होत असल्याचा आनंद मिळत होता. एकदा निर्णय झाला की, आपण अतिशय वेगाने हालचाली करतो आणि साधनांची व कल्पकतेची आपल्यापाशी मुळीच वाण नाही, हे त्यानी यापूर्वीच दाखवून दिले होते. आता पाकिस्तानात ' आलमेलो ' उभारण्याची तृतीय विश्वाची एक अत्यंत महत्त्वाकांक्षी इंजिनियरिंग-परियोजनाही आपण उत्तम प्रकारे हाताळू शकतो हे त्यांना सिद्ध करून द्यायचे होते.

आणि डॉ. खान ही योजना यशस्वी करून दाखवतील याबद्दल त्याचे मार्गदर्शक प्रा. ब्रेबर्स यांना मुळीच शंका नव्हती. पाकिस्तानात डॉ. खान यांना भेटून आल्यानंतर ब्रेबर्स म्हणाले– ' डॉ. खान यांची मनोरचना मस्त आहे. संघटनकौशल्य अप्रतिम आहे. कोणत्या कामासाठी कोणत्या माणसाची निवड करावी याची पारख त्यांना फारच सुरेख आणि अचूक आहे. आपल्या कामाची चांगली माणसे जगात कुठे आहेत आणि ती आपल्याला कशी मिळवता येतील हेही डॉ. खान चांगले जाणतात. राहिला प्रश्न यंत्रोपकरणे आणि सुटे भाग खरीदण्याचा. डॉ. खान याचा जगातल्या फर्म्सशी इतका चांगला परिचय आहे की, त्याच्या सहकाऱ्यांना जेथे पायही ठेवता येणार नाही अशा ठिकाणाहून डॉ. खान त्यांना हवी ती खरेदी करून मोकळे होतील !'

पाकिस्तानची खरेदी–योजना १९७६ त सुरू झाली. खरेदीच्या कामात सर्वोत्तम असलेल्या एस. ए. बट नावाच्या इसमाकडे सर्व खरेदी–कामगिरी सोपवण्यात आली. ' होय, तीन वर्षांत अणुबाँब तयार करणे शक्य आहे ', असे उत्साहाने मुलतानच्या त्या पहिल्या बैठकीत हाच बट म्हणाला होता. त्याचा तो उत्साह अर्थातच अनाठायी आणि अवास्तवही होता; पण त्यामुळे तो भुत्तो यांना पसंत पडला होता आणि त्यानीच त्याची नेमणूक ब्रुसेल्समधल्या पाकिस्तानी वकिलातीत विज्ञान आणि तंत्रविद्या याच्या विभागाचा प्रमुख म्हणून केली होती. प्रथम ब्रुसेल्समध्ये आणि नंतर पॅरिसमध्ये बट आणि त्याचे सहकारी बेल्जोन्युक्लियर आणि एसजीएन या कंपन्यांशी सौदा पटवीत होते. त्याच वेळी डॉ. खान यानी अतिकेंद्रापसार–उभारणीसाठी लागणाऱ्या सामग्रीची जी यादी तयार केली होती तिच्यातील सर्व माल खरीदण्याची जबाबदारी मुख्य एजंट या नात्याने बट याच्यावरच टाकण्यात आली होती.

पॅरिसच्या शिवेलगत एक अगदी मामुली कचेरी थाटून बट क्रमाक्रमाने खरेदी करू लागले होते. बट आणि त्याचे सहकारी पाकिस्तानच्या मान्यताप्राप्त वकिलातीचे प्रतिनिधी होते. त्यानी तस्करीने वा चोरटेपणाने कोणताही माल खरीदला नाही की पाकिस्तानला पाठवला नाही. अगदी राजरोसपणे, अमुक सुटे भाग पाकिस्तानला कोणत्या कामासाठी हवे आहेत ते खुल्लमखुल्ला सागून त्यांनी ही खरेदी केली. ब्रिटनमध्ये तर कमालच झाली. ' तुम्हाला हे इन्व्हर्टर्स हवेत तरी कशासाठी?' अशी उलट विचारणा बट यांचेकडे विक्रेत्याने केली. तेव्हा बट यांनी सरळसोटपणे उत्तर दिले, 'आम्हाला एक सुती कापडाची गिरणी उभारायची आहे आणि तिच्यात जे केन्द्रापसार-यंत्र आम्ही वापरणार आहोत त्याच्या उपकरणाच्या रूपाने आम्हाला हे इन्व्हर्टर्स हवे आहेत !' त्याच वेळेला डॉ खान यांनी अणुबाँबची गुपिते पाकिस्तानात नेलीच कशी याची चौकशी हॉलंडने बसविली होती आणि त्याच सुमारास बट यांच्यासारखा महाकलंदर माणूस इन्व्हर्टर्सची खरेदी त्याच हॉलंडमधून करीत होता!

कुठून इन्व्हर्टर्स घे, कुठून इन्व्हर्टर्सची ऑर्डर नोदव, कुठे व्हॉल्व्हची मागणी कर, तर कुठे व्हॅक्युअम–उपकरणे विकत घे, असा बट आणि मंडळींचा सपाटा चालला होता. यापैकी कोणतीही वस्तू परमाणु–

निर्बन्धाखाली निर्यातीस मनाई केलेली नव्हती. युरोपभर पाकिस्तानची ही खरेदी चालू होती. ॲल्युमिनियमच्या ट्यूब, रॉड्स, व्हॅक्युअम–पंप, वायुशुद्धीकरणाची उपकरणे, पिवळी पोळी ( निसर्गदत्त युरेनियम ) अशा अक्षरशः शेकडो वस्तू पाकिस्तानचे हे प्रतिनिधी दिवसाढवळ्या विकत घेत होते. खरेदी प्रचंड होती. तिची किंमत अवाढव्य होती; पण पाकिस्तान ती मोजीत होता ! एका डच फर्मकडे तर पाकिस्तान्यांनी मार्तेंझिटिक पोलादाची मागणी नोंदवली. हे पोलाद म्हणजे एक मिश्रधातू आहे. तो इतका टणक असतो की, त्याचा वापर बहुतेक फक्त जेट विमानाची इंजिने आणि वायुकेन्द्रापसारके यांच्यासाठीच करण्यात येतो. पाकिस्तानचा हा मिश्रधातु खरीदण्यातील हेतू काय आहे याची यावरून सहज कल्पना येण्यासारखी होती; पण कुणीही–अगदी भारतीयांनीदेखील आपल्या वरिष्ठांना त्याबाबत काहीही कळवले नाही !

पाकिस्तानने ही खरेदी हॉलंड, स्वित्झर्लंड, ब्रिटन, अमेरिका, पश्चिम जर्मनी, फ्रान्स, दक्षिण आफ्रिका अशा निरनिराळ्या देशात, निरनिराळ्या कंपन्या आणि फर्म्सकडून केली. या सर्व खरेदीचे मार्गदर्शक डॉ. खान होते आणि संचालक मुनीर खान !

ज्या ठिकाणी पाकिस्तानला सरळ माल विकण्यास नकार येण्याचा संभव होता तेथे तेथे या मंडळींनी नव्या आणि नाना कंपन्या स्थापन केल्या. या नामधारी कंपन्यांनीही आणखी तितक्याच कंपन्यांना मधे घातले आणि प्रत्यक्षात चौथ्या कंपनीमार्फत आपल्याला हवा तो परमाणु–सामग्री खरीदण्याचा प्रकार !

पाकिस्तानात भुत्तोंनी सुरू केलेला अणुबॉंब –प्रकल्प जनरल झियांनी चालू ठेवला आणि याचा अर्थ एकच आहे की, पाकिस्तानने अद्याप तयार केलेला नसेल तर, आता कोणत्याही दिवशी तो अणुबॉंब तयार केल्याची घोषणा करण्याच्या अवस्थेत नक्कीच आलेला असणार ! पुन्हा तोच प्रश्न आला–नट आणि बोल्ट यापासून उद्या एखादे महाभयकर अणुबॉंब तयार करता येणार असेल तर जगात कुणी नट–बोल्ट तयार करायचेच नाहीत की काय? विकायचेच नाहीत की काय ? नट–बोल्ट–उत्पादन आणि अणुबॉंबनिर्मिती यातली लक्ष्मण–रेषा नेमकी कुठे सुरू होते? कुठे संपते ?'

या प्रश्नांची उत्तरे सोपी नाहीत; पण त्यातील मर्म पाकिस्तानच्या डॉ. खान, मुनीर खान आणि इकरम–उल–हक खान यांनी आणि त्यांच्या मुत्सद्दी सहकाऱ्यांनी अचूक हेरले आणि अत्यंत घातक अशी परमाणु–अस्त्रे बनविण्याची तंत्रविद्या आणि यंत्रोपकरणे पाकिस्तानी चमूने अगदी राजरोसपणे खुल्या बाजारातून विकत घेतली ! तिचे जनक डॉ. अब्दुल कादिर खान हे होते. त्यांनी हॉलंडमधून अणुबॉंब तयार करण्याची विद्या हस्तगत केली आणि त्या विद्येचा उपयोग त्यांनी पाकिस्तान अण्वस्त्रसज्ज करण्यासाठी करून घेतला ही गोष्ट हॉलंडमध्ये प्रथम १९७९ मध्ये बाहेर आली!

तेव्हा प्रचंड खळबळ उडाली शेवटी डच ससदेने डॉ. खान यांच्या हॉलंडमधील कारवाईंची चौकशी करण्याकरिता एक मंडळ बसविले.

## असे उत्साहाने मुलतानच्या त्या पहिल्या बैठकीत हाच बट म्हणाला होता.

सौदा पटवला! पाश्चात्य देशात व्यापार म्हणजे व्यापार. सरकारची त्यात लुडबूड खपवून घेतली जात नाही. सरकारने नियम करावेत आणि सर्व कपन्यानी ते बिनबोभाट पाळावे हा शिरस्ता; पण नियमांचा अर्थ एखाद्या कंपनीने आपल्या हितासाठी विशिष्ट प्रकारे लावला तर आणि त्यातून असलेल्या पळवाटांचा वापर केला तर, कायदा कंपनीचे रक्षण करणार, असा प्रकार. पाकिस्तानने याचा भरपूर फायदा घेतला. त्याचे सर्व खरीददार अतिकेन्द्रापसार–यंत्रासाठीच आपल्याला हे सुटे भाग हवे आहेत असे बिनदिक्कत सांगत. ह्या माणसाना खूळ लागलेय असे म्हणून कंपन्या यांना तो माल देत'

ब्रिटनमध्ये स्विनडन इथल्या एका कारखान्याच्या एका माजी इंजिनियरने आम्हाला नंतर सागितले की, युरेनियम–परिष्करणासाठी आम्हाला अतिकेन्द्रापसार–यंत्रणेत वापण्याकरता इन्व्हर्टर्स हवी आहेत असे पाकिस्तान्यानी आमच्या इमरसन इलेक्ट्रिक या कंपनीला सांगितले तेव्हा कपनीने त्याना ती इन्व्हर्टर्स विकली. त्या वेळी कंपनीच्या संचालकानी जे नमूद केले ते विचारात घेण्यासारखे आहे.– 'पाकिस्तानी जी तंत्रविद्या आणि यंत्रोपकरणे मागत आहेत ती इतकी गुंतागुतीची, समजायला कठिण आणि चालवायला तर त्याहून दुर्गम अशी आहेत की, पाकिस्तान्यांना त्याचा वापर कधीही करता येणार नाही आणि ज्या पेट्यामधून आपण ती त्यांना पाठवू त्या पेट्यामध्येच पडल्या पडल्या ती गंजून जातील ! 'वेश असावा बावळा,परी अतरी असाव्या नाना कळा'असाच होता हा पाकिस्तानी

या मंडळाचा अहवाल १९८० च्या सुरुवातीला सादर करण्यात आला. त्यातून निष्पन्न काहीही झाले नाही. संबंधित विभागानी या जागतिक हेरगिरीबद्दल 'कोण म्हणतो टक्का दिला?' या पोरखेळातल्यासारखा दोष दुसऱ्यावर ढकलण्याचा प्रयत्न केला. निखळ असा कोणताही पुरावा समोर आला नसला तरी अण्वस्त्राच्या निर्मितीसाठी अत्यंत आवश्यक असलेली आणि प्लुटोनियमला पर्यायी अतिकेंद्रापसार–तंत्रविद्या डॉ. खान यानीच पाकिस्तानात नेली ही गोष्ट आता सर्वमान्य झाली आहे. सरतेशेवटी डॉ. खान हेच या प्रकरणात अत्यंत वादळी व्यक्तिमत्त्व ठरले आहे. यूरोपभर डॉ. खान याच्याबद्दल सध्या प्रचंड चर्चा चालू आहे. सुरक्षा–नियम जास्त कडक आणि काटेकोर करण्यात येत आहेत. प्रत्यक्ष वा परोक्ष परमाणु–सामुग्रीच्या विक्री व निर्यातीवरील निर्बंधातील पळवाटा बुजवण्यात येत आहेत.

हॉलंडचे मित्रदेश त्याच्यावर नाराज आहेत. का नाही त्याने डॉ. खान यांच्या कारवायांकडे मित्रदेशाचे वेळेवरच लक्ष वेधले ? इस्रायल तर जास्तच संतापला. त्याचे पतप्रधान बेगिन यांनी डच पंतप्रधानाना खडसावून पत्र लिहिले– 'पाकिस्तानला परमाणु–सामुग्रीची विक्री होऊच कशी दिलीत ? आणि आता त्याने बॉंब तयार करू नये यासाठी काही करणार आहात की नाही ?' आपल्या या पत्रात बेगिन यानी आणखी एका मुद्द्याकडे डचाचे लक्ष वेधले– पाकिस्तानला त्याच्या परमाणु–प्रकल्पासाठी पैसा पुरवला आहे

लिबियाच्या कर्नल गदाफी यांनी आणि गदाफीचा दृष्टिकोण इस्रायलबद्दल आणि एकूणच पाश्चात्य राष्ट्रांबद्दल काय आहे ते काही नव्याने सागण्याची गरज नाही.

पण अमेरिका आणि ब्रिटन नुसता संताप व्यक्त करून थांबले नाहीत. त्यांनी आधी पळवाटा बंद केल्या. त्यांनी सीआयएला सांगितले की, पाकिस्तानने नेमके काय काय खरीदले आहे याचा तपास काढा ! सीआयएने तपास काढला आणि त्यानी जे चित्र उभे केले ते तर भल्या भल्या विश्लेषकांनाही मूर्च्छा आणणारे होते– 'चश्मा–योजनेला खीळ घालण्याच्या प्रयत्नात अमेरिका आणि फ्रान्स दोघेही गुतले असतानाच पाकिस्तानने अणुबाँब तयार करण्यासाठी लागणारी जवळजवळ सर्व सामुग्री विकत घेतली असून, जे विकत घेता येणे शक्यच नाही ते डॉ. खान आता कहूता येथील आपल्या अतिकेंद्रापसार–संयंत्रात स्वत.च तयार करण्याच्या उद्योगात गुंतले आहेत !'

अमेरिकेचा राग मुख्यतः स्वित्झलॅंडवर होता. कारण त्यांना भीती होती की, कदाचित स्विस कंपनी 'कोरा' यूरेनियमचा आधी वायू बनवून केंद्रापसारानतर त्याचे परत अत्यंत परिष्कृत यूरेनियम तयार करण्याचे दुसरे संयंत्रही कदाचित पाकिस्तानला विकेल. त्याला असे संयंत्र त्याच्या कहूता–सकुलाकरता हवेच आहे. म्हणून अमेरिकेने स्वित्झलॅंडला कडक पत्र पाठवले आणि त्यात अशी गर्भित धमकीही दिली की, अमेरिकेतून परिष्कृत यूरेनियमचा स्विस कंपन्यांना होत असलेला पुरवठा बंद केला जाऊ शकतो किंवा मुळात अमेरिकेचे असलेले प्रयुक्त अणु–इंधन पुन्हा प्रक्रिया करण्यासाठी स्विस कंपन्याना पाठवण्यास खोळंबा केला जाऊ शकतो.

पण आंतरराष्ट्रीय परिस्थिती झपाट्याने बदलत होती. इराणच्या शहाचा पाडाव झाला होता. अफगाणिस्तानात राज्यक्रांतीनंतर कम्युनिस्ट राजवट आली होती. अमेरिकेच्या सामरिक चिंतनात आता पाकिस्तान हाच काय तो एक बालेकिल्ला झाला होता. त्या पाकिस्तानातही जनरल झिया सत्तेवर आले होते. त्यांनी भुत्तोंना फासावर चढवले असले तरी भुत्तो–प्रणीत अणुबाँब तयार करण्याची योजना चालूच ठेवली होती. पाकिस्तानला सघर्षपथावर ढकलणे अमेरिकेच्या दूरगामी राजकारणाच्या दृष्टीने इष्ट नव्हते.

काय करावे याचा अमेरिकेत सतत विचार चालू होता. पाकिस्तानला देण्यात येत असलेली विकास–सहायता आणि आर्थिक मदत थांबण्याची घोषणा प्रथम–प्रतिक्रिया म्हणून केव्हाच केलेली होती. अनेक विशेष अभ्यास–तुकड्या नेमण्यात आल्या होत्या. अणुबाँब तयार करण्यापासून पाकिस्तानला परावृत्त करावे, प्रतिबंधित करावे यासाठी उपाय सुचवा असे या विशेष अभ्यास–दलांना सांगण्यात आले होते. एका अभ्यासदलाचे नेतृत्व राजदूत गेरार्ड स्मिथ याच्याकडे होते. त्यांनी 'काठी आणि गाजर' धर्तीचे तीन उपाय सुचवले. एक– पाकिस्तानला त्याची पारंपरिक संरक्षण–व्यवस्था आणखी भक्कम करण्यासाठी जास्त आधुनिक धर्तीची 'एफ–१६' विमाने द्यावीत. दोन– कडक आर्थिक नाकेबदीची धमकी देऊन पाकिस्तानात खासगी अमेरिकन गुतवणूक आणि जागतिक बँकेसारख्या इतर आंतरराष्ट्रीय पतपुरवठा–संस्थांकडून त्याला मिळणारी कर्जेही थाबवण्याचा इषारा द्यावा. तीन–(हा फारच आश्चर्यकारक उपाय होता.)– निमलष्करी संघटनांकडून कहूता–परिष्करण–केंद्रावर हल्ला चढवून ते उध्वस्त करून टाकावे.

स्मिथ याचा हा अहवाल प्रसिद्ध झाला तेव्हा पाकिस्तान खूपच चरफडला. स्मिथ याचा तिसरा उपाय प्रत्यक्षात आला तर पाकिस्तानचे सगळेच मुसळ केरात जाऊ शकले असते. अमेरिकेने या उपायाचा इन्कार केला असला तरी पाकिस्तानने मात्र तो गंभीरपणे घेतला. त्याने इस्लामाबादमधल्या अमेरिकन वकिलातीकडे याचा रीतसर निषेधही नोदवला. इतके करूनही पाकिस्तान थावला नाही. त्याने कहूता येथे फ्रेंच कोरेल–प्रक्षेपास्त्राची मोर्चेबंदी केली. अमेरिका, भारत किंवा इस्रायल याच्यापैकी कुणीही (ओसिराक केंद्रावर केला तसा) कहूतावर विध्वसक हल्ला चढवायचा विचार केला तर त्याना जरब बसावी अशी ही प्रक्षेपास्त्रे होती !

शिवाय पाकिस्तानने विषाची प्रचीती नको म्हणून आणखीही खबरदारी घेतली. आपल्या परमाणु–केंद्राभोवती त्याने उंच भिंत उभारली. कहूता आणि सिहाला इत्यादि परमाणु–प्रतिष्ठानांभोवती साध्या वेषातील पोलीस–पहारा अहोरात्र बसवला. डॉ. खान याना या युगातील परमाणु–गुपिते पळवणारा सर्वात मोठा पाकिस्तानी हेर म्हणून ज्याचे रसभरित वर्णन पाश्चात्य वृत्तपत्रांनी केले, त्या डॉ.खान यांना पाकिस्तानने सशस्त्र सैनिक रक्षक दिले ! (क्रमशः)


" एका वेगळ्या विषयावर भर देणारी ही कादंबरी.
स्त्री-बुवाबाजीच्या प्रकारांमागचे मर्म उलगडून सांगणारी.
कुठलंही भाष्य न करता एक सत्यघटना जशीच्या तशी
मांडल्याने झपाटून टाकण्याचे चागलेच सामर्थ्य या
कादंबरीला लाभलंय. त्याच त्या प्रेमाच्या त्रिकोणकथांपेक्षा
एक महत्वाचा सामाजिक विचार लालित्यपूर्णतेने
या नवोदित लेखकाने घडवलाय, त्यामुळे बुवाबाजीसारख्या
गोष्टीबाबत वाचक अधिक जागरूक बनतील."

पुस्तक पंढरी / ऑगस्ट १९८२ अंक
बाँबे बुक क्लब–ऑगस्ट निवड

**सबला**

लेखक : माधव शिरवळकर.
राजहंस प्रकाशन, पुणे ३०
मूल्य : रुपये बारा

# फिलिप्स : पृष्ठ ११ वरून

रोजी युनियनचे एक कार्यकर्ते श्री. कडलक याना बेदम मारहाण झाली. ६ एप्रिल रोजी युनियनचे अध्यक्ष श्री. हडके यांना मारहाण झाली. श्री. हडके यांना मारणाऱ्या गुंडाना कामगारांनी कंपनीच्या बसेसमधून जाऊन मारहाण केली. या प्रसंगी श्री. हडके रुग्णालयात असूनही त्यांना आरोपी क्र. १ करण्यात आले आहे. युनियनच्या म्हणण्यानुसार मॅनेजमेन्टचे हे पूर्वनियोजित हल्ले होते तर व्यवस्थापनाने, 'बस' घेऊन गेल्यामुळे कंपनीची बदनामी झाली, असे सांगून कामगारांना तंबी दिली. १८ एप्रिल रोजी श्री. हडके याचा अटकपूर्व जामीन मंजूर झाला व या पार्श्वभूमीवर २० एप्रिलची बैठक भरली.

या बैठकीत व्यवस्थापनाने उत्पादनवाढीची हमी दिल्याशिवाय शैक्षणिक भत्ता मान्य करता येत नाही असे जाहीर केले. युनियनने लेखी हमीस नकार दिला; परंतु सहकार्य म्हणून उत्पादनाच्या गोष्टीत लक्ष घालण्याचे आश्वासन दिले; व्यवस्थापन मात्र या गोष्टीला तयार न झाल्याने बोलणी फिसकटली व २१ एप्रिलपासून कारखान्यातील निर्जीव नोटिसबोर्ड जिवंत झाला. 'फिलिप्स'मधील अशांततेबद्दल जाब विचारणाऱ्या नोटिसा त्यावर झळकू लागल्या. कामगारांनीही कारखान्यात शिवीगाळ आणि दहशतीचे वातावरण निर्माण केले. पुण्यातील नगरसेवकांनी या दहशतवादाचा निषेध करणारा ठराव पालिकेत मंजूर केला. याच काळात १८–१९ फेब्रुवारीच्या घटनाकडे बोट दाखवत 'सकाळ' व 'महाराष्ट्र टाइम्स' यांनी वार्तापत्रे प्रसिद्ध करून 'फिलिप्स' मध्ये हिटलरवाद बोकाळला आहे की काय अशी चिंता व्यक्त केली.

व्यवस्थापनानेही काही पावले उचलण्यास सुरुवात केली. प्रथम हंगामी कामगारांना कमी केले. नंतर तात्पुरत्या कामगारांना कमी करणे सुरू केले. रोज ४–५ या वेगाने चार्ज-शीट देण्यास प्रारंभ केला.

दरम्यान युनियनच्या पदाधिकाऱ्यांच्या बैठकीत केवळ शैक्षणिक भत्त्यासाठी एवढे ताणण्यात अर्थ नाही म्हणून मे-महिनाभर व्यवस्थित काम करण्याचा आदेश देण्याचे ठरले. पण व्यवस्थापनाने दडपशाही अधिक वाढविली. गेटपास देण्यास खळखळ, रजामंजुरीबाबत अडवणूक असे प्रकार सुरू केले. त्याला उत्तर म्हणून कामगारांनी काम कमी करण्यास सुरुवात केली. तसेच फॅक्टरीत घोषणा देणे, शिवीगाळ करणे, मिरवणुका काढणे वगैरे प्रकार सुरू झाले. चार्जशीट व सस्पेंशन्स-ऑर्डर्सचा रोजचा रतीब चालूच होता. यात भर म्हणून २९ जून रोजी श्री हडके यांच्यासह युनियनच्या पाच पदाधिकाऱ्याना व्यवस्थापनाने विनानोटिस बडतर्फ केले. कामगारानीही उत्पादन पाच टक्क्यावर आणून त्याला उत्तर दिले. रोजच्या घोषणा, मिरवणुका चालूच होत्या. व्यवस्थापनाने फॅक्टरीच्या आत घोषणा देण्यास, मिरवणुका काढण्यास,तसेच असभ्य वर्तन करण्यास कोर्टाकडून मनाईहुकूम आणला; परन्तु कामगारानी त्यालाही भीक घातली नाही. अखेर २९ जुलै रोजी व्यवस्थापनाने 'यथायोग्य काम करीन' असे हमीपत्र दिल्याशिवाय कामगाराना फॅक्टरीमध्ये प्रवेश देण्यास नकार दिला. आजतागायत कुणीहि हमीपत्र भरून दिलेले नाही!

'फिलिप्स' पटावरील हा डाव कोण जिंकणार, बेमुदत संप होणार की टाळेबंदी? फिलिप्सचा लढा हिंसक वळण घेणार की मोडून काढण्यात येणार? प्रश्न आज तरी अनुत्तरित आहे. हा 'अहि-नकुल' झगडा चालूच आहे. मात्र कोण साप, कोण मुंगूस ठरते हे येत्या काही दिवसांतच ठरणार आहे.

¤

या संबंधात जेव्हा आम्ही काही कामगार–कार्यकर्त्यांना भेटलो तेव्हा त्यातील एक कार्यकर्ता म्हणाला, 'वास्तविक पाहता या दडपणुकीचे मूळ कारण म्हणजे कामगारांचा व्यवस्थापनातील वाढता सहभाग. (कुणी त्याला 'वाढता हस्तक्षेप' म्हणतात.) तो मॅनेजमेन्टने आखून दिलेल्या कक्षेबाहेर जाऊ लागल्याने आज ही वेळ आली आहे. 'नवीन व्यवस्थापकीय' तंत्राला, मग तो उसना जपानी मंत्र का असेना कामगारांचा सहभाग अपेक्षित; पण केवळ मंत्रच नाही तर आपल्या देशाला न परवडणारे अत्याधुनिक तंत्रही येत आहे 'ऑटोमायझेशन' मुळे कामगारकपात अपरिहार्य, अटळ बनली आहे. त्यामुळे देशाच्या बेकारीत आणखी भरच पडणार आहे. आज 'फिलिप्स' मधील कामगार आपण बेकार होऊ या भीतीखाली दबला आणि व्यवस्थापनाचे नेमके हेच उद्दिष्ट ओळखून युनियनने प्रमोशन, नव्या रोजगाराबाबत हस्तक्षेप केला आहे. तो या साधार भीतीपोटीच!'

याच संदर्भात फिलिप्ससंबंधित व इतरही व्यवस्थापकाशी चर्चा केली असताना त्यानी मात्र 'देशव्यापी' सूर लावला.

'This is typical Indian mentality. They only want benefits for no work.' आज आम्ही स्पर्धेत टिकण्यासाठी नवीन मशिनरी आणतो; पण जी यंत्रे जपानमध्ये पाच माणसे चालवून शंभर टक्के उत्पादन देतात, त्याच यंत्रावर इथे ५० माणसे लावूनही काम मात्र तीस टक्केच!' आपल्याकडे लोकाना नुसते बसून खायला हवे. काम मात्र नको. तिकडे लोक मात्र कितीही भांडले तरी टेबलावर येतात. इथे मात्र जुने कधीच विसरले जात नाही. 'फिलिप्स' गेली दोन वर्षे लॉसमध्ये आहे. गेल्या वर्षी सुमारे दोन कोटीचा तोटा झाला. आता या परिस्थितीत उत्पादनवाढ घेतली नाही तर या कंपनीची 'आजारी गिरणी' होण्यास फार वेळ लागणार नाही!'

**'फिलिप्स'चा लढा निर्णायक ठरो अथवा न ठरो मात्र त्या ठरण्यावर बऱ्याच गोष्टी अवलंबून आहेत. 'फिलिप्स-मधील समस्यांची उकल कशी होते यावर पुण्यातील औद्योगिक अशांततेचे पुढील भवितव्य अवलंबून आहे' हे एका व्यवस्थापकीय विशेषज्ञाचे मत खरेच आहे.**

कारण 'फिलिप्स'मध्ये अनेक प्रश्नाचा गुंता एकाच वेळी झाला आहे. 'उत्पादनवाढ हवी आहे' पण त्यासाठी संघटनेशी करार कसा करावयाचा? त्याचे norms कोण ठरविणार आहे? त्यासाठी नवे अत्याधुनिक तंत्र आणले आहे; पण त्यामुळे अपरिहार्य ठरणारी

कामगार-कपात कशी करावयाची ?

'किर्लोस्करी' प्रेरणेने अंतर्गत-संघटना वाढीस लावल्या. त्यातील नेतृत्वाला कामगारांवर वचक राहावा म्हणून मोकाट 'हस्तक्षेप' करण्यास मुभा दिली आणि आज तेच नेतृत्व कंपनीला विविध सल्ले देत आहे. ते न मानल्यास त्या निर्णयालाच एक संघटित शह मिळत आहे. 'फिलिप्समध्ये आज कंपनीचे सर्व आदेश सबंधिताकडे पोचण्या-

## आणीबाणीनंतरचे संप : सुभाष सरीन

पुण्याच्या कामगार-चळवळीत 'नक्षलवादी' म्हणून ज्यांना ओळखले जाते त्या सुभाष सरीन यांची आम्ही गंगानगरमध्ये भेट घेतली. फिलिप्सच्या निमित्ताने आम्ही या चळवळीविषयी लेख तयार करत आहोत असे सांगितले, तेव्हा गेल्या काही वर्षांतील या चळवळीतील चढ-उतार, महत्त्वाचे संप व त्यांचा परिणाम याविषयी त्यांनी काही बोलावे असे सांगितले. क्षणाचाही विलंब न लावता सरीन बोलू लागले. त्यातूनच आणीबाणीनंतर या चळवळीचा लांब ढांगा टाकत झालेला प्रवास उलगडत गेला. तो असा...

¤

आणीबाणीच्या काळात आपणास माहीतच आहे की, आणीबाणीच्या विरुद्ध कामगारवर्ग 'वर्ग' म्हणून परिणामकारकरीत्या प्रतिकार करू शकला नाही. आणीबाणी-काळात भांडवलदारवर्गाच्या तमाम विभागांनी आणीबाणीचा फायदा उचलून कामगारांवर जादा काम लादले. बजाज ऑटो, एस. के. एफ., ट्रॉब वगैरेसारख्या कंपन्यांतून कामगारांच्या असहाय परिस्थितीचा फायदा घेऊन एका कामगाराला तीन-तीन मशिन्स चालविण्याची सक्ती केली. याही परिस्थितीत कामगारांनी जमेल तसा प्रतिकार केला; पण आणीबाणीच्या उत्तरार्धात थोडे दडपण कमी झाल्याबरोबर कोंडलेल्या वाफेच्या भांड्याचे तोंड उघडावे त्याप्रमाणे कामगाराचा असंतोष उफाळून आला. आणीबाणी उठण्याच्या आधीच एस. के. एफ. च्या कामगारांनी अभूतपूर्व असा सहा दिवसांचा संप पुकारला. या वेळचे कामगारांचे नीतिधैर्य वाखाणण्यासारखे होते.
याच काळात 'जागृतिमंडळ' सुरू करण्यात आले. 'केडर' लेव्हलवर कामगारांशी संवाद साधला गेला; पण थोड्याच काळात मंडळ बरखास्त झाले. याच सुमारास ट्रॉब इंडियाच्या मॅनेजमेंटच्या कामगारविरोधी दडपशाहीला ट्रॉबच्या कामगारांनी अत्यंत लढाऊ पद्धतीने तोंड दिले. या लढ्याला पाठिंबा देण्यासाठी कृतिसमिती स्थापन झाली. प्रस्थापित परंपरागत नेतृत्व, राजकीय भूमिकांचा अभिनिवेश वा परस्परांविरुद्धच्या कुरघोड्या यामुळे समितीचे अस्तित्व धोक्यात आले होते; पण नेत्यांना डावलून समिती पुढे चालविण्याचा इशारा कार्यकर्त्यांना दिल्याने 'इंटक' वगळता सर्व प्रस्थापित नेतृत्वाला 'ट्रॉब'च्या गेटवर येऊन लढ्याला पाठिंबा दर्शविणे भाग पडले.
'ट्रॉब'च्या लढ्याने पिंपरी-चिंचवड-परिसरात वेगळाच संचार सुरू झाला. तळच्या कार्यकर्त्यांचे पुढाऱ्यांवर दडपण वाढत होते. याच काळात क्रांतिकारी विचारांच्या तरुण कार्यकर्त्यांनी 'कामगार-सत्ता' या मासिकातून कामागारांवरील अत्याचाराचे स्वरूप उघडे केले.
एस. के. एफ. च्या संपाच्या निमित्ताने Slogan's राजकीय बनल्या होत्या, त्यांना धार आली.
त्यानंतरच्या 'डेव्हिड ब्राउन'च्या संपात युनियनच्या आदेशाची वाट न पाहता लढ्याला पाठिंबा देण्यासाठी कामगारांचा 'Instant' सहभाग दिसला. चार-पाच लाठीचार्ज, १२५ केसेस झाल्या तरी कामगार डगमगला नाही. कोर्टापेक्षा रस्त्यावरच प्रश्न सुटतात याची जाणीव टिकली. त्यामुळे दगडफेक करून 'फिजिकल' प्रतिकारही त्याने केला.
याच संपात सामान्य कामगाराच्या 'गृहिणीं'चाही पाठिंबा दिसला. दिवाळीसाठी संपावरील कामगारांना फटाके, मिठाई उत्स्फूर्तपणे गोळा करून वाटण्यात आली. 'mass sympathy' मिळाली. कृतिसमितीने 'ट्रॉब'च्या प्रश्नासाठी 'बंद'चा आदेश दिला. संघटना व कामगारामध्ये लढाऊ राजकीय जाण दिसली. प्रथमच 'सॉलिडॅरिटी' पाहायला मिळाली.
मात्र त्यानंतरच्या 'बजाज ऑटो'च्या संपातच ही 'सॉलिडॅरिटी' फुटली. खरं तर या संपात अभूतपूर्व जमावबंदी झाली. गोळीबाराला न डगमगता दीड हजार कामगारांनी अटक करून घेतली. मात्र युनियन टिकविण्यासाठी थातुर-मातुर वाटाघाटी करून नेतृत्वाने विनाअट माघार घेतली. नेतृत्वाने कामगाराचा विश्वासघात केला. एकूणच चळवळीवरील डाव्यांची पकड सुटली. मालकांना अंदाज आला आणि त्यांचेच Flam bounce वाढले. एन. एफ. एल. ने सहा महिन्यात तेरा युनियन्स स्थापन केल्या.
...आणि यानंतरच राष्ट्रीय पातळीवरील आघाडीचे विकृत स्वरूप पुण्याच्या कामगार-चळवळीला पाहायला मिळाले. एका बाजूला डाव्या संघटना अयशस्वी ठरत गेल्या तर दुसऱ्या बाजूला मालकवर्ग अधिक आक्रमक बनत गेला. 'नोकऱ्या वाचवा!' तुमची युनियन काही करू शकणार नाही. या भूमिकेतून मालकवर्गाने कामगारांवर मानसिक दडपण आणले. आजही यापेक्षा वेगळी स्थिती नाही.
या स्थितीतून बाहेर यावयाचे असेल तर पक्षीय अभिनिवेश बाजूला ठेवून कामगारवर्गाची म्हणून राजकीय चळवळ उभारणे निकडीचे आहे. तरच ही चळवळ पुढे जाईल. नाही तर आजच्यासारखीच ती चिखलात रुतून बसेल! ¤

आधी हडके' जी 'कडे पोचतात ' या व्यवस्थापकांच्या तक्रारीत तथ्य आहे.

असं असलं तरी आज 'फिलिप्स ' निमित्ताने अनेक प्रश्न पुढे आले आहेत. उदाहरणार्थ : आज पुणे औद्योगिक–क्षेत्रात अंतर्गत संघटनाचा प्रभाव वाढतोय का ? असल्यास त्यामागील नक्की कारणे कोणती ? इतर तत्त्वशील, ध्येयवादी राजकीय कामगारसंघटनांचा

## पुण्यातील कामगार

पुण्यातील कामगार पशाला हपापलेला नाही. त्याला काय हवंय ? पुरेसा पगार, नोकरीची शाश्वती, मुलांच्या शिक्षणाची सोय, त्याच्या कुटुंबाला व त्याला स्वतःला जरुरी असलेल्या Welfare Facilities व मुलाच्या नोकरीची हमी ! बस्, एवढं पुरवलं की तो समाधानी आहे' हे मत आहे पुण्यातील सर्वांत मोठ्या उद्योगसमूहातील एका व्यवस्थापकाचं !

खरंच तो तसा आहे का ? याबाबत वेगवेगळी मते ऐकायला मिळाली; परंतु त्यातून एक समान सूत्र मात्र नक्की मिळते. पहिले म्हणजे तो आता पूर्णपणे औद्योगिक जीवनाचा भाग बनलेला, Factory हे आयुष्याचे व्यवच्छेदक लक्षण म्हणून स्वीकारलेला कामगार आहे. पूर्वीच्या पिढ्यांच्या मनात इथून परत गावी जाऊन शेतीत जम बसवायची स्वप्ने होती. त्यामुळे औद्योगिक जीवन त्यांनी कधीच आपले मानले नाही. तसेच हा कामगार गावच्या राजकारणापासून पूर्णतः मुक्त असा आहे. वर्गीयदृष्ट्या ही सर्व मध्यम व गरीब शेतकऱ्याची मुले आहेत.

दुसरे वैशिष्ट्य म्हणजे बहुसंख्य कामगार हा महाराष्ट्रीय आहे व तरुण आहे. त्यामुळे सध्या तरी तो प्रांतवादाच्या झगड्यात फारसा पडताना दिसत नाही.

पुढची महत्त्वाची गोष्ट म्हणजे औद्योगिक जीवन हे स्वतःचे जीवन मानल्यामुळे Factory facilities बद्दल तो अधिक जागरूक बनला आहे आणि म्हणूनच अधिक आक्रमक आहे. कामगार-जीवनात रस घेऊ लागल्यामुळे तो आज वस्ती–पातळीवर संघटना बांधतोय. ज्यामुळे तो त्याच्या आयुष्यातील प्रश्नांमधून काही मार्ग काढू शकेल; परंतु त्याच-बरोबर त्याच्या मूळ भागानुसारसुद्धा संघटना आहेत. उदा. सातारा मित्रमंडळ, कोकण मित्रमंडळ. या सर्व संघटनांबरोबरच त्याच्या जीवनाचा अविभाज्य भाग बनलेल्या आणखी संस्था आहेत त्यातील प्रमुख म्हणजे 'सोसायट्या' .१०–१२ लोकांनी जमून ठराविक रकमेचे 'शेअर्स ' घेऊन सोसायटी तयार करायची व जरुरीप्रमाणे कर्जाचे आदानप्रदान करायचे. सोसायटी–मेंबराला दरमहा दरशेकडा ५% तर नॉनमेंबरला दरमहा दरशेकडा ७% हा कमीत कमी व्याजदर ठरलेला आहे.जास्तीत जास्त व्याजाला मर्यादा नाही. सोसायट्याबरोबरच सावकारही ५००% ते ६००% टक्के व्याजाने कामगाराला पैसे पुरवायला समर्थ आहेतच. कित्येक वेळा हे सावकारही कुठे ना कुठे कामगारच आहेत!

सर्वसाधारणपणे कामगाराच्या मनोवृत्तीचे चार प्रवाह आढळतात.

(१) राजकीयदृष्ट्या जागरूक : सर्व प्रकारच्या गोष्टीत रस घेऊन त्याप्रमाणे कामात स्वतःहून पुढाकार घेणारे. हा प्रवाह अभावानेच आढळतो.

(२) अराजकवादी : याना कुठलीच शिस्त नको असते. ना मॅनेजमेंटची ना युनियनची. काही विशिष्ट वेळी मॅनेजमेंट किंवा युनियन दोघांच्याही उपयोगास येणारा हा कामगारही संख्येने कमीच आहे.

(३) तटस्थ किंवा तटके चलो प्रवृत्तिवाला : हा प्रवाह कशातच नाही. जिथे बहुमत तिथे हा असतो. हा प्रवाह मात्र बहुसंख्येने आढळतो.

(४) व्यवहारवादी : आपला फायदा ओळखून वागणारे असे कामगार या गटात मोडतात. वेळेनुसार धोरण बदलण्याची कुवत यांच्यात असते. हासुद्धा प्रवाह तसा मोठाच आहे.

या सर्व कामगारावर जातीय वा धार्मिक संघटनांचाही वरचेवर प्रभाव पडत असतो. विशेषतः गेल्या १–२ वर्षांत जास्तीच. विश्व हिंदू परिषद, अखिल भारतीय मराठा महासंघ वगैरे मंडळींनी तर पिंपरी–चिंचवड भाग घोषणांनी रंगवून काढलाय; परंतु फॅक्टरीपातळीवर तरी कामगार हा कामगारच असतो. कारण त्याला एक पटलंय की मशीनमध्ये जाणारा हात हा हिंदूचा वा मुसलमानाचा नसतो तर एका कामगाराचा असतो; परंतु ही पटलेली गोष्ट फॅक्टरीबाहेर मात्र आचरणात यायला जरा वेळच लागतो. याचे एक बोलके उदाहरण म्हणजे फिलिप्सच्या नेत्यांना इशारा देणारे एक पत्रक मराठा महासंघाने काढले होते. त्यात त्यांच्या सभासदांना दमबाजी न करण्याबाबत बजावले होते. यामध्ये कामगारापेक्षाही व्यवस्थापनातील सभासदांबद्दल अधिक कळवळा होता; पण नंतर जेव्हा संघटनेतील मराठा कामगार महासंघाच्या नेत्यांना जाऊन भेटले व मराठा म्हणून होणाऱ्या अन्यायाची दाद मागितली तेव्हा त पत्रक मागे घेतले गेले.

असा हा कामगार आज तरी जरा स्वस्थ आहे. फॅक्टरीपलीकडे बाहेर बघायची त्याची फारशी तयारी नाहीये. आपल्याच रोजच्या जीवन–कलहात तो गुंतलाय. हे बघितल्यावर चीनबद्दल युरोपियन मुत्सद्द्यांनी वर्तवलेल्या भाकिताची आठवण येते. ' तो जोवर शांत आहे तोवरच तुमचे भले आहे, एकदा का तो जागा झाला तर जग हादरवून सोडल्याशिवाय राहणार नाही!' ◘

प्रवास नक्की कोठे चालला आहे ? व्यवस्थापनाच्या संघर्ष हाताळ-ण्याच्या पद्धतीत काही बदल दिसतो का ? संप, टाळेबंदीसारखी हत्यारे आजही तेवढीच परिणामकारक ठरतात का ?

याबद्दल आम्ही एक ठरवलं की, पिंपरी–चिंचवड भागात जाऊन कामगार, कार्यकर्ते, नेतेमंडळींना नक्की काय वाटतं ते ऐकायचं. पिंपरी–भागात गेल्यावर एक गोष्ट जाणवली, ती म्हणजे पूर्वी

## उत्पादनवाढीला विरोधच : कॉ. मानकर

आकुर्डीमधील CITU च्या ऑफिसमध्येच कॉ मानकरांची भेट घेतली. नुकतेच ते T. K. STEFL बद्दलची एक मीटिंग संपवून आल्याने कार्यकर्त्यांबरोबर त्याचीच चर्चा चालली होती. साध्या चर्चेतसुद्धा ५०० लोकांसमोर भाषण देत असल्याचा अभिनिवेश जाणवला. आम्ही गेल्यावर ५–१० मिनिटांतच त्यांना निरोप देऊन मुलाखतीला सुरुवात झाली.

प्र. : गेली २०–२५ वर्षे तुम्ही पुण्यातील कामगार-चळवळीत आहात. तेव्हा पुण्यातील कामगार-चळवळीची थोडी ऐतिहासिक पार्श्वभूमी प्रथम सांगा.

**कॉ. मानकर :** स्वातंत्र्यपूर्वकाळात पुण्यात कामगारचळवळ नव्हती. कारण औद्योगीकरणच नव्हते. राजाबहादूर मिलमध्ये केरकरानी पहिला प्रयत्न केला. नंतर किर्लोस्कर इंडस्ट्रीत पहिली युनियन तयार झाली. प्रथम तिथे आम्ही होतो. नंतर इंटक आली. इंटकची उभारणीच मुळात मालकवर्गाकडून, समाजवादी विचारसरणीला threat म्हणून झाली. त्यानंतर British trade Union च्या स्वतंत्र कामगार-संघटनेच्या संकल्पनेचे विपर्यस्त व विकृत स्वरूप आपल्या इथे तयार व्हायला लागल्यामुळे इथे प्रथमपासूनच तशी व्यापक चळवळ नाही. प्रथम इथे लाल निशाण गटांनी प्रयत्न सुरू केले. नंतर हिंद मजदूर सभेनेही प्रयत्न सुरू केले. तिथूनच स्वतंत्र व लोकशाहीप्रधान संघटना म्हणजे राजकारणापासून अलिप्त संघटना नव्हे हा विचार आला. नंतर १९६२ मध्ये स्वस्तिक रबरमध्ये आम्ही 'पुणे लेबर युनियन' ही हिंद मजदूर पंचायतीशी संलग्न अशी संघटना सुरू केली व नतर पी. एम टी.; ट्रॉंब गरवारे तसेच बजाज ऑटोमध्ये P. L. U. कडून लढे दिले गेले. त्यानंतरची राजकीय पक्षांची देशातील फाटाफूट व राजकीय अस्थिरतेचा परिणाम अर्थातच पुण्यावर झाला व त्यातून स्वतंत्र संघटनांचा व कॉ रूपमय चॅटर्जींचा उदय झाला. प्रचड महागाई, अपुरे वेतन व बेकारी यातूनच वेतनवाढीच्या लढ्याचा उद्रेक झाला व त्या वेळची डावी चळवळ, व्यापक चळवळीकडे नेणारे नेतृत्व नसल्याने हा उद्रेक सामावून घेऊ शकली नाही. म्हणूनच व्यक्तिवादी संघटनांचा जोर वाढला.

प्र : नंतर आणीबाणीत व आणीबाणीनंतर परिस्थिती काय होती ?

**कॉ. मानकर :** आणीबाणीतही फक्त आमच्याच गटाचे लढे झाले. उदा. SKF मध्ये आम्ही ८ दिवस संप केला. तसेच घटनादुरुस्तीच्या विरोधात पुण्यामध्ये सभा घेतली. तसेच टेल्कोमधील स्वीपर्सचा संपही त्याच काळातला. आणीबाणीनंतर मात्र इथे कामगाराचे व्यापक लढे झाले. उदा. डेव्हिड ब्राउन, SKF, बजाज ऑटो.

प्र : तेव्हा CITU अस्तित्वात होती ?

**कॉ. मानकर :** नाही. १९७८ मध्ये आम्ही पुणे लेबर युनियनमधून बाहेर पडून CITU ची स्थापना केली. प्रथम कॉ. चॅटर्जी उपाध्यक्ष होते; पण पुढे त्यांच्या व्यक्तिवादी धोरणांमुळे त्यांची आमच्यापासून फारकत झाली.

प्र : CITU ने कुठले प्रश्न घेतले ?

**कॉ. मानकर :** उत्पादनवाढीचे. उत्पादनवाढीला आमच्याइतका विरोध कुणीच केलेला नाही. कारण आमची ठाम भूमिका आहे की, उत्पादनवाढ म्हणजेच जास्त कामाचा ताण व बेकारीला प्रोत्साहन ! या प्रश्नावर आम्ही Bajaj Tempo व सह्याद्रीमध्ये व्यापक लढे उभारण्याचे प्रयत्न केले; पण अजूनही त्या दिशेने जशी वाटचाल व्हायला हवी तशी ती होत नाही.

प्रश्न : मालकवर्गाकडून होणाऱ्या हल्ल्यांच्या स्वरूपामध्ये किंवा तीव्रतेमध्ये काही फरक जाणवतो का ?

**कॉ. मानकर :** मालकवर्गाने प्रथमपासूनच आमच्यावर जोरदार हल्ल्याचे प्रयत्न केले. कित्येक वेळा अनुचित मार्ग वापरून व कायदे मोडूनसुद्धा बजाज टेम्पो आणि हॉटेल–कामगारांतील आमच्या कार्यकर्त्यांवरील हल्ले याची स्पष्ट उदाहरणे आहेत. किर्लोस्कर, गरवारे, वैद्य हेच मुख्यत्वेकरून पुण्यातील भांडवलदारवर्गाचे प्रतिनिधित्व करतात. टेल्को मॅनेजमेंटने नेहमीच लढा Localise कसा करता येईल असाच प्रयत्न ठेवला.

प्रश्न : मालकवर्गाच्या या भूमिकेला उत्तर देण्यासाठी म्हणून ट्रेड युनियनच्या भूमिकेत काही बदल करावेत याबद्दल आपली काय भूमिका आहे ?

**कॉ. मानकर :** मालकवर्गाकडून होणारे हल्ले हे दिवसेदिवस अधिक व्यापक व राजकीय होत आहेत. ट्रेड युनियनमध्ये नक्कीच नवीन डावपेच लढवणे आवश्यक आहे. यापुढे फक्त Factory level वर प्रश्न सुटणे अवघड आहे. त्याकरता राजकीय भूमिकाच हवी, तसे डावपेच हवेत. तसेच त्याकरता डाव्या पक्षांच्या संयुक्त आघाडीचीही आज गरज आहे.

प्रश्न : अंतर्गत संघटनाविषयी काय वाटते ?

**कॉ. मानकर :** हा स्पष्टपणे मालकांचा डाव आहे. अंतर्गत संघटनेच्या नावाखाली कामगारांना खऱ्या लढ्यापासून दूर ठेवण्याचेच हे डावपेच आहेत. ◻

ज्याप्रमाणे खेडी नदीकिनारी वाढत होती त्याप्रमाणेच आजची औद्योगिक नगरं महामार्गाभोवती वाढताहेत. त्या वाढीला प्राधिकरणाचा अपवाद सोडला तर कुठलेही नियोजन नाही. ज्या देशांमधून औद्योगीकरण आपल्याकडे आले त्यांनी फक्त फॅक्टरीचे ८ तास इथे आणले. इतर १६ तास देशीच ठेवले आहेत. सिनेमा, नाटके, लाउडस्पीकर्समधून ही महानगरीय संस्कृती इथे ओतली जातीय. तिचा तिथल्या लोकांच्या रोजच्या जगण्यामध्ये बांडगुळाप्रमाणेच विकास होतोय. 'फॅक्टरी'मध्ये 'House-keeping' वगैरे गोष्टी नियमाप्रमाणे करणारा कामगार आज त्याच्या वस्तीमध्ये बरोबर उलटचा गोष्टी अनुभवतोय.

विविध कंपन्यांमधील जागरूक कार्यकर्ते व एक कामगार-नेते यांच्याशी बोलताना गेल्या काही वर्षांतील कामगार-चळवळीचे चित्रच उभे राहिले–

'तुम्हाला सांगतो, आणीबाणीनंतरच्या काळात इथं फार मस्त वातावरण होतं. कुठंही खुट्ट झालं की, हजार-दोन हजार कामगार धावून यायचे. अहो, 'बजाज ऑटो'वर जेव्हा गोळीबार झाला तेव्हा सात हजार कामगार गेटवर होते. 'ट्रॉब'च्या संपापासून ही परंपरा सुरू झाली. ज्या फॅक्टरीत संघर्ष चालू आहे त्याच्यामागे आपली सर्व ताकद लावायची. 'डेव्हिड ब्राउन'ला जेव्हा लाठीचार्ज झाल्याचे कळले तेव्हा उत्स्फूर्तपणे आसपासच्या इतर कारखान्यांतील कामगारही आपापले काम बंद करून रस्त्यावर आले. एस. के. एफ.लाही हवेतील गोळीबारानंतर तेच झाले. पुणे औद्योगिक परिसरापुरती तयार झालेली कृतिसमितीही छान पद्धतीने चालत होती. 'बजाज ऑटो'च्या वेळी दादांनी (रूपमय चटर्जी) न बोलविता आम्ही सर्व तिथे जात होतो. ताकद संघटित करत होतो; पण त्यातही फांदा मारणारे लोक निघाले. एकमेकांबद्दलचा प्रचंड

---



## 'मालक मुजोर झालेत' –कॉ. ए. डी. भोसले

पर्वती औद्योगिक परिसरातील एका शेडमध्ये असलेल्या 'श्रमिक विचार' या दैनिकाच्या कचेरीत आम्ही प्रवेश केला तेव्हा रात्रीचे १०-३० वाजून गेले होते. 'श्रमिक'ची डमी तयार करून अप्पासाहेब ऊर्फ कॉ. ए. डी. भोसले आमचीच वाट पहात बसले होते. कामातून मोकळे झाल्यावर निवांत बोलता येईल अशी ही एकच वेळ मिळू शकली. त्यामुळे गेल्यावर लगेचच आम्ही सुरुवात केली–

**प्रश्न :** सध्याच्या अंतर्गत संघटनांच्या प्रवाहाबद्दल आपण काय म्हणाल ?

**ए. डी. :** अंतर्गत संघटनांचा प्रवाह म्हणून तुम्ही जो म्हणताय तो आजचा नाही. व्हल्कन लावल, टेल्को, फिलिप्स, सँडविक इत्यादी कारखान्यांमध्ये प्रथमपासूनच अंतर्गत संघटना आहेत. या संघटनांबद्दल मला तरी मुळीच खेद नाही, उलटा आनंदच आहे. अहो, आज या संघटनापातळीवर तरी तो वर्ग म्हणून जागरूक होतोय. फॅक्टरीपातळीवरील हक्कांबाबत आग्रही होतोय. याला तुम्ही मागचे पाऊल म्हणणार की पुढचं पाऊल ?

**प्रश्न :** पण मग राजकीयीकरणाबद्दल किंवा राजकीय जागृतीबद्दल काय ?

**ए. डी. :** आपल्या पक्षाचा झेंडा घेतला म्हणजेच तो राजकीयदृष्ट्या जागरूक झाला असे मानणे मूर्खपणाचे आहे. माझ्या दृष्टीने कामगार जेव्हा स्वयंस्फूर्तीने त्याच्या वर्गीय लढ्यात उतरतो, मग त्या निखळ आर्थिक मागण्या का असेनात, तेव्हासुद्धा तो तेवढाच जागरूक असतो आणि राजकीयीकरण करणे म्हणजे काही देवीची लस टोचणे नव्हे. त्याच्या लढ्यांमधूनच त्याचे प्रबोधन होत असते. तो अधिकाधिक जागरूक बनत जातो. प्रबोधनाचे क्लासेस चालवून कधीही त्याची जाणीव बदलणार नाही.

**प्रश्न :** उत्पादनवाढीविषयी आपली काय भूमिका आहे ? सीटूचे म्हणणे आहे की, उत्पादनवाढीला फक्त त्यांनीच विरोध केला आहे.

**ए. डी. :** शुद्ध थापा मारताहेत. प्रत्येक संघटनेला आज उत्पादनाशी निगडित असेच करार करावे लागताहेत. एवढा मोठा टेम्पोचा संप; पण तियेसुद्धा १२॥ टक्के उत्पादनवाढीचा करार झालाच ना ? मी स्वतः तरी याबाबत फारसा शिवाशिव पाळत नाही. या वाढीतून कामगाराच्या काही पदरात पडतं की नाही हे पाहणे महत्त्वाचे ! उगाच नाही त्या गोष्टींचे सोवळे पाळण्यात काही अर्थ नाही.

**प्रश्न :** मॅनेजमेंटच्या तंत्रात, विशेषतः संप हाताळण्यात काही बदल झालेत का ?

**ए. डी. :** अधिक मुजोर झालेत. हल्ली सरसकट गुंड पाठवून मारहाण करणे, Victimise करणे ही तंत्रे फारच मोठ्या प्रमाणात वापरली जात आहेत.

**प्रश्न :** मग त्यानुसार कामगार-संघटनांच्या तंत्रात काही बदल ?

**ए. डी. :** नक्कीच आहेत. हल्ली गो-स्लोचे तंत्र मोठ्या प्रमाणावर आम्ही वापरतो. हे तंत्र मॅनेजमेंटला संपापेक्षाही अधिक महागात पडतं ! ◻

संशय, आपापल्या संघटनेविषयीचा दुराग्रह, राजकीय अभिनिवेश यामुळेच ही समिती टिकाव धरू शकली नाही !'

कार्यकर्त्यांशी—नेत्याशी बोलताना एक ध्यानात आले की, ट्रॉब,एस. के एफ., डेव्हिड ब्राउन व बजाज ऑटोच्या वेळची लढ्याची मिरवणूक अचानक विस्कळित झालीय. देशातील पक्षीय आधाडधा, फाटाफूट, जनता पक्षीय राजवटीची बेबंद लोकशाही आणि त्यानतर 'स्थिर शासना'ची हमी देणारी इंदिरा गांधींची राजवट याचे ठसे पुण्यातील कामगार-चळवळीवर उमटले आहेत.

उत्पादन—वाढ व कामगारांना शिस्त लावण्याचे धोरण असलेल्या इंदिरा गांधींच्या राजवटीत कुपर, मॅथर प्लॅन्ट, टेल्को, बजाज टेम्पो आणि गरवारे येथील लढ्यात आज तरी कामगार ठेचकाळताना दिसतोय. आज तरी त्याच्या सघटना कुठे तरी कमी पडत आहेत !

या संदर्भात 'गरवारे'चे उदाहरण उल्लेखनीय आहे. गरवारे-जवळचाच एका चहाच्या टपरीत एक कामगार भेटला. 'गरवारे'तील संपाचा विषय काढल्यावर तो म्हणाला, 'काय सागायचं राव, वाळूत मुतलं—फेस ना पाणी असं आहे बघा. संघटनेला मान्यता मिळूनही व्यवस्थापन बोलायला तयार नाही.चमच्यांना हाताशी धरून बी.एम. एस ने वेगळी युनियन तयार केली आहे; पण शेवटी पोटापुढे तात्पुरती का होईना हार खावी लागली. मॅनेजमेन्टकडे पैसा आहे, हाताशी सरकार—पोलीस आहेत. आमच्या वस्तीत चोऱ्या झाल्या तर पोलीस यायला दोन-दोन दिवस लागतात! आमच्या लीडर्सच्या दृष्टीने कोणताही तंटा हा त्याच्या इज्जतीचा, इभ्रतीचा प्रश्न बनतो. मधल्यामध्ये आमची अवस्था मात्र फार वाईट आहे !'

गरवारेचे कार्यकर्ते अप्पार म्हणाले की, आमचे व्यवस्थापन मध्ययुगीन आहे. प्रथम युनियनच्या मान्यतेसाठीच आम्हाला झगडावं लागलं. पुढे नऊ महिन्यांच्या संपानंतर आमचं 'अॅबॉर्शन' च झालं! 'गरवारे'त कामगारचळवळीताल 'नेमस्त' म्हणून गणले जाणारे करकेरा यांची युनियन आहे. संप टाळून वाटाघाटीनेच प्रश्न सोडविण्याची गांधीवादी भूमिका घेणाऱ्या करकेरा यांच्या एन. एफ. एल. या महासंघातील, पुण्यातील तेरापैकी अनेक युनिट्समध्ये आज संप घडत आहेत. त्यावर एन. एफ. एलचा कार्यकर्ता म्हणाला, 'कामगारच गप्प बसू देत नाहीत, मात्र त्याच्याकडे 'सस्टेनिंग पॉवर' नाही म्हणूनच हे संप फसत आहेत !'

यातून एक गोष्ट सिद्ध होते की, प्रदीर्घ संपाचे तंत्र सातत्याने अयशस्वी ठरत आहे. कधी बेकायदेशीर टाळेबंदी करून, भाडोत्री युनियन उभ्या करून, त्यांच्याशी 'टोपी करार' करून हा संप मोडून काढण्यात येत आहे; तर कधी कामगाराची 'सस्टेनिंग पॉवर' कमी पडत आहे. दत्ता सामंताच्या नेतृत्वाखाली भारतफोर्ज, मॅथर प्लॅंट व कुपरमधील प्रदीर्घ लढे अयशस्वी ठरले आहेत. याबाबत 'कूपर'-मधील एक कार्यकर्ता म्हणाला, 'सामंताच्या हालचाली मुबईहून होत असल्याने येथे निर्नायकी अवस्थेतच आम्ही लढत होतो. शिवाय सरकारी आदेशानुसार सामंताशी वाटाघाटी करावयाच्या नाहीत अशी ताठर भूमिकाच व्यवस्थापनाने घेतली. परिणामी सामंत-युनियनचे शिरकाण झाले. आज 'क्लोराइड'चा अपवाद धरता आम्ही केवळ नावालाच शिल्लक आहोत!'

सामंत किंवा त्यासारखे लढाऊ, बेबंद नेतृत्व नको, राजकीय संघटना नकोत. परिणामी अतर्गत व भाडोत्री संघटनाचे प्राबल्य वाढते आहे. आज बहुतांशी बड्या उद्योगसमूहात व बहुराष्ट्रीय कंपन्यांत अंतर्गत संघटना आहेत तर इंटक, भारतीय कामगारसेना 'rival' संघटना म्हणूनच काम अस्तित्वात आहेत : रूपमय चटर्जी-सारख्या एककल्ली स्वयंभू नेत्याचे मात्र अद्याप काही ठिकाणी वर्चस्व आहे.

अशा परिस्थितीत प्रश्न पडतो की, राजकीय विचारांशी, बदलाशी बांधिलकी सांगणाऱ्या संघटनाबद्दल कामगाराना फारशी आस्था राहिली नाहीये ! 'फिलिप्स'मधील कामगाराचे उद्गार फार बोलके आहेत. या राजकीय संघटना केवळ त्यांच्या पक्षाचे हत्यार म्हणून आमच्याकडे पाहतात. वास्तविक पाहाता संघर्ष हाताळण्याच्या पद्धतीत अंतर्गत संघटना व या संघटना यांच्यात सध्या तरी काही फरक दिसत नाही. उलट अंतर्गत संधटनांचे नेते फॅक्टरीतच असल्यामुळे कारखान्यातील समस्यांची नेमकी जाण त्यांना असते.

## एवढा पगार कशाला ऽऽ!!

फिलिप्स, टेल्कोसारख्या पुण्यातील बड्या कंपन्यांतील कामगारांच्या गलेलठ्ठ (?) पगाराबद्दल नेहमीच नाके मुरडली जातात. त्याबाबत या फेरफटक्यात बरीच परस्परविरोधी मते ऐकायला मिळाली.

ती अशी :

एकजण म्हणाला की, 'टेल्कोसारख्या कंपनीच्या बाहेर दिवसपाळी संपायच्या वेळी उभे राहिले तर चित्रपटगृहाबाहेर उभे असल्याचा भास होतो. फॅक्टरीच्या आत फार शोषण झाले असावे असे वाटत नाही. तरीही याना पगारवाढ हवी आहे !'

तर एका बड्या कंपनीचे व्यवस्थापक म्हणाले, 'इथली परिस्थिती लक्षात न घेता या बहुराष्ट्रीय कंपन्यांनी इथला 'वेज पॅटर्न'च 'डिस्टार्ट' केला आहे. नाही तर एवढा पगार कशाला ?'

भारतीय मजदूरसंघाचे मुकुंद गोरे यानी मात्र या पगारवाढीचे समर्थन केले. ते म्हणाले, 'ज्या प्रमाणात कंपन्यांच्या उत्पादनाच्या किंमती वाढतात त्या प्रमाणात पगार कधीच वाढत नाहीत !'

तर हिंद मजदूर सभेचे मधू वाणी यांनी मालकांच्या नफ्यावर बंधन नाही, मग पगारावरच का असा प्रश्न उपस्थित केला. ते म्हणाले, 'लठ्ठ पगार असलेले कामगार किती, तर साधारण ३ टक्के. मग त्यावरून संघटित कामगारांना धोपटणे बरोबर नाही !'

कामगारविषयक प्रश्न हाताळणारे एक वकील म्हणाले, 'या बड्या कंपन्यातील पगारदार कामगारांची एक वेगळी 'जात'च तयार होऊ लागली आहे. लग्न जमणे न जमणे यासारख्या गोष्टी या 'जाती'वरून ठरत आहेत. तेव्हा ही स्वायत्त—बेटे चळवळीलाच काय, समाजालाच घातक ठरत आहेत !' ¤

शिवाय हे नेते कायम संपर्कात असतात.

याबद्दल एका राजकीय संघटनेच्या कार्यकर्त्याशी बोलताना त्याने या संघटना कुठे तरी कमी पडतात हे मान्य केले. 'आज काही ठिकाणच्या फॅक्टरीतील कामगार आमच्या लाल बावट्याखाली असतो; पण वस्तीत गेल्यावर मात्र त्यांच्या झेंड्याचे रंग बदलतात. फॅक्टरीत 'मिलिटन्ट' असलेला कामगार बाहेरच्या व्यापक प्रश्नावर एकत्र यायला तयार होत नाही. याला तुरळक अपवाद आहेत, नाहीत असे नाही. उदा. शेतकरी आंदोलनाच्या वेळी इथून ७०–८० कामगार सायकलवरून गेले होते; पण हे फारच थोडे. सध्याच्या राजकीय पक्षाच्या एकूण परिस्थितीमुळे आज त्याला राजकीय संघर्षात विश्वासार्हता वाटत नाहीये!'

या विश्वासार्हतेचे प्रतीक म्हणजे पुण्याच्या औद्योगिक नगरीत आयटक, मजदूरसंघ व हिंद मजदूरसभा याचे अस्तित्व चार-पाच कारखान्यापुरतेच नगण्य आहे! 'सीटूचा' प्रभाव थोडा-फार अधिक आहे. सर्व श्रमिक संघ व त्याच्या संलग्न संघटना अद्यापही बऱ्याच मोठ्या प्रमाणात वर्चस्व टिकवून आहेत. मात्र नव्याने या संघटनेकडे आकर्षित झालेले कामगार नाहीत. उलट कूपर, मॅथरप्लॅटसारख्या काही युनियन यांच्या हातातून निसटल्या आहेत.

एकीकडे अंतर्गत संघटनाचे प्राबल्य वाढत असतानाच तिच्या मर्यादाही स्पष्ट होत आहेत, तर दुसरीकडे 'अर्थवादी' असलेला कामगार राजकीय संघटनापासून दुरावत आहे. तेव्हा दीर्घ मुदतीचे संघर्ष देऊन पराभूत होणाऱ्या लढाऊ कामगाराना आज ठोस; नेतृत्व मिळत नाहीये. पुण्याच्या कामगार-चळवळीत काहीशी निर्णायकी अवस्थाच दिसत आहे.

◻

पुण्यातील कामगार-चळवळीच्या स्वरूपाचा विचार स्वायत्त 'बेट' म्हणून करून चालणार नाही. मार्क्स–लेनिनच्या काळानंतर बदललेले उत्पादनाचे तंत्र, आतरराष्ट्रीय व्यापाराचे स्वरूप, देशातील एकदरीतच आर्थिक–राजकीय–सामाजिक परिस्थितीचे गुण–दोष विचारात घेऊन आजची चळवळ तगते आहे.

शिवाय एकूणच विकसनशील देशांमध्ये आर्थिक विकासाच्या अग्रक्रमातील जे गोंधळ असतात त्या सर्वांशीच आट्या-पाट्या खेळत इथली कामगार-चळवळ टिकून आहे एकीकडे उपग्रह सोडून शास्त्रीय व तांत्रिक विकासात पुढे गेल्याचे मिरवत असतानाच आम्ही माणसानी ओढायच्या रिक्षा बंद करू शकत नाही ही वस्तुस्थिती आहे.

फॅक्टरी-पातळीवरील विकासाचेही असेच आहे केवळ 'हेवी इंडस्ट्रीज' मध्ये 'ऑटोमायझेशन' आणल्याने विकास होतो असे मानणे भाबडेपणाचे व आत्मवचना करणारे आहे. त्यातून निर्माण होणारे अनेक प्रश्न आजची आर्थिक चौकट सोडवू शकत नाही. उदा. एक वेळ ज्या फॅक्टरीत 'ऑटोमायझेशन' झालं तिथली कामगार-कपात संघटनेच्या ताकदीवर कायदे–कानू करून रोखता येईल; पण त्या 'ऑटोमायझेशन' मुळे बंद पडणाऱ्या इतर स्मॉल स्केल फॅक्टरीचे काय? नवीन कामगारभरतीचा वेग मंदावण्यात पर्याय काय?

आधुनिकीकरणाला विरोध नाही; पण त्याच्या परिणामी निर्माण होणाऱ्या 'उपासमारी'कडे केवळ संक्रमणअवस्थेतील 'क्रायसिस पीरियड' म्हणून केवळ पाहणार आहोत का?

लोकसंख्यावाढीबरोबर हा संपूर्ण आर्थिक नियोजनाचा प्रश्न आहे. आज शेती सोडून शहराकडे धाव घेणाऱ्या कामगाराला जर शेतीत आधार मिळू शकला तरीही बऱ्याच अंशी हा प्रश्न सुटण्यास मदत होईल. तसेच उत्पादन वाढीबद्दल! आज बरेच मालक उत्पादन-वाढीबद्दल आग्रही आहेत; पण ज्या आर्थिक तणावात आज कामगार जगतोय, त्यामध्ये तो सुखा-सुखी उत्पादनवाढ नक्कीच देणार नाही.

नवीन व्यवस्थापकीय तंत्राचाच एक लाडका शब्द आहे. 'MOTIVATION'हे मोटिव्हेशन त्याला असल्याशिवाय केवळ दडपशाहीच्या जोरावर उत्पादनवाढ मिळणार नाही. मग हे 'मोटिव्हेशन' आर्थिक असो किंवा इतर स्वरूपाचे असो त्याचमुळे 'इन्सेन्टिव्ह'च्या स्कीमस किर्लोस्करसह अनेक कारखान्यांत मोठ्या प्रमाणावर राबविल्या जात आहेत.

त्याला प्रतिसाद देणारा कामगार किंवा एकूणच पगारवाढ, बोनस, इतर भत्ते व सवलती याच मागण्यांसाठी मुख्यत: लढणारा पुण्यातील कामगार 'अर्थवादी' आहे हे निश्चित. त्यामुळे त्याचा 'अर्थवाद' गोंजारून येथे विकासाचे नंदनवन उभे राहणार नाही हे जसे खरे आहे तसेच केवळ त्याच्या अर्थवादाकडे बोट दाखवून इथल्या मालकाच्या नफ्याकडे, एकंदरीतच आर्थिक अदूरदृष्टीकडे डोळेझाक करणे मूर्खपणाचे ठरेल या देशात 'माणसाचा निश्चित किमान भाव' ठरविण्याची जशी आवश्यकता आहे, तसेच येथील मालकांच्या नफ्याला काही प्रमाण ठेवणार आहोत का? नाही तर नव्याने झालेली विकासाची फळे चाखणारे मालक व त्यांच्याकडून ओरबाडून घेणारे कामगार व इतर ग्रामीण उपेक्षित यांच्यातील विषमतेची दरी यात केवळ 'पूल' बांधणार आहोत? एकीकडे विकासाचे प्रदर्शन तर दुसरीकडे मागासपणाचे जंगल अशा दोन चित्रातच आमच्या देशाची विविधता टिकणार आहे का?

तेव्हा हा अर्थवादी कामगार या विकासाच्या वाटचालीत संकुचित होत चालला आहे. उद्योगाच्या वाढीबरोबच तो अधिकच मध्यम वर्गीय' बनत चालला आहे याच पार्श्वभूमीवर येथील कामगार-चळवळीला व विशेषत: राजकीय कामगारसंघटनांना हालचाल करावयाची आहे.

आज तरी पुण्याच्या संदर्भात या बदलत्या प्रश्नांना सामोरे जाण्यास या संघटना तितक्याशा प्रभावी ठरत नाहीत. वैयक्तिक अन्यायाला दाद मागण्यासाठी लागणारा टेकू म्हणूनच कामगार या युनियनकडे बघतो आहे. त्याचमुळे झेंडा कुठला, नेता कोण यापेक्षा कोण आपले काम लवकर करतो याचीच त्याला फिकीर आहे

ज्याप्रमाणे औद्योगिक-नगरीतला एक अविभाज्य अंग म्हणून 'फॅक्टरी' ही त्याला त्याच्या आयुष्याचा भाग वाटतीय त्याप्रमाणे युनियन, तिचे राजकारण त्याच्या आयुष्याचा भाग बनविणे आवश्यक आहे व याच दृष्टीने एकूणच लढ्याच्या मार्गांचा पूर्ण विचार करणे अटळ बनले आहे.

एखादे विशिष्ट तत्त्वज्ञान व कामगारांचे रोजचे जीवन यांचा चपखल मेळ आज तरी बसत नाही. तो बसविण्याची जबाबदारी आजच्या चळवळीत तरी दिसत नाही. तेव्हा स्वप्नरंजन पुरे! ◻

## ह्या ना त्या निमित्ताने....

पृष्ठ ४ वरून

पण झाली. त्याच्या सगळ्या लिखाणात ह्या टवाळीबद्दल एक वाक्य तरी आहे ?

तसेच स्वैराचाराबद्दलची भीती. अण्णासाहेब कर्व्यांनी स्त्री–शिक्षण, विधवाकरता आश्रम काढले तर त्यांच्यावर कुंटणखाना चालवता आहात, अनाचार वाढवता आहात म्हणून नुसती हूल उठवली गेली नाही तर अक्षरशः शेण फेकले गेले; पण अण्णा कर्व्यांनी त्याचे काही स्तोम माजवले नाही. आणि ह्या बायका !'

आता राधाला काय बोलावे ते कळेना. ह्याचा अर्थ राधा बुद्धीने कमी होती म्हणून नाही तर ही सगळी स्त्री–मुक्ती–चळवळच अशा धर्तीवर चालली आहे की, राधासारखी सर्वसामान्य, बुद्धिमान व समजूतदार स्त्री अगदी भांबावून गेली आहे.

'बरं ते राहू द्या; पण अशा संस्थांची काही गरज आहे की नाही ? स्त्रियांवर अन्याय व अत्याचार होतो आहे की नाही ? व तो दूर करायला नको का ?'

'अग, अत्याचार होतो व तो दूर करायला पाहिजे हे कोण मान्य करणार नाही ? शेवटी ह्या स्त्रिया म्हणजे आमच्याचपैकी कोणाच्या आया, वहिणी, बायका, वहिन्या, भाच्या, पुतण्या, मैत्रिणी असतात की !'

'पण सगळ्या पुरुषवर्गाने स्त्री–वर्गावर अत्याचार केला आहे असे होत नाही. हे बघ, स्त्रियांवर झालेल्या बहुतेक सगळ्या अत्याचारात अत्याचार करणाऱ्याच्या बाजूने स्त्रिया सामील झालेल्या असतात.

सुनाना जिवंत जाळण्यात त्यांना जिवानिशी मारण्यात वा त्यांचे हाल करण्यात सासवा व नणदा–म्हणजे बायकाच पुढे असतात !

'हे आपले नेहमीचे argument आहे. हे फेकले की स्त्रिया गप्प ! अहो, पण त्याच्या मागे काही सामाजिक कारणे आहेत. त्या सासवांना जसे वागवले गेले...'

'हेही तुमचे नेहमीचेच argument आहे. समाजातल्या सगळ्या थरातल्या, सगळ्या जाती–जमातीतल्या, पैसेवाल्या, गरीबवर्गातल्या सासवा सुनांना छळतात. म्हणजे नुसते सामाजिक कारण त्यामागे नाही.

'खोटी प्रतिष्ठा असते ना माणसाला. मृणालबाईंनी उदाहरण दिलेच आहे. मृणालबाईंनी कोणा २००० पगार मिळवणाऱ्या नवऱ्याची माहिती सांगितली होती. तो सगळे पैसे दारूत घालवत होता म्हणून ही बिचारी रात्रीची वा भल्या पहाटेची लोकांच्या घरी कामे करून संसार चालवत होती. हे सांगितल्यावर श्रोत्यात त्या बाईविषयी थोडी सहानभूती निर्माण झाली आहे हे बघताच त्या पुढे म्हणाल्या होत्या की, ती बाई चूक होती. खोट्या प्रतिष्ठेपायी ती दिवाभीताचे जीवन जगत होती वगैरे. गोरेबाईंचे नाव काढल्याबरोबर श्याम तडकलाच. ही साधन–शुचितावाली मंडळी श्यामला लहानपणी परीक्षेत स्वच्छता व टापटिपीबद्दलचे पाचपैकी पाच मार्क मिळत. कारण त्याचा पेपर कोरा असे. भारताच्या राजकीय जीवनाच्या परीक्षेत समाजवाद्यांना असेच स्वच्छता व टापटिपेचे पाचपैकी पाच मार्क मिळतात. कारण त्यांचा पेपर आपला कोरा!

'त्या गोरेबाईंचे काही सांगू नकोस. आता ह्या बाई कोणा बाईंच्या गोष्टी सांगताहेत; पण काही करायला पाहिजे त्या वेळी मात्र काही केल नाही !'

'कोणाविषयी बोलता आहात तुम्ही ? मृणालताईंविषयी ? कमाल आहे तुमची. मुंबईत पाणी–वालीबाई म्हणून प्रसिद्ध आहेत. चांगल्या मंत्र्यांच्या तोंडचे पाणी त्यानी पळवले त्याना तुम्ही काही तरी करायला पाहिजे म्हणून सांगता आहात ? एवढी निरागस बाई महाराष्ट्रातच काय पण आख्ख्या हिंदुस्थानात मिळणार नाही !' सगळ्या मराठी जनतेप्रमाणे राधाला गोरेबाईंबद्दल फार अभिमान होता.

'अग, त्यांच्या निरागसपणाबद्दल मी कुठे काय म्हणतो आहे;' श्यामलाही मृणालबाईंबद्दल तेवढाच आदर होता. 'त्यांनी मुंबईतल्या काही भागातल्या पाण्याचा प्रश्न सोडवला, आणखीही पुष्कळ काही केले; पण ज्या वेळी जनता राज्य आले त्या वेळी का नाही स्त्रियांच्या फायद्याचे कायदे करून घेतले ?'

'अहो, त्यांचे तत्त्व असेल अधिकाराच्या जागा स्वीकारायच्या नाहीत म्हणून!'

'मग खासदार कशाला झाल्या ? तेही अधिकाराचे पद आहेच की ! पूर्वी दोन–तीन वर्षात त्या जे करू शकल्या असत्या ते करायला आता त्याना वीस वर्षं लागतील!

ती २००० रुपये मिळवणाऱ्या गृहस्थाची बायको खोट्या प्रतिष्ठेला बळी पडली आणि मृणालताई खोट्या विचारसरणीला बळी पडल्या; पण त्यामुळे नुकसान झाले स्त्री–चळवळीचे !'

'मग तुमचे म्हणणे काय आहे ? 'बोलत्या व्हा !' वगैरे कार्यक्रम बद करायचे का ?' राधा चिडचिडीने विचारते.

'नाही, नाही असले कार्यक्रम व्हायला पाहिजेत, त्यांची गरज आहे. फक्त स्त्री–मुक्ती–पुढारी बायकानी स्वतःच्या कौतुकाचे कमी बोलले पाहिजे !'

□


ज्यांना पहिली अपत्ये मुलीच आहेत आणि पुत्र व्हावा अशी इच्छा आहे त्यांनी संपर्क साधावा.

**वैद्य एम्. वाय्. परांजपे**
संजीवन चिकित्सक
सदाशिव पेठ, नृसिंह सदन
जनता बँकेसमोर
बाजीराव रोड
पुणे ४११ ०३०

**संजीवन औषधालय**
वैद्य एम्. वाय्. परांजपे
लोटलीकर बिल्डिंग
१ ला मजला, १६, एल्. जे. रोड
सिटी लाईट सिनेमाजवळ
माटुंगा (प. रे.) मुंबई ४०० ०१६

## नाटचपंढरी....

### टिळक–आगरकरांचे जेवताना हात थांबले !

कोल्हापूर-प्रकरणाची अलाबला टळल्यावर टिळक–आगरकरांचा डेक्कन कॉलेज-मध्ये मोठ्या थाटात सत्कार करण्यात आला. किर्लोस्कर मंडळी नि केसरीचा ऋणानुबंध होताच. सहाजिकच किर्लोस्कर मंडळीच्या लोकांना, मेजवानीचे आमंत्रण होतेच. त्या वेळी जेवणाच्या पंक्तीत श्लोक म्हण–ण्याची पद्धत होती. भाऊरावांनी 'देवी म्हणे अनार्या' ही आर्या अशी सुरेल म्हटली (गायली) की त्यांच्या गोड गायनाने जेव–णारांचे हात थांबले. सारी पंगत पंधरा–वीस मिनिटे स्तब्ध झाली. गोड गाण्यापुढे गोड खाण्याकडे लक्षच लागेना! भाऊराव थांबले. सगळ्यांचे, टिळक-आगरकरांचे हातही सुकून गेले होते. सुभद्रेचे सौभाग्य लाभण्याच्या आधीच भाऊरावांच्या रूपा-गाण्याची कीर्ति पुण्यातल्या विद्वान मंडळीत पसरली होती ती अशी !

### किती सांगु तुला–

भाऊराव प्रथम शाकुंतलात 'नटी' म्हणून उभे राहिले नि त्यांच्या दर्शनाने नि गाण्याने प्रेक्षक भारावून गेले. एका रात्रीत ते रसि–कांच्या गळ्यातला ताईत बनले! नटी-सूत्र–धाराच्या प्रवेशातले नटीचे शेवटचे पद 'आज मज सहज आला उल्हास' हे त्यांनी संपवि–ताच 'तुझ्या मधुर गानाच्या नादे वेडावुनी हा गेला' हे सूत्रधाराचे पद अण्णांनी सुरू कर-ताच, प्रेक्षकांनी जणू भाऊरावांच्या (नटीच्या) विषयीचा तो आपलाच अभिप्राय आहे अशा आनंदात उत्स्फूर्त दाद दिली.

### सौभद्र–सौभद्र–सौभद्र–

'सौभद्र' रंगभूमीवर आले नि सारे पुणे सौभद्रमय होऊन गेले. विशेषत: भाऊरावांच्या गाण्याचे सूर नि शब्द दाही दिशांत भरून राहिले. शाळकरी पोरेसुद्धा 'झाली ज्याची उपवर दुहिता' रस्त्यांत गुणगुणू लागली. गाण्याच्या बैठकीत 'वद जाऊ कुणाला शरण' ची फर्माईश होऊ लागली. सनईवर तीच गाणी उमटू लागली. पेटीवाले तीच गाणी वाजवू लागले. इतकेच काय गुलहौशी मंडळी कोठी-वर (बावनखणीत) गाणारणीला 'अरसिक किती हा शेला' आग्रहाने गायला लावू लागली.

### बुवा, आज सौभद्र लावा !

"सौभद्र" गाजत होते त्या काळात ह. भ. प. शिवरामबुवा इचलकरंजीकर या नावाचे कीर्तनकार आपल्या रसाळ वाणीने नि गोड गळ्याने पुण्यात लोकप्रिय होते. त्यांच्या कीर्तनाला नेहमीच गर्दी असे. नाटकातली गाणीही ते ढंगदार म्हणत त्यांच्या कीर्तनाचा पूर्वरंग झाला की लोक आग्रह करीत 'बुवा, आज सौभद्र–आख्यान लावा!' बुवाही मोठ्या खुशीत येऊन, कम-रेला उपरणे कसून 'झाली ज्याची उपवर दुहिता । चैन नसे त्या तापवि चिंता' या पदाने, मोठ्या थाटात सुरुवात करून श्रोत्यांना खूश करून सोडीत.





# अेक घास आओचा...

अेक घास बाबांचा, अेक घास ताओचा,
अेक घास भाओचा आणि अेक घास बचतीचाही...
लहानपणापासून मुलांना बचतीची सवय लावा...
लहान-थोर सर्वांसाठी बचतीच्या अनेक योजना आहेत आमच्याकडे.
आपल्या नजीकच्या शाखेशी संपर्क साधा.

बँक ऑफ महाराष्ट्र
(भारत सरकारचा अुपक्रम)
मुख्य कचेरी : 'लोकमंगल'
शिवाजीनगर, पुणे ४११००५
बँकिंग सेवा व्यक्तिगत जिव्हाळा

MANOOS WEEKLY ( Licensed to post without prepayment of postage–No. 11 ) Regd. No. PNCW–28

# माणूस निरोगी नाही जोवरी कैसा भोगील सुख भूवरी



आरोग्य माणसाची पहिली आवश्यकता आहे. हाच उद्देश डोळयासमोर ठेऊन, योजना आंखताना आरोग्य सेवांवर विशेष लक्ष देण्यात आले आहे.

★ इ. स. २००० पर्यंत सर्वांच्या 'आरोग्याची निगा' हे लक्ष्य समोर ठेऊन एक योजना आंखण्यात आली आहे.

★ देशात आतांपर्यंत सुमारे दीड लक्ष आरोग्य रक्षक नेमण्यात आले असून ५५ हजारांपेक्षा अधिक उपकेंद्रे आणि प्राथमिक चिकित्सा केंद्रे उघडण्यात आली आहेत.

★ शिशू आणि ओल्या बाळंतिणी रोगाला लवकर बळी पडतात म्हणून त्यांच्यासाठी समन्वित बाल विकास सेवा प्रारंभ करण्यात आली आहे. त्याचे लाभदायक परिणाम दिसू लागले आहेत.

★ गलिच्छ वस्तींतील घाण आणि गुदमरलेल्या वातावरणात अनेक रोग उद्‌भवतात. १९९० पर्यंत, अशा वस्तीत राहाणाऱ्या ३ कोटि लोकांना, २० कलमीं कार्यक्रमाच्या अंतर्गत स्वच्छ आणि मोकळे वातावरण उपलब्ध करून देण्यात येईल.

**नागरिक निरोगी तरच समाज सुदृढ**

अधिक माहितीसाठी खालील कुपनांचा उपयोग करा :

**ॲसिस्टंट प्रॉडक्शन मॅनेजर**
रिजनल डिस्ट्रिबुशन सेंटर,
२३, सिदपुर इंडस्ट्रियल इस्टेट,
हलाव पूल, मसरानी लेन,
कुर्ला, मुंबई-४०००७०

नव्या २० कलमीं कार्यक्रमाच्या बाबतीत अधिक माहितीसाठी कृपा करुन मराठी/हिंदी/इंग्रजी पुस्तिका पाठवा.

नाव ....................................................
पत्ता ....................................................
.................. पिन ....................

**नवा 20 कलमी कार्यक्रम**

davp 83/97